🌷 धर्मांतरामुळे झालेले परिवर्तन

बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांमधील असहाय्यतेची, निराधार पणाची, भावना नष्ट करून स्वाभिमान जागृत करून दलित बांधवांना संघटितपणे एकत्र आणण्याचे काम केले. त्यामुळे हिंदू समाज व्यवस्थेविरुद्ध क्रांतीची सूरही त्यांच्या विचारांमध्ये उठायला लागला, जो धर्म दलित बांधवांना माणूस म्हणून योग्य स्थान देईल तो धर्म दलित बांधवांनी स्विकारावा हा विचार त्यांनी मांडला.

सन १९२४ ला बहिष्कृत परिषदेत बोलताना बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, सर्वच लोकांना देशांतर करणे शक्य होणार नाही तेव्हा देशात राहून अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्याचा मार्ग शोधून काढला पाहिजे अशा प्रकारचा दुसरा मार्ग म्हणजे धर्मांतर आहे.

१३ ऑक्टोबर १९३५ नाशिक जिल्हा येवला येथे धर्मांतर करणार अशी घोषणा केली. धर्मांतर करणार या घोषणेने देशात फार मोठी खळबळ माजली. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपला धर्म स्वीकारावे यासाठी वेगवेगळ्या धर्माचे प्रमुख प्रयत्न करू लागले.

२७ ऑक्टोबर १९३५ रोजी बौध्द धर्मीय प्राध्यापक धर्मानंद कोसंबी हे बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भेटले आणि वाराणसी येथील महाबोधी सोसायटीचे वाली सिंह यांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याची विनंती केली.

१६ ऑक्टोबर १९३५ रोजी अमृतसर सुवर्णमंदिराचे उपाध्यक्ष सरदार दरीप सिंह ठोबिया यांनी तार पाठवून शीख धर्म स्वीकारण्याची विनंती केली. मुस्लिम धर्मीय हैदराबादचे निजाम व फत्तेपूर गुलबर्गाचे निजाम यांनी काही कोटी रुपये देऊ केले होते परंतु बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाकारले. २५ ऑक्टोबर १९३५ रोजी राजगृह, मुंबई येथे डॉ. एम. बी. वेलणकर यांच्या नेतृत्वाखाली हिंदूंचे शिष्टमंडळ भेटले. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराच्या घोषणेमुळे करमचंद गांधी, डॉ. राजेंद्र प्रसाद, सावरकर इत्यादी काँग्रेसचे मोठे नेते नाराज झाले होते. परंतु बाबासाहेब निश्चयापासून ढळले नाहीत.

बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्वांचा पुरस्कार करणारा बुद्ध धम्म जवळचा वाटला व त्याचा स्वीकार करून संपूर्ण भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न मनात बाळगले १४ऑक्टोबर १९५६ रोजी अशोका विजया दशमीला नागपूर येथे महास्थवीर चंद्रमणी यांच्याकडून स्वतः व अनुयायांना बावीस प्रतिज्ञा पहिले देऊन बौद्ध धम्माची दिक्षा घेतली.

१) धर्मांतरामुळे झालेले पहिले परिवर्तन समाजात मानसिक परिवर्तन झाले, आम्ही गुलाम नाही, अस्पृश्य नाही, दलित नाही, आम्ही बौद्ध आहोत मानसिकता निर्माण झाली.

२) धर्मांतरामुळे झालेले दुसरे परिवर्तन समज अंधश्रद्धेतून मुक्त झाला. कारण त्यांनी बावीस प्रतिज्ञा अनुसरण केल्या आहेत. देव देवता नाकारल्या, पूजा कर्मकांड, उपासतापास नाकारले, देवाला नवस करणे, बळी देणे बंद केले.

३) धर्मांतरामुळे झालेले तिसरे परिवर्तन मृत जनावरे खाने, ओढणे सोडले. उष्टे अन्न खाने सोडले, राहणीमान सुधारले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, खेडी सोडा शहराकडे चला या आदेशाप्रमाणे आम्ही शहराकडे वाटचाल केली त्यामुळे उत्पन्नाचे नवे मार्ग सापडले.

४) धर्मांतरामुळे झालेले चौथे परिवर्तन वस्त्यांचे नामांतर भिमनगर, गौतम नगर, सिद्धार्थ नगर, आंबेडकर नगर, शाहूनगर असे परिवर्तन झाले.

५) धर्मांतरामुळे झालेले पाचवे परिवर्तन मुला मुलींची नावे बुद्ध धम्माप्रमाणे ठेवू लागलो. सिद्धार्थ, गौतम, धम्मपाल, प्रशिक, प्रज्ञा, शिल, करुणा, हे परिवर्तन झाले.

६) धर्मांतरामुळे झालेले सहावे परिवर्तन बुद्धजयंती, भिमजयंती, धम्मचक्रपरिवर्तन दिन, बारा पौर्णिमा, अमावस्या, अष्टमी, असे आमचे मंगल दिन धम्मा धम्मांतरामुळे साजरे होवू लागले.

७) धर्मांतरामुळे झालेले सातवे परिवर्तन बुद्धगया, लुंबिनी, कपिलवस्तू, श्रावस्ती, कुशीनगर, महू, अंबावडे, वनंद, महाड, दीक्षाभूमी, चैत्यभूमी, अजिंठा-वेरूळ, कान्हेरी, गुंफा असी आमची पवित्र स्थळे पाहू लागलो.

८) धर्मांतरामुळे झालेले आठवे परिवर्तन आजच्या संस्कार पद्धतीत (विधित) परिवर्तन झाले. नामकरण, धम्मदीक्षा, साक्षगंध, विवाह विधी, पुण्यानुमोदन विधी बौद्धाचार्य, भंतेजी करू लागले.

९) धर्मांतरामुळे झालेले नववे परिवर्तन बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका हा संदेश दिला त्याप्रमाणे आम्हाला शिक्षणाची ओढ लागली, आमची मुले डॉक्टर, वकील, प्रोफेसर, इंजिनियर, अधिकारी, डायरेक्टर, मॅनेजर, कारखान्याचे संचालक, सुपरवायझर झाले असे शैक्षणिक क्षेत्रात परिवर्तन झाले.

१०) धर्मांतरामुळे झालेले दहावे परिवर्तन प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे, दिवंगत नामदेव ढसाळ, आद. ज. वी. पवार असे अनेक साहित्यिक तयार झाले. भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय पदाधिकारी आद. एम. डी. सरोदे, आद. बी. के. आहिरे, आद. एस. के. भंडारे, आद. बि. एच. गायकवाड, आद. सुषमाताई पवार, यांनी पुस्तके लिहून धार्मिक आणि साहित्यिक क्षेत्रात पाऊल टाकले.

११) धर्मांतरामुळे झालेले अकरावे परिवर्तन गावागावात बुद्ध विहारे निर्माण झाली तिथे वंदना, प्रवचणे, वर्षावास कार्यक्रम, संस्थेची शिबिरे, तथागत बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन चालू झाले त्यामुळे बौद्ध धम्माची तत्व प्रणाली समजू लागली.

१२) धर्मांतरामुळे झालेले बारावे परिवर्तन महिलांनी शिक्षणात प्रगती केली, नौकरी करू लागल्या, साहित्य क्षेत्रात पाऊल टाकले. उच्चशिक्षित महिला शिक्षिका, प्रोफेसर, डॉक्टर, वकील, बिझनेसमॅन झाल्या. काही महिला राजकारणात उतरल्या ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, नगरसेवक, नगराध्यक्ष, आमदार, खासदार मंत्री पदी विराजमान झाल्या आहेत. राष्ट्रीय खेळामध्ये प्रगती केली हे सारे धम्मांतरामुळे परिवर्तन झाले. समाजातील महिलांची धार्मिक प्रगती झाली. महिला धम्म प्रशिक्षण, शिबिरात भाग घेऊ लागल्या, प्रवचन, वंदना, सूत्रकाम करू लागल्या, धम्म प्रवचन देऊ लागल्या.

१३) धर्मांतरामुळे झालेले तेरावे परिवर्तन घरामध्ये तथागत बुद्ध, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, माता रमाई, माता सावित्रीबाई, यांच्यासारख्या महापुरुषांच्या प्रतिमा भिंतीवर आल्या. घरात त्रिशरण, पंचशीलेचे सूर घुमू लागले हे सारे धम्मांतरामुळे झाले.

आयु. राज जाधव

♟️ *लंगडे नेतृत्व*

🧘‍♂️ तथागत गौतम बुद्ध यांच्या काळात राजा प्रसेनजित म्हणून राजा होऊन गेला. या राजाचा आवडता हत्ती अचानक एका पायाने लंगडू लागला.

👑 त्यामुळे राजा प्रसेनजित फार दुःखी झाला, कष्टी झाला. ही गोष्ट ज्यावेळेस तथागत गौतम बुद्धांना कळाली. ते स्वतः होऊन राजवाड्यावर गेले.

🐘 हत्तीचा पाय पाहिला तर कोठेही कोणत्याही प्रकारची जखम नाही. तदनंतर त्यांनी त्या हत्तीच्या माहुताला बोलावले. त्याच्या हातात दोरी दिली.

🚶‍♂️ माहुत पुढे आणि त्याच्या पाठीमागे हत्ती लंगडत चालत होता. काही वेळानंतर गौतम बुद्धांनी त्या माहुताच्या हातातील दोरी आपल्या हाती घेतली.

😳 तथागत गौतम बुद्ध पुढे आणि पाठीमागून लंगडत चाललेला हत्ती अचानक सरळ चालू लागला.

💫 हे दृष्य पाहिल्यानंतर राजा प्रसेनजित आनंदीत झाला. हर्षित झाला. आनंदाच्या भरात त्यांनी तथागत बुद्धांच्या पायावर लोळण घेतली.

💁 त्यावेळेस तथागत गौतम बुद्ध म्हणाले, मी कोणत्याही प्रकारचा अद्भुत चमत्कार घडवून आणलेला नसून या हत्तीचा माहूत एका पायाने लंगडा होता. त्यामुळे हत्ती त्याचे अनुकरण करत होता.

☝️ बंधूंनो, ज्या समाजाचा नेता माहुत हा विचाराने लंगडा आणि कर्माने विकृत असेल तर त्याचा समाज सुद्धा त्याचेच अनुकरण करत असतो.

जय भीम

||धम्म विचार||

आज घटस्थापना. घट बसविणे म्हणजे काय?

तर पूर्वी लोक अज्ञानी होते मग ते नक्षत्र उत्तरा आणि हस्थ नक्षत्राला आपल्या रानातून थोडी माती आणून त्यावर बियाणे टाकून प्रात्यक्षिक करायचे. म्हणजे ते अनेक धान्याच्या बिया त्या मातीत टाकायचे व त्याला पाणी द्यायचे. जे धान्य चांगले येईल ते शेतात पेरायचे.

आता मला सांगा घाटाचा आणि देवाचा काही संबंध आहे का?

पण आलीकडे ब्राह्मणांनी त्या धान्याचे व घटाचे दैवीकरण केले व लोकांना अंधश्रद्धेला लावले व स्वतःची पोळी भाजली.

या अशा अंधश्रद्धेतून बाहेर पडायचे असेल तर तथागतांनी दिलेल्या बौध्द धम्माची कास धरून चालावे लागेल तरच जीवन दुःख मुक्तीच्या वाटेने वाटचाल करेल.

||जय भीम||

दादासाहेब कांबळे, वेळोशी मो.८६०५११७६८८

🌹 राजा हर्षवर्धन

राजा हर्षवर्धन यांने महाराष्ट्रातील औरंगाबाद येथील अजंठा, वेरूळ लेण्या व गुंफा तयार करण्यासाठी दान व योगदान दिले, त्याने नालंदा, विक्रमशिला या बौद्ध विश्वविद्यालयाला फार मोठे दान देऊन त्याचा विकास केला. राजा हर्षवर्धनाचे राज्य थानेश्वर (हरियाणा) राजधानी कनोजनगरी (कानपूर) होती. अवघ्या सोळाव्या वर्षी तो गादीवर बसला त्याचा कार्यकाळ इ.स. ६०६ ते ६४८ पर्यंत होता. राजा हर्षवर्धन महायान पंथाचा उपासक होता. महान विजेता होता. बौद्ध धम्मावर त्याची महान श्रद्धा होती, आपले पूर्ण जीवन धम्म सेवेला अर्पण केले होते.

राजा हर्षवर्धन दर पाच वर्षांनी गंगा यमुना नदीच्या संगमावर बौद्ध परिषदेचे आयोजन करीत असे. बौद्ध भिक्खू, राजे-महाराजे या परिषदेत भाग घेत असत, राजा हर्षवर्धन आपली सुवर्णतुला करीत असे, ते सोने गरिबांना वाटत असे, इ.स. ६४३ मध्ये विशाल धम्म संगीती घेतली होती. बौद्ध धम्म परिषद ७५ दिवस चालली होती या संगीतीत अनेक ठराव संमत केले. आपली राज्यपद्धती तथागत बुद्धांच्या विचारावर चालू होत असे, राजा हर्षवर्धनने प्राणी हिंसा बंद केली प्राणी हत्या करणाऱ्या शिक्षा करीत होता.

१) बौद्ध धम्माचा प्रचार करण्यासाठी अनिल देशात परिषदा घेणे.

२) प्रशिक्षित भिक्षूंना वेगवेगळ्या देशात पाठवणे.

३) कुणीही कुणाबद्दल द्वेष भावना मनात ठेवू नये.

४) तथागत बुद्धांच्या मार्गावर चालण्याचा विचार करणे.

५) सर्व जनतेने मैत्री भावनेने व्यवहार करणे.

६) प्रज्ञा, शील, करुणा आणि मंगल मैत्रीने जीवन जगावे.

७) हीनयान व महायान या दोन्ही पंथाना जोडून घेणे.

८) प्राणी हिंसा करू नये त्याकरिता जनजागृती करणे.

राजा हर्षवर्धनाच्या काळात बौद्ध धम्म बहुजनांचा धम्म होता. राजा हर्षवर्धन यांनी स्वतः तीन ग्रंथ लिहिले प्रियदर्शिकर, रत्नावली आणि नागानंद हे ग्रंथ आहेत. राजा हर्षवर्धन यांनी धम्माचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण भारतभर केला त्यामुळे जगात बौद्ध धम्म प्रसार पावला आहे. त्यांनी 36 वर्षे राज्य चालवले असा हर्षवर्धन अखेरचा बौद्ध राजा होता.

आयु. राज जाधव

🌻 बुद्ध आणि त्यांचा धम्म ऐतिहासिक आहे.

ते काल्पनिकही नाहीत किंवा काही धूर्त लोकांच्या लेखणीतून बाहेर आलेले नाहीत. देवनामप्रिय प्रियदर्शी सम्राट अशोक यांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म जपण्यासाठी उचललेल्या पावलांमुळे आज बुद्ध आणि त्यांचा धम्म हा काल्पनिक संवाद म्हणता येणार नाही. अशोकाला जंबुद्वीपा येथील शिलापत/शिला स्तंभावर धम्म शिकवणुकीचे शिलालेख कोरलेले आहेत. हे ज्ञात आहे की अशोकाने त्याच्या साम्राज्यात

सर्वत्र ०००८४ स्मारके उभारली होती. आतापर्यंत सापडलेल्या पुरातत्व अवशेषांनुसार, सम्राट अशोकाच्या खडकांवर, खांबांवर, लेण्यांवर कोरलेल्या शिलालेखांची संख्या ४२ वर पोहोचली आहे. त्यापैकी ३६ भारतात, २नेपाळ, २ पाकिस्तान आणि २ अफगाणिस्तानात सापडले आहेत.ते शिलालेख आजही बुद्ध आणि त्यांच्या धम्माच्या ऐतिहासिकतेची साक्ष देतात.

जन्म : ४ मार्च; जन्म वर्ष : इ. स. पूर्व ३०२; राजटिळक : इ. स. पूर्व २६८; मृत्यू : इ. स. पूर्व २३२; वडिलांचे नाव : बिंदूसार; आईचे नाव : सुभद्राणी.

सम्राट अशोकाने धम्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी शिलालेख खोदण्याचे थांबवले नाही. धम्माचा प्रचार करण्यासाठी त्यांनी केवळ आपल्या साम्राज्यातच नव्हे तर परदेशातही धम्म दूत पाठवले होते.

अशोकाने आपल्या कारकिर्दीत पाटलीपुत्र येथे धम्म संगीत आयोजित केले होते जे खूप ऐतिहासिक महत्त्व आहे. भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतरची ही तिसरी परिषद होती, जी २५१ बीसी मध्ये आयोजित करण्यात आली होती आणि तिचे अध्यक्ष मोग्गलीपुत्त टिसा होते. या संगीतानंतर अनेक स्थवीरांना धम्माच्या प्रचारासाठी परदेशात पाठवण्यात आले, त्यामुळे आज आशियाई देशांमध्ये बुद्धाच्या शिकवणीवर विश्वास ठेवणारे लोक मोठ्या संख्येने आहेत.

कोणत्या देशाला कोणत्या स्टेशनवर पाठवले गेले याची माहिती आहे.

१) मजझिंटिक स्तवीर - काश्मीर आणि गांधार

२) महारक्षित स्थानविरा - यवन (ग्रीस)

३) मज्जिम स्थविरा - हिमालयी देश

४) धम्मरक्षित स्थानविरा - अपरांतका

५) महाधम्मरक्षित स्थविर - महाराष्ट्र

६) महादेव स्थानविर - महिषामंडळ (म्हैसूर किंवा मांधाता)

७) संरक्षित स्थानविरा - वनवासी (उत्तर कन्नड)

८) सोना स्थानविर आणि उत्तर स्थानविर - सुवर्णभूमी (पेगुल आणि मौलमीन)

९) महेंद्र (ताम्रपर्णी) स्थविर - श्रीलंका (सिंहला)

१०) संघमित्रा भिक्खुनी - श्रीलंका (सिंहला)

सम्राटाने आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना धम्माच्या प्रचारासाठी समर्पित केले, म्हणून खऱ्या अर्थाने तो धम्म आहे. सम्राट अशोकाच्या या महान कार्यासाठी संपूर्ण जग त्यांचे ऋणी आहे.

सिद्धार्थ बुद्ध/विश्वास जगताप

🌱 *नवरात्र नवरंग हा ऐक आर्थिक व्यवसाय* 🌱

नवरात्रात देवीचे नऊरंग आहेत, आणि त्या प्रमाणे प्रत्येक दिवशी ऐका रंगाची साडी नेसने प्रथा मागील २० वर्षे पासून पडली आहे, आपल्या कडे देव, देवीच्या नावावर काही पण खपते, खपवले जाते, त्याचा ऐक भाग म्हणजे नवरात्र उत्सवात वेगवेगळ्या रंगाची साडी नेसणे होय, वेगवेगळ्या रंगाची साडी नेसणे याला कुठल्याही धार्मिक आधार नाही. *हे सत्यच* आहे,.... खरा प्रकार काय यांच्या मागचे खरे सत्य सदविवेक बुद्धी ने सत्य कोणी ही जानुन घेण्याचा प्रयत्न केलाच नाही.

नवरात्रीच्या निमित्तानं पसरवल्या गेलेल्या मार्केटिंग अंधश्रद्धेचे पितळ उघडे पाडणारा हा लेख जरूर वाचा आणि विचार करा।

महिलांनो, नवरात्रीतले नऊ रंग धार्मिक नाहीत, हा तर होता मार्केटिंग फंडा!!

*तुम्हाला कधी प्रश्न पडलाय, की कोण ठरवतं हे रंग म्हणून? किंवा याच दिवशी हाच रंग घालायचा ही परंपरा कितीशे वर्षांपासून चालत आली आहे म्हणून? हो, आम्हाला पडला हा प्रश्न आणि आम्ही त्याचं उत्तरही शोधून काढलं. गंमत म्हणजे आमच्या उत्तराला क्विंटचं अनुमोदनही मिळालं. उत्तर आणि त्यामागची कथा मोठी रंजक आहे हो. वाचाच मग आता.. मुंबई मधुन प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकाचा हा फंडा काय होता माहिती आहे का तुम्हाला?...

दैनिकाचा खप वाढवणे, हाच.... या भंपक अंधश्रद्धेतुन नऊ दिवस महीलांना रोज नवीन रंगाची साडी नेसन्यास मिळेल, आणि... पेपर मधे फोटो बघायला मिळेल,..

प्लॅन ठरला नवरात्रीत देवीचे नऊ दिवसात नऊ वेगवेगळे रंग.., त्या दिवशी देवीला या रंगाची साडी आवडते, तीच साडी महीलांनी नेसायची आणि ग्रुप किंवा स्वतःचा फोटो दैनिकाला द्यायचा, दुसऱ्या दिवशी चे पेपर मधे फोटो छापणार,..

परीणामी तोट्यात चालले ले पेपर चा खप वाढेल, *ही युक्ती* पुढे याचा फायदा साडी व्यापारी यांनी ही भरपूर उठवून आर्थिक कमाई केली. तर, *आठवणीप्रमाणे साधारण* २००२ ते ०३ च्या सुमारास आपल्या *महाराष्ट्र टाइम्सने* श्रावणक्वीन आणि नवरात्रीचे नऊ रंग हा प्रकार चालू केला. पाहिले दोन-तीन दिवस मटा पुरवणीमध्ये त्या दिवसाच्या रंगाच्या सुंदरशः साडीमधल्या मॉडेलचे छायाचित्र हे आकर्षण होते. मग आले तुमचेही असे ऑफिसमध्ये

सगळ्यांनी एकाच रंगाचीसाडी नेसल्याचे छायाचित्र पाठवा म्हणून आवाहन. मग काय बँका, शाळा, ऑफिसेस मधल्या महिला ग्रुप छायाचित्रांनी मटा पुरवणीची मधली दोन आणि कधी कधी शेवटचं पानही खाऊन टाकलं.

२००३-०४ साली फक्त जाहिरातीतूनच नाही, तर अशा छायाचित्रांमधूनही बातम्या हुडकून वाचाव्या लागत होत्या. बघा, केवढं दिव्य होत ते!!!

तर *मटाच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी केलं काय? तर प्रत्येक दिवस एका देवीचा असे नऊ देवींचे नऊ दिवस वाटून टाकले.* आणि मग प्रत्येक देवीला एक रंग दिला. म्हणजे असं पहा, दुर्गेची दुर्गाष्टमी, म्हणून तिचा एक रंग. असा रंगोत्सवाला मस्त धार्मिकतेचा रंग चढत गेला. खरं असो वा नसो, उत्सवप्रिय भगिनींनी आणि काही बंधुरायांनीही हा सन नवरंगात साजरा करायला सुरुवात केली. *हळूहळू दरवर्षी लोक मटाने रंग जाहीर करण्याची वाट पाहू लागले.*

पण प्रश्न असा होता की, मटाला असा आचरटपणा का करावासा वाटला? आणि आमच्या हाती आला क्विंटचा लेख.

त्यात त्यांनी २००३ साली *मटाचे संपादक असलेल्या भारतकुमार राऊतांनांच या प्रश्नाच उत्तर द्यायला साद घातली.* आणि उत्तर जाम खडबडायला लावणारे होते.

ते म्हणाले, *यात धार्मिकता वगैरे काही नाही.* तर, *लोकसत्तेच्या तुलनेने घसरत चाललेल्या मटाचा खप वाढवण्यासाठी त्यांनी केलेली ही मार्केटिंग स्टेटर्जी होती.*

राऊतांनी हेरला, *रोज ऑफिसला जाणाऱ्या मध्यमवयीन बायकांचा वाचकवर्ग.* आणि त्यांना आकर्षित करण्यासाठी मग छायाचित्र, छान-छान साडीतल्या मॉडेल्स हे सगळं रोजच्या मटाच्या पुरवणीत येऊ लागलं..., ही त्यांची ट्रीक मात्र कमालीची यशस्वि ठरली. आणि या भंपक अंधश्रद्धेला महिला बळी पडल्या, आजच्या घडीला ऑफिसमध्ये जाणाऱ्या मध्यमवयीन बायकाच काय, घरी येणारी कामवाली आणि महाविद्यालयात जाणारी मुल-मुलीं देखील हे रोजच्या कपड्याचे कलरकोड्स (रंगच्छटा) पाळतात.

भारतकुमार राऊतांना सहज म्हणून सुचलेला हा मार्केटिंगचा (विक्रीचा) उपाय आज १९ वर्षानंतरही तितक्याच यशस्वीपणे चालू राहिलाय.

आजच्या घडीला गणेशोत्सवात मुंबईचे गणपति नाही पाहिले तरी चालतील, पण नवरात्रात मुंबईच्या लोकल्सचे प्लॅटफॉर्म मात्र नक्कीच पाहण्यासारखे झाले आहेत.

विशेष नोंद :- सध्या अमुक दिवसी अमुक रंग वापरलाच पाहिजे असी जनू अंधश्रद्धा निर्माण होतांना दिसत आहे. तस होवू नये म्हणून मुद्दाम हे सांगावसं वाटलं. ही गोष्ट निव्वळ मनोरंजन म्हणून वापरा असं सर्व महिलांना विनवावेसे वाटते. *आजच्या घडीला पुराणातील सावित्रीची गरज नसून, महिलांना अंधश्रद्धेतून पारंपरिक बंधनाच्या जोखडातून बाहेर काढून शिक्षणाची द्वारे खुली करणाऱ्या फुल्यांच्या सावित्रीबाईच्या विचारांची गरज आहे.*

तुमच्या कर्तृत्वाचे रंग यापेक्षा देखणे आहेत, हे नक्की!!!

*_ #बुद्ध_विहार_करते_थे🌷 🌷

बुद्ध का चलना चलना नहीं कहा जाता था । उनके चलने को ही विहार कहते थे। पूरा त्रिपिटक इन वाक्यांशों से भरा पड़ा है - जैसे * #भगवान एक समय राज गिरी में विहार करते थे, भगवान एक समय श्रावस्ती में विहार करते थे, भगवान एक समय वैशाली में विहार करते थे #* आदि ।🌷 🌷

*#आखिर क्या अंतर है - चलने और विहार करने में?

#चलना हमेशा होता है कहीं पहुंचने के लिए लेकिन जो पहुंचा हुआ है उसका चलना चलना नहीं रह जाता। क्योंकि अब उसे कहीं पहुंचने के लिए नहीं चलना है उसकी यात्रा पूरी हो चुकी है। वह अपने गंतव्य तक, बुद्धत्व तक पहुंच चुका है। 🌷 🌷

#_चलने और पहुंचने का अर्थ अंतर यात्रा से है। इस रूप में बुद्ध के चलने को विहार कहने का संबंध उससे है। जिसकी अंतर यात्रा पूरी हो गई है।_ 🌷 🌷

*_#जिसकी अंतर यात्रा पूरी हो गई है वह अब चलेगा

क्यों?? वह टहलेगा, चक्रमण करेगा, विहार करेगा, चारिका करेगा🌷 🌷

विहार शब्द में गति है। यदि बुद्ध अपनी गंधकुटी में बैठे भी हो तब भी पाली ग्रंथों में मिलता है कि भगवान अपनी गंधकुटी मे विहार करते थे । विहार निष्क्रिय शब्द नहीं है। यह सक्रिय और गत्यात्मक शब्द है अर्थात इसमें गति है।

🌷 नमोतस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्य। 🌷

समाजवादी, बुद्धिप्रामाण्यवादी, समतावादी वीरपुरूष भगतसिंग!

जन्म : 28 सप्टेंबर 1907, मृत्यू : 23 मार्च 1931.

-डॉ.श्रीमंत कोकाटे

वयाच्या विशीतच ज्यांच्याकडे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील परिपक्वता आलेली होती, असे महान देशभक्त क्रांतिकारक भगतसिंग यांचा जन्म 28 सप्टेंबर 1907 रोजी आताच्या पाकिस्तानातील व पूर्वीच्या अखंड भारतातील पंजाब प्रांतातील बंगा, जिल्हा लालपुर येथे एका सधन कुटुंबामध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सरदार किशनसिंग तर आईचे नाव विद्यावती होते. संपूर्ण परिवार हा स्वातंत्र्यविचाराने भारावलेला होता. आजोबा, वडील, चुलते अजितसिंग हे स्वातंत्र्य लढ्यामध्ये अग्रभागी होते. भारतीय स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या गदर पार्टीमध्ये ते सक्रिय होते. भगतसिंगाचे जन्म नाव भाग्यवंत असे होते. त्यांच्या आजीने भाग्यवंत असे नाव ठेवले होते. भाग्यवंत याच नावाचा अपभ्रंश पुढे भगतसिंग असा झाला.

भगतसिंगाच्या घरचे वातावरण स्वातंत्र्याने भारावलेले असल्यामुळे स्वाभाविकपणे स्वातंत्र्यलढ्याचे बाळकडू भगतसिंगांना वाडवडिलांकडूनच मिळाले. बालवयापासूनच त्यांना दर्जेदार नियतकालिके, दर्जेदार ग्रंथ वाचण्याची संधी मिळाली. भगतसिंगाचे वाचन अफाट होते. त्यांच्या ज्ञानाचा परिप्रेक्ष केवळ एका जाती, धर्म, पंथ, प्रांत, देशापुरता मर्यादित नव्हता, तर त्यांच्या ज्ञानाचा व्यासंग वैश्विक पातळीवरचा होता. त्यामुळेच बालपणापासून ते छत्रपती शिवाजी महाराज, गॅरिबाल्डी, मार्क्स, लेनिन, मॅजिनी इत्यादी महापुरुष वाचू शकले.

भगतसिंग कुमार वयामध्ये जसे आक्रमक, भावनिक होते, तसेच ज्ञानाने आणि विचाराने अत्यंत परिपक्व होते. लाहोरच्या नॅशनलमहाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असतांना देशांमध्ये घडणाऱ्या घडामोडींचा त्यांच्या कुमार वयावर्ती परिणाम होत होता. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी इंग्रजांच्याविरुद्ध जालीयनवाला बागेमध्ये क्रांतिकारकांचा मेळावा चालू असतांना जनरल डायर या निर्दयी इंग्रज अधिकाऱ्याने जालीयंनवाला बागेमध्ये देशभक्तांवरती बेच्छूट गोळीबार केला. त्यामधे असंख्य निरपराध स्वतंत्र्यप्रेमी मारले गेले. ही वार्ता ज्या वेळेस देशभर पसरली, या घटनेचा भगतसिंगाच्या मनावरती खोल परिणाम झाला.

आपल्या देशबांधवांना मारणाऱ्या निर्दयी इंग्रजांविरुद्ध आपण लढा उभारणार, हा दृढनिश्चय भगतसिंगांनी केला. त्यांच्या गावापासून जवळच असलेल्या अमृतसर या ठिकाणच्या जालीयनवाला बागेला भगतसिंग यांनी भेट दिली. तिथली क्रांतीची मूठभर माती मस्तकाला लावली. ती माती सोबत घेऊन आले. ती केवळ माती नव्हती तर क्रांतीची ज्वाळा होती. मी. गांधी यांनी पुकारलेल्या अहिंसक मार्गाच्या आंदोलनामध्ये भगतसिंग सहभागी झाले. परंतु चौरीचौरा येथील घटनेमध्ये गांधीजीने घेतलेल्या भूमिकेमुळे भागतसिंग आणि गांधी यांच्यामध्ये मतभेद झाले.

मी. गांधी यांच्याबद्दल आदर बाळगून भगतसिंगांनी सशस्त्र स्वतंत्र्यलढ्याचा मार्ग स्वीकारला. महाविद्यालयामध्ये शिकत असतांना त्यांनी तरुणांचे संघटन उभारले. *नवजवान भारत सभा* या नावाची संघटना त्यांनी सुरु केली. स्वातंत्र्यप्राप्तीच्या विचाराने भरवलेल्या तरुणांना त्यांनी देहभक्तीचे धडे दिले. इंग्रजांविरुद्ध आपण का लढावे? हे त्यांनी समजावून सांगितले. भारतीय शेतकरी, उपेक्षित, वंचित, कामगार, यांच्या प्रश्नावरती त्यांनी आवाज उठवीला. भारतीय शेती आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी *कीर्ति किसान पार्टी* ची स्थापना केली.

भगतसिंग यांनी चंद्रशेखर आझाद, सुखदेव, राजगुरू, बटुकेश्वर दत्त, इत्यादी सहकाऱ्यांच्या मदतीने *हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोशियशन* ची स्थापना केली. भागतसिंग जसे स्वातंत्र्ययोधे होते, तसेच ते समाजवादी, प्रागतिक, बुद्धीप्रामान्यवादी, समतावादी, विचारांचे होते. त्यांचा राष्ट्रवादी विचार हा सनातनी पायावरती उभा नव्हता, तर तो संतावादी, बुद्धीप्रामान्यवादी, समाजवादी या प्रागतिक विचारावरती उभारला होता. महाराष्ट्रात क्रांतिसिहं नाना पाटील यांच्या परिवाराने जे कार्ये केले तेच भगतसिंग यांच्या परिवाराने पंजाबमधे केले.

भगतसिंग यांनी पत्रकारितेसाठी देखील लेखन केले होते. *अकाली* सारख्या नामांकित नियतकाळिकासाठी त्यांनी लेखन केले होते. बेळगाव या ठिकाणी 1924 साली झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिबेशनासाठी ते उपस्थित होते. अधिवेशन संपल्यानंतर छत्रपती शिवाजी राजांचा वैभवशालीक्रांतिकारक वारसा पाहण्यासाठी ते रायगडावराती आले होते. छत्रपती शिवाजीराजांच्या प्रती त्यांना नितांत आदर होता.

भगतसिंग यांची विचारधारा अत्यंत प्रागतिक होती. त्यांनी घेतलेले निर्णय अत्यंत विचारपूर्वक घेतले होते. त्याच्या स्वातंत्र्य लढ्याला तात्विक अधिष्ठान होते. हे त्यांनी वेळोवेळी लिहिलेल्या लेखातून, पत्रातून आणि पुस्तकातून स्पष्ट होते. त्यांची स्वतंत्र्याबाबतची संकल्पना अत्यंत व्यापक होती. शोषण करणारा इंग्रज जसा आपला शत्रू आहे, तासाच एखादा भांडवलदार नेता जर का कामगारांचे शोषण करत असेल, तर तो पण भारतीयांचा शत्रू आहे. ही भगतसिंग यांची भूमिका होती.

सरंजामदार-भांडवलदारांचे नव्हे तर इथल्या कष्टकरी, श्रमकरी, कामगारांचे राज्य आले पाहिजे, ही भगतसिंगांची भूमिका होती. भागतसिंग हे अत्यंत प्रगल्भ विचारांचे होते. त्यांना झुंडशाही मान्य नव्हती. त्यांना भोळेपणा-भाबडेपणा मान्य नव्हता. त्यांना गुलामगिरी मान्य नव्हती. त्यांना व्यक्तीपूजा मान्य नव्हती. त्यांना घराणेशाही, भ्रष्टशाही नेत्यांची लाचारी मान्य नव्हती. भारतीय नागरिक हा स्वाभिमानी, हिम्मतवान, निर्भीड, लढवैय्या, स्वावलंबी, वैचारिक असावा हा त्यांचा आग्रह होता.

मी नास्तिक का आहे? या आशयाचे भगतसिंग यांनी पुस्तक लिहिले. भारतीय परिप्रेक्षात आस्तिक असण्यासाठी वैचारिकता असावीच लागते,असे नाही, आस्तिकपणा हा बहुतांश लोकांना वारशानेच मिळतो. मात्र नास्तिक असण्यासाठी प्रगल्भता, प्रामाणिकपणा, वैचारिकता, अफाट वाचन, तार्कीकता, बुद्धिमत्ता अर्थात बुद्धीप्रामान्य लागते. अनेकांना वारसानेच आस्तिक विचारधारा लाभते. परंतु नास्तिक असण्यासाठी कठोर वैचारिकपरिश्रम करावे लागतात. ते कठोर वैचारिक परिश्रम भगतसिंग यांनी केले होते. आस्तिकता म्हणजे ईश्वराच अस्तित्व मान्य असे नाही, तर अस्तिकतेचा संबंध ग्रंथप्रामाण्यांशी आहे. तात्पर्य आस्तिक असण्यासाठी अक्कल लागत नाही, पण नास्तिक असण्यासाठी मात्र ती निश्चितच लागते.

भगतसिंग म्हणतात, स्वर्ग-नर्क, पूर्वजन्म-पुनर्जन्म, आत्मा, पाप-पुण्य, चौऱ्यांशी लक्ष योनींचे फेरे, मोक्ष या बाबींवर विश्वास ठेवणे, हा मूर्खपणा आहे. संकटसमयी संकटाला सामोरे जाण्याऐवजी ईश्वराची भक्ती करणे हा पळपुटेपणा

आहे. स्वातंत्र्यासाठी लढणे हा जिवंतपणा आहे. आणि गुलामगिरीमध्ये राहणे हाच खरा मृत्यू आहे. स्वातंत्र्यासाठी लढा देणे हेच खरे शौर्य आहे. हे दुःख आमच्या नशिबातच आहे असे म्हणणे हा शुद्ध भित्रेपणा आहे. असे भगतसिंगाचे प्रागतिक विचार आहेत.

देशाची सत्ता श्रमकरी, कष्टकरी, कामगारांच्या हाती राहिली पाहिजे, ती भांडवालदार किंवा नवसरंजामदार यांना उपभोगण्याचा अधिकार नाही. कारण कामगार, शेतकरी, श्रमकरी हाच वर्ग उत्पादक वर्ग असतो. नवसरंजामदार, भांडवालदार आणि सणातनी लोक हे ऐतखावू असतात, त्यामुळे त्यांना सत्ता गाजावण्याचा-वापरण्याचा नैतिक अधिकार नाही, असे अत्यंत दयाळू विचार भगतसिंगांचे होते. भगतसिंग जसे जुलमी इंग्रजांच्याविरुद्ध होते तसेच ते भारतातील नवसरंजामदार आणि भांडवलदारांच्या देखील विरोधात होते. ते जसे नास्तिक होते, तसेच ते समाजवादी, दयाळू, कम्युनिस्ट, आणि प्रागतिक विचारांचे होते.

वेगवेगळ्या माध्यमातून इंग्रजांना सळो की पळो करून सोडणे, समाजामध्ये जाणजागृती करणे, हे भगतसिंगांचे कार्य सुरु होते. दरम्यानच्या काळात 1928 साली सायमन कमिशन भारतात आले. भारतीय लोकांना सत्तेतील वाटा द्यावा, हा त्यांचा हेतू होता. परंतु त्या सायमन कमिशनवरती एकही भारतीय सदस्य नव्हता. त्यामुळे भारतातून सायमन कमिशनला विरोध झाला. गो बॅक सायमन! हा नारा भारतीयांनी दिला. या कमिशनविरुद्ध पंजाबचा सिंह लाला लाजपतराय पुढे आले. इंग्रजांनी आंदोलनकर्त्यांवर लाठीमार केला. त्यामध्ये लाला लजपतराय जखमी झाले आणि पुढे त्यातच त्यांचा अंत झाला. याविरुद्ध मोठा देशभर मोठा असंतोष मिर्माण झाला. या घटनेने भगतसिंग आणि त्यांचे सहकारी प्रचंड अस्वस्थ झाले.

लाठीहल्ला करणाऱ्याना धडा शिकवायचा या उद्देशाने भागतसिंग आणि त्यांच्या साथीदारांनी सॉंडर्श या इंग्रजी अधिकाऱ्यावर हल्ला केला, त्यातच या इंग्रजी अधिकाऱ्याचा अंत झाला. केंद्रीय कायदेमंडळात भारतीयांच्या विरोधात काही कायदे पास होत होते. याला विरोध करण्यासाठी भगतसिंग आणि त्यांचे सहकारी दिल्लीतील सेंट्रल हॉलमध्ये पोहोचले. कोणीही जखमी होणार नाही अशी खबरदारी घेऊन भगतसिंगांनी त्या ठिकाणी बॉम्ब टाकले आणि पत्रके भिरकावली. पळून न जाता भगतसिंग आणि त्यांचे सहकारी त्या ठिकाणी थांबले. त्या बॉम्ब हल्यात कोणीही जखमी झाले नाही. प्रतिकात्मक निषेध करण्यासाठी भगतसिंगांनी ही कारवाई केली होती.

इंग्रज पोलिसांनी भगतसिंग आणि त्यांच्या साथीदारांना पकडले. पुढे त्यांच्यावरती खटला दाखल झाला. न्यायाधीशांनी त्यांना फासीची शिक्षा सुनावली. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फासी होवू नये. यासाठी मी. गांधी आयर्विनला भेटले. अनेक शिष्टमंडळाने इंग्रज सरकारवरती दबाव आणला, पण इंग्रज न्यायव्यवस्था आणि प्रशासन फासी देण्यावरती ठाम होते. फासी रद्द करण्यासाठी इंग्रजांना साकडे घालणे भगतसिंग यांना मान्य नव्हते.

भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू दोन वर्षे तुरुंगात होते. तुरुंगात असतांना भगतसिंग यांनी अफाट वाचन केले, लेखन केले, पत्र लिहिली. आपण स्वातंत्र्यासाठी लढलो, आपल्याला फासी होणार आहे, याबद्दल त्यांना यत्किंचितही

पश्चाताप नव्हता, जराही भीती नव्हती. ते अत्यंत निर्भीड, बाणेदार, स्वाभिमानी, आणि तत्वनिष्ठ होते. भगतसिंग यांनी तुरुंगात असतांना साठ दिवसाचे उपोषण केले.

भगतसिंग आणि त्यांच्या साथीदारांना 24 मार्च 1931 रोजी फासी देणार होते. परंतु त्याच्या आदल्या दिवसीच्या 23 मार्च रोजी फासी देण्याचा निर्णय इंग्रजी अधिकाऱ्यांनी घेतला. लाहोरच्या जेलमध्ये ज्या ठिकाणी फासी देण्यात येणार होती, त्या ठिकाणचे अधिकारी पहाटे भगतसिंग यांना उठविण्यासाठी गेले, तर भगतसिंग जागेच होते. ते लेनिनचे चरित्र वाचित होते. अधिकाऱ्यांनी भगतसिंग यांना सांगितले, *चला फासीची वेळ झालेली आहे.* तेव्हा भगतसिंग निर्भीडपणे त्या इंग्रज अधिकाऱ्यांना म्हणाले, *थांबा, दोन क्रांतिकारकांचा संवाद सुरु आहे.* ते लेनिनचे चरित्र वाचत होते. शेवटची दोन पान राहली होती. भगतसिंग यांनी ती वाचून पूर्ण केली. वाचून झाल्यावर ते फासाकडे निघाले. ते रात्रभर न झोपता, निराश, हताश न होता, देशासाठी निर्भीडपणे शेवटपर्यंत लढले.

भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना 23 मार्च 1931 रोजी लाहोरच्या तुरुंगात फासी दिली. हे तीन देशभक्त हसत-हसत आनंदाने भारतीय स्वातंत्र्यासाठी फासावरती चढले. याप्रसंगी भगतसिंगांचे वय फक्त 23 होते. भगतसिंग म्हणाले होते की, *मृत्युनंतर आत्मा देखील तिथेच मरतो, तो पुनर्जन्म घेत नाही. याच जन्मामध्ये कर्तृत्व गाजवा.* असा क्रांतिकारक प्रगल्भ विचार देणारा तरुण महामानव म्हणजे भगतसिंग! यांच्या जयंतीनिमित्ताने या तरुण महायोध्याला विनम्र अभिवादन!

डॉ. श्रीमंत कोकाटे.

ब्राम्हण कन्या एकता जोशी

ब्राह्मण समाजातील नागपूर येथील एकता जोशी या ताईंनी स्वतःचे नाव व पत्ता देवून हा लेख लिहिला आहे. अवश्य वाचा तुम्हांला सत्य काय हे माहीत पडेल आणि तुमच्या मनातील शंका दूर होईल. एवढे सर्व बिनदिक्कत सर्वांच्या समोर त्यांनी मांडून शेवटी दुर्दम्य आत्मविश्वास प्रगट केलाय की मी टाहो फोडून जरी हे सांगतेय तरी डोळ्यावर पद्धतशीर कातडे ओढून बसलेला बहुजन समाज हे मानायला तयार होणार नाही!!!

या ताईचे मनःपूर्वक अभिनंदन खूप छान माहिती दिल्याबद्दल धन्यवाद!!!

🙏🙏🙏

मी ब्राम्हण समाजातील नागपूरची महिला एकता जोशी...

आम्हांला हे माहीत आहे की जगात देव वगैरे काही नाही. पण आम्ही सतत लोकांना देवदेव करायला सांगतो, कारण त्याने आमचे पोट भरते.

खर सांगून दमडीही कुणी देत नाही. खोटं सांगून हजारो रुपये मिळतात.

पूजा, पाठ, अभिषेक, आशीर्वाद, वरदान, हस्त, पुण्य, मोक्ष हे सर्व निखालस खोटे आहे, वर स्वर्गही नाही आणि नरकही नाही.

काल्पनिक नरक आम्हीच निर्माण केला लोकांना भीती दाखवण्यासाठी.

आम्हीच नवीन पंथाची, नवनवीन पूजांची निर्मिती करतो. लोकांनाही नवीन पाहिजे असते.

खर सांगू भारतात इतके मूर्ख लोक आहेत की जगात कुठेही नाहीत. आम्ही जे सांगू ते पटकन् मानतात, थोडीही चिकित्सा करत नाहीत, चौकशी करत नाही.

आम्ही ब्राह्मण कधीही वारीत जात नाही. आम्हांला माहीत आहे वारीत जाऊन नसलेल्या देवाचे दर्शन घ्यायचे. देव दर्शनाने कधीच काही होत नाही.

जोपर्यंत वेडे लोक हिंदू धर्मात आहेत, तोपर्यंत आमचा धंदा चालणार व आम्ही चालवणार.

फुकटचा पैसा मिळतो. माझे आजोबा माझ्यापेक्षा जास्त पैसे घरी आणतात.

मी वकील असूनही कमी पैसे कमावते. अंघोळ करणे संध्यापाठ करणे, सोवळे हे फक्त आमचे महत्त्व वाढविण्यासाठी असते.

आम्हांला दान सर्व थरांतील लोकांचे चालते. माग तो अस्पृश्य असो वा इतर धर्माचा असो. काहीच फरक पडत नाही.

आरत्या, पंचारत्या, गणपति, दुर्गा हे सर्वकाही खोटे आहे. साधा विचार लोक करित नाहीत.

आपणाच गणपतिला वाजवतगाजवत आणतो आणि वाजवतगाजवत पाण्यात बुडवतो. काय हे?

पण लोक एवढे अंध झाले आहेत की अजून शंभर वर्षे तरी सुधारणार नाहीत.

आमचा धंदा चालणार, आम्हाला काहीच करायची गरज नाही. कारण सर्व जातीच्या महिला आमच्या ताब्यात आहेत. त्या नवऱ्याचे ऐकत नाहित, पण आमचे ऐकतात...

आम्ही सांगितलेली कोणतीही पूजा त्या करतातच. आम्ही प्रत्येकाच्या डोक्यात देव घातलेला आहे तो कधीच बाहेर निघणार नाही आणि आमची दुकानदारी चालतंच राहणार आहे.

बरेच देव न मानणारे अलीकडे रात्रंदिवस बोंबलत आहेत. पण त्यांचे त्यांच्या घरातील लोकसुद्धा ऐकत नाहीत.

आम्ही देवाच्या कहाण्या दूरदर्शनद्वारे, पुस्तकाद्वारे, चॅनेलद्वारे, सतत लोकांना... विशेषतः बायकांना एकवत असतो व त्यांच्या डोक्यात देव घालत असतो. (येथे ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे; बाबासाहेब म्हणतात की, *स्त्री मानसिक गुलाम तर येणारी पिढी गुलाम.* पण स्त्रिया ऐकत नाहीत.)

अहो, संगणकाची पूजा करतात यावरून किती आंधळे लोक आहेत या देशाचे हे समजते.

मी ब्राम्हण आहे. ब्राम्हणचा अर्थ आहे, *कुणालाही ब्र बोलू द्यायचे नाही, फक्त आपलेच म्हणणे एकवायचे, म्हणजेच ब्राम्हण..!*

नास्तिक लोकांचे देव नाहीत हे 100% खरे आहे. पण त्यांचे ऐकतो कोण! त्यांची बायकोसुद्धा ऐकत नाही.

खरेतर आम्हाला धर्माचे, देवाचे काही देणेघेणे नाही. आम्हाला काबाडकष्ट, मेहनती काम करायचे नव्हते. हिंदू (गुलाम, खाल्चे परशियन अर्थ) धर्मात अनेक वेडे आहेत, त्यांच्यामुळे आम्हाला फुकटचे खायला मिळते.

आम्ही हिंदू लोकांना आत्तापर्यंत गेल्या पाच हजार वर्षांपासून मूर्ख बनवत आलो आहोत, अजूनही बनविणे चालू आहे.

कितीही शिकले तरी यांची चौकस बुद्धी जागृत झाली नाही.

आमचा अडथळा इंग्रज होते. ते हिंदूंना शिक्षण देऊन जागृत करू लागले होते. पण आम्ही त्यांना पिटाळून लावले व आमचे राज्य आणले.

त्या आंबेडकरांनी थोडा प्रॉब्लेम केला होता. त्यांना आम्ही धर्मातून काढले. झाले काम!

हे हिंदू रोज देवदेव करणार! आम्ही 3% आहोत, 97% हिंदूंनी रोज एक रुपया जरी देवासाठी खर्च केला, तरी आमच्याइतके श्रीमंत जगात कुणीही नाही.

किती मूर्ख लोक आहेत, आमच्या पाया पडून दक्षिणा देतात.

आम्ही नेहमीच म्हणतो, देव सगळीकडे आहे. ते खरेच आहे.

गेली 70 वर्षे आमचीच सत्ता आहे. काँग्रेस आमचीच आहे... भाजप आमचाच आहे... शिवसेना आमचीच आहे... कम्युनिष्ट आमचेच आहेत... आम्ही भांडायचे नाटकें करत असतो. आम्हाला जगावर राज्य करायचे आहे.

आम्ही समोरासमोर कधीच भांडत नाहीत. आम्ही आतून पोखरतो व खतम करतो आणि पोखरणारे हात तुमचेच वापरतो.

आम्ही सगळीकडे आहोत आणि राहू.

परत मी *ब्राम्हण* असून ठासून सांगते, *देव नाहीच.* पण तुम्ही मानणार नाही. आता तुम्हीच ठरवा.

आम्हाला कुणी शिवीगाळ केली की, हेच SC, ST, OBC, VJNT, मराठा लोक आपापसात भिडतात, एकमेकांचे खून करायला मागेपुढे पाहत नाहीत. हेच आमचे बिनपगारी पोलीस आहेत.

देव, देऊळ आणि धर्म आमचा हजारो वर्षांपासूनचा एकमेव अजेंडा आहे.

ही पोस्ट आता जो वाचत आहे त्याचेही डोकं ठणकलं असेल, तर तो आमचा सच्चा बिनपगारी पोलीस आहे आणि ह्या अशा आमच्या भक्तांमुळे आम्ही हजारो वर्षे ह्या देशावर राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, प्रचार प्रसार, औद्योगिक, न्यायविषयक सत्ता भोगत राहू.

एकता जोशी

बंगला नं. 85, रेशीम बाग, नागपूर

आनंद माधने..... दि. 28/09/2022

सम्राट अशोक की जन्म जयंती हमारे देश में नहीं मनाई जाती

बहुत सोचने पर भी उत्तर नहीं मिलता! आप भी इन प्रश्नों पर विचार करें!

१. जिस सम्राट के नाम के साथ संसार भर के इतिहासकार "महान" शब्द लगाते हैं;

२. जिस सम्राट का राज चिन्ह "अशोक चक्र" भारतीय अपने ध्वज में लगते है;

३. जिस सम्राट का राज चिन्ह "चारमुखी शेर" को भारतीय राष्ट्रीय प्रतीक मानकर सरकार चलाते हैं, और "सत्यमेव जयते" को अपनाया है;

४. जिस देश में सेना का सबसे बड़ा युद्ध सम्मान सम्राट अशोक के नाम पर "अशोक चक्र" दिया जाता है;

५. जिस सम्राट से पहले या बाद में कभी कोई ऐसा राजा या सम्राट नहीं हुआ, जिसने अखंड भारत (आज का नेपाल, बांग्लादेश, पूरा भारत, पाकिस्तान, और अफगानिस्तान) जितने बड़े भूभाग पर एक-छत्र राज किया हो;

६. सम्राट अशोक के ही समय में २३ विश्वविद्यालयों की स्थापना की गई, जिसमें तक्षशिला, नालन्दा, विक्रमशिला, कंधार आदि विश्वविद्यालय प्रमुख थे! इन्हीं विश्वविद्यालयों में विदेश से छात्र उच्च शिक्षा पाने भारत आया करते थे;

*७. जिस सम्राट के शासन काल को विश्व के बुद्धिजीवी और इतिहासकार भारतीय इतिहास का सबसे स्वर्णिम काल मानते हैं

८. जिस सम्राट के शासन काल में भारत विश्व गुरु था, सोने की चिड़िया था, जनता खुशहाल और भेदभाव-रहित थी;

९. जिस सम्राट के शासन काल में सबसे प्रख्यात महामार्ग "ग्रेड ट्रंक रोड" जैसे कई हाईवे बने, २,००० किलोमीटर लंबी पूरी सडक पर दोनों ओर पेड़ लगाये गए, सरायें बनायीं गईं, मानव तो मानव, पशुओं के लिए भी प्रथम बार चिकित्सा घर (हॉस्पिटल) खोले गए, पशुओं को मारना बंद करा दिया गया;

*१०. ऐसे महान सम्राट अशोक, जिनकी जयंती उनके अपने देश भारत में क्यों नहीं मनायी जाती, न ही कोई छुट्टी घोषित की गई है?

दुःख है की जिन नागरिकोंको ये जयंती मनानी चाहिये, वो अपना इतिहास ही भूला बैठे है, और जो जनते है वो ना जाने क्यों मनाना नाही चाहते.*

तथ्य निमनलिखित हैः-

जन्म : ४ मार्च; जन्म वर्ष : इ. स. पूर्व ३०२; राजतीलक : इ. स. पूर्व २६८; देहावसान : इ. स. पूर्व २३२; पिताजी का नाम : बिंदूसार; माताजी का नाम : सुभद्राणी.

११. "जो जिता वही चंद्रगुप्त" ना होकर "जो जिता वही सिकंदर" कैसे हो गया...?

जबकी ए बात सभी जनते है की सिकंदर की सेना ने चंद्रगुप्त मौर्य के प्रभाव को देखते हुये ही लढणे से मना कर दिया था! बहुत ही बुरी तरह से मनोबल टूट गया था! और वापस लौटना पडा था|

प्रयास करे की अपने संस्थान मे आगामी ४ मार्च सम्राट अशोक जन्मदिनके रूप में सम्मान व उत्साह के साथ मनाया जाये!!

अस्पृश्यतेचा विरोध

महाडचा सत्याग्रह: इ. स. 1926 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबई प्रांतिक विधानपरिषदेचे नेमलेले सदस्य बनले. इ. स. 1927 च्या सुमारास त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध जागृत चळवळ सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी पिण्याच्या पाण्यासाठी व हिंदू देवळांमध्ये प्रवेशासाठी चळवळी व मोर्चे काढण्यास सुरुवात केली. संपुर्न देशात बहुसंख्य ठिकाणी अस्पृश्यांना सार्वजनिक पानवठ्यावर पाणी भरण्याचा किंवा पिण्याचा अधिकार नव्हता. 4 ऑगस्ट 1923 रोजी

ब्राम्हणेत्तर पक्षाचे नेते सी. के. बोले यांनी मुंबई प्रांताच्या विधिमंडळात एक ठराव पास करून घेतला. त्यानुसार सार्वजनिक निधीतून बांधलेली किंवा शासकीय नियमानुसार बनविलेल्या संस्थांनी प्रशासित केली सार्वजनिक शाळा, न्यायालये, कार्यालये आणि दवाखाने व सर्व सार्वजनिक पाण्याची ठिकाणे, विहिरी व धर्मशाळांचा वापर करण्यास परिषदेने अस्पृश्य वर्गांना परवानगी दिली आहे. या ठरवानुसार महाडच्या नगरपालिकेने आपल्या तब्यातील चवदार तळे अस्पृश्यांना खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी अस्पृश्यांना तळ्यातून पाणी भरू दिले नाही. त्यामुळेच अस्पृश्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी महाड येथे पिण्याच्या पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरविले. बाबासाहेबांनी 19 मार्च व 20 मार्च 1927 ला महाड येथे कुलाबा परिषद भरविली, अध्यक्ष स्वतः बाबासाहेब होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकावड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधरपंत सहसत्रबुद्धे आणि बापूराव जोशी हे दलितेत्तर संवर्ण व ब्राम्हण नेते होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करून पुढील ठराव पास केले. स्पृश्य (संवर्ण) लोकांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे. स्पृश्य लोकांनी अस्पृश्यांना त्यांचे नागरिकत्वाचे अधिकार बजाविण्याच्या कामात मदत करावी. मृत जनावरे ज्यांची त्याने ओढावी. स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे. 20 मार्च 1927 रोजी परिषदेतील सर्वांनी आपला मोर्चा चवदार तळ्याकडे वळवीला. बाबासाहेब सर्वप्रथम तळ्यातील पाणी ओंजळीने प्याले, त्यानंतर आंबेडकरानुयायांनी त्यांचे अनुकरण केले. ही घटना रूढीवादी हिंदूंना सहन झाली नाही. त्यांनी दलितांसाठीच्या भोजनात माती मिसळली त्यानंतर दलितांवर लाठ्या काठ्यांनी हल्ले केले आणि अस्पृश्यांनी तळे बाटविले असे म्हणून त्यात गोमूत्र टाकून तळ्याचे ब्राम्हणांकडून शुद्धीकरण केले. पुढे महाडच्या नगरपालिकेने अस्पृश्यांना चवदार तळे खुले केल्याचा ठरावही रद्द केला.

बहिष्कृत हितकारिणी सभा: बाबासाहेब आंबेडकरांनी 20 जुलै 1924 रोजी मुंबई येथे बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. समाजिक व राजकीयदृष्ट्या तळागाळात फेकल्या गेलेल्याना भारतीय समाजातील इतरांच्या बरोबर आणणे, हे या सभेचे ध्येय्य होते. अस्पृश्यांना समाजाबाहेर ठेवून त्यांना नागरी, धार्मिक वा राजकीय हक्क देण्यात आले नव्हते. त्यांच्या अधिकारांप्रती त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करणे हा उद्देश होता. आंबेडकरांनी सायमन कमिशनकडे एक पत्र सादर केले व त्यात त्यांनी मागासवर्गीयांसाठी नामनिर्देशन तत्वावर जागा आरक्षित ठेवण्यासंबंधी मागणी केली. तसेंच भुदल, नौदल व पोलीस खात्यात मागासवर्गीयांची भरती करण्यासंबंधीचिही मागणी केली होती. सभेमार्फत अस्पृश्यांच्या कल्याणासाठी शाळा, वसतिगृहे व ग्रंथालये सुरु करण्यात आली.

मनुस्मृतिकाराची चुक: शूद्रांवर कश्या प्रकारचे अन्याय ब्राम्हणी हिंदू वांमयाने वा शास्त्राने केलेले आहेत, ते थोडक्यात खाली दिलेले आहेत. स्मृतिकाराने अस्पृश्यांवर केलेल्या अन्यायाची जंत्री म्हणून मनुस्मृतीचा उल्लेख करावा लागेल. समाजात शूद्राचे स्थान सर्वांच्या पायदळी असावे. शूद्र अपवित्र असल्यामुळे कोणतेच धार्मिक पवित्र कार्ये त्याची उपस्थितीत करू नये. इतर वर्गाप्रमाणे त्याला मान देऊ नये. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य यांच्या जीवासारखी शुद्राच्या जीवास एका कवडीचीपण किंमत नाही. कसल्याच प्रकारची नुकसान भरपाई न देता शूद्राचा जीव घेण्यास

कसलीही आडकठी असू नये. शूद्राने शिक्षण घेऊ नये. त्यांना शिक्षण देणे हे पाप आहे. शूद्राने कसल्याच प्रकारची संपत्ती कमविण्याचा हक्क नाही. जर ब्राम्हणास आवश्यक असेल तर ते शूद्रांची कमविलेली संपत्ती घ्यावी.

सरकार दरबारी शूद्रास नोकरीस ठेवू नये. वरिष्ठ वर्गाची सेवाचाकरी हेच शूद्रांचे मुख्य कर्तव्य आहे. हाच त्याचा धर्म आहे आणि त्यातच त्यांची मुक्ती आहे. उच्चवर्नियांनी शूद्रांशी आंतरजातीय विवाह करू नयेत. शूद्रांची स्त्री रखेल म्हणून ते ठेवू शकतात. उच्चवर्णीय स्त्रीस शूद्राने नुसता स्पर्श जरी केला तरी, त्यास जबर शिक्षा करावी. शूद्राचा जन्म गुलामगिरीत होतो आणि त्याने गुलामगिरीतच मारावे.

मंदिर सत्याग्रह: अमरावती येथील प्राचीन अंबादेवी मंदिरात प्रवेशासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा सत्याग्रह डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली 26 जुन 1927 रोजी सुरु झाला. देवाच्या दर्शनासाठी हा मंदिर सत्याग्रह नव्हता तर हिंदू असूनही हिंदूंच्या मंदिरात प्रवेश मिळत नसल्यामुळे तो समानतेचा अधिकार मिळविण्यासाठी ऐक मंदिर प्रवेशाचा संघर्ष होता. हिंदू दलितांच्या मंदिर प्रवेशामुळे मंदिर व मंदिरातील मूर्ती अपवित्र वा अशुद्ध होत नाही, हेही सिद्ध करण्याचा हेतू या चळवळीमागे होता. या मंदिरात प्रवेश देण्यात यावा यासाठी अस्पृश्यांनी देवस्थान कमिटीकडे दोनवेळा अर्ज केला. सुरुवातीला अर्ज फेटाळळ्या गेले नंतर मात्र देवस्थानचे एक विश्वस्थ दादासाहेब खापर्डे यांनी अस्पृश्यांना हे मंदिर खुले करून देण्याचे आश्वासन दिले.

अमरावती नंतर पुण्यातील पर्वती टेकडीवरील मंदिर अस्पृश्यांना खुले नव्हते. हा बाबासाहेबांचा दुसरा मंदिर सत्याग्रह आहे. हे मंदिर दलितांसाठी खुले करावे म्हणून पुण्यातील एम. एम. जोशी, ना. ग. गोरे, र. के. खाडिलकर व शिरूभाऊ लिमये यांनी मंदिराच्या ट्रस्टला अर्ज केला. परंतु मंदिर खाजगी मालमत्ता असल्याचे सांगून अर्ज फेटाळल्या गेला. यानंतर सत्याग्रह मंडळ स्थापन केले गेले. त्यात शिवराम कांबळे (अध्यक्ष), पां. ना. राजभोज (उपाध्यक्ष), व इतर सभासदांचा सहभाग होता. या सर्वांनी 13 ऑक्टोबर 1929 रोजी पुणे पर्वती सत्याग्रह सुरु केला. यात शिवराम कांबळे, एम.एम. जोशी, ना. ग. गोरे, र. के. खाडिलकर, विनायक भुस्कुटे, पां. ना. राजभोज व स्वामी योगानंद यंच्यासहित अनेक स्त्री पुरुषांनी सत्याग्रहात भाग घेतला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक या ठिकाणी काळाराम मंदिर सत्याग्रहाची घोषणा केली. 2 मार्च 1930 सत्याग्रहाची तारीख निश्चित झाली. सत्याग्रही कमिटीचे अध्यक्ष म्हणून केशव नारायण वर्धेकर उर्फ बुवा यांची निवड केली. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सचिव होते, नाशिकचे शंकरारव गायकवाड हे सभासद होते. शंकरराव गायकवाड हे मूळचे निफाड तालुक्यातील राहिवसी होते, परंतु नाशिकला मोठा राजवाडा परिसरात स्थायिक झाले होते. रामकुंडात उडी घेऊन सत्याग्रह यशस्वी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. 2 मार्च 1930 रोजी नाशिकमध्ये आठ हजार महार सत्याग्रहासाठी हजर होते. ते मंदिराच्या सर्व दरवाज्यासमोर थांबले होते. या सत्याग्रहात नशिकसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक जमा झाले होते. डॉ. आंबेडकरांनी जिल्हाधिकाऱ्यांना जोपर्यंत देवळाचे दरवाजे बंद असेपर्यंत सत्याग्रह सुरु राहील असे सुनावले होते. या सत्याग्रहात डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांच्या सोबत सहस्त्रबुद्धे, देवराव नाईक, डी. व्ही. प्रधान इत्यादी होते. मंदिराचे दरवाजे जिल्हाधिकाऱ्याच्या हुकुमावरून बंद करण्यात आले होते. आंबेडकरी तरुणाने रामकुंडात उडी घेतल्याची बातमी सर्वत्र पसरली. इंग्रज जिल्हाधिकारी गार्डन रामकुंडावर आले. परिस्थिती पाहून त्यांनी रामकुंड व राममंदिर जनतेसाठी खुले करण्याचे आश्वासन दिले. सत्याग्रह यशस्वी करणाऱ्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची मिरवणूक काढण्यात आली. मोठ्या राजवाड्याच्या परिसरातील जाहीर सभेत त्यांना बेलमास्तर ही पदवी बहाल करण्यात आली. सत्याग्रहाबद्दल गुन्हा दाखल झाल्यावर न्यायालयात त्यांना तुमचा जामीनदार कुठे आहे, अशी विचारणा करताच त्यांनी डॉ. बाबासाहे आंबेडकर माझे जामीनदार असून ते इंग्लडमध्ये आहेत, असे सांगितल्याने न्यायालयाने त्यांना सात दिवस साध्या कैदेची शिक्षा ठोठावली. डॉ. आंबेडकर यांनी भारतात परतल्यावर दादासाहेब गायकवाड, सावळीराम दानी, सखाराम वस्ताद काळे, तुळशीराम काळे, अमृतराव रणखांबे, रंगनाथ भालेराव, व भादुजी निकाळे यांच्या उपस्थितीत बेलमास्तरांचा सत्कार केला. कर्मवीर शंकरराव गायकावड यांचे 16 ऑक्टोबर 1956 ला निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ नाशिक पुणे रोडवर वडाळा नाक्यावरील चौकाचे भूतपूर्व नगराध्यक्ष डॉ. वसंतराव गुप्ते यांच्या हस्ते शंकरराव श्रावण गायकावड उर्फ बेलमास्तर चौक असे नामकरण करण्यात आले. इ. स. 1928 मधे बॉबे प्रेसिडेन्सी कमिटीवर आंबेडकरांची निवड करण्यात आली व त्यांनी सायमन कमिशनबरोबर काम केले.

भारतातील क्रांतिकारी नऊ देवींना शतशः नमन

ज्यांनी महिलांसाठी आपले संपूर्ण जीवन अर्पण केले आणि महिलांच्या सर्व प्रकारच्या कुप्रथा आणि बंद्या यापासून आजाद केले.

महाप्रजापती गौतमी तथागत तथागत बुद्धांची आई ज्यांनी महिलांच्या आजादीसाठी पहिले पुढाकार घेतला. त्यांनी तथागत बुद्धांना म्हटले जसे पुरुष ध्यान, योगाच्या माध्यमानी निर्वाणाला प्राप्त होऊ शकतात तसेच महिला पण निर्वाणाला प्राप्त करू शकतात. तथागत बुद्धांनी प्रजापती गौतमिचे वाक्य माणून भिक्षुनी संघाची स्थापना केली.

1. माता रमाई: महिला आज आजाद आहे या केवळ माता रामीचा त्याग आणि बलिदानाने, ज्यांनी आपल्या जीवनात दुःखात, गरिबीत, समस्येमध्ये, विषम परिस्थितीमध्ये जुळवून घेतले आणि आपले पती बाबासाहेब आंबेडकरांचे मनोबल वाढवत राहिली. ज्या कारणाने बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी संविधान आणि हिंदू कोडबील लिहिले.

2. माता सावित्रीबाई फुले: सावित्रीबाई फुले यांनी शेन, गाटा साहून महिलांना शिकविले आणि इतिहासात पहिली वेळ महिलांसाठी 18 महिला विद्यालये सुरु केले. स्त्री शिक्षण प्रतिबंध प्रथेला बंद केले.

3. फातिमा शेख: फातिमा शेखणे माता सावित्रीबाई फुले सोबत मिळून महिलांना शिकविले आणि शाळा सुरु करण्यासाठी जागेची व्यवस्था केली. पहिल्या मुस्लिम शिक्षिकेणे स्त्री शिक्षणावरील निर्बंध प्रथेला नष्ट केले.

4. झलकारीबाई: झलकारीबाईने राणी लक्ष्मीबाईचा जीव वाचविण्यासाठी राणी लक्ष्मीबाईचे वेषांतर करून इंग्रजांशी युद्ध केले. युद्धामध्ये आपल्या पतीचा मृत्यू झाल्यानंतर पण त्यांनी इंग्रजांशी युद्ध करणे सोडले नाही आणि याप्रकारे झलकारीबाईने राणी लक्ष्मीबाईचा जीव वाचवीला.

5. बहीण कुमारी मायावती: बहीण कुमारी मायावती चार वेळ उत्तर प्रदेशची मुख्यमंत्री राहिली. बहीण मायावती ह्या जगातील आठ सशक्त महिलांमध्ये गणल्या जातात. त्यांना आयर्न लेडीची उपाधी मिळाली आहे. बहीण मायावतीने लग्न नाही केले आणि आपले संपूर्ण जीवन महिलांना व बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी लावून दिले. आजपण वर्तमान काळात समाज आणि देशासाठी काम करत आहे.

6. फुलन देवी: फुलन देवी हिम्मत नाही हारली आणि आपल्या 22 बलात्काऱ्यांना डाकू बनून एकत्र गोळ्यांनी उडविले. फुलन देवी महिलांसाठी प्रेरणा होती कितीही विषम परिस्थिती असू द्या हिम्मत हरायला नाही पाहिजे. जेलमधून सुटल्यानंतर फुलन देवी राजनीती क्षेत्रात उतरून साँसदीय बनून समाजाची सेवा केली.

7. माता नागेली देवी: माता नागेली देवीने स्तन कर प्रथेला नष्ट करण्यासाठी आपले दोन्ही स्तन कापून ब्राम्हण सैनिकाला दिले ज्या कारणाने नागेलीचा जीव गेला. नंतर खूप मोठे आंदोलन झाले आणि स्तन कर प्रथा नष्ट झाली.

8. मीराताई आंबेडकर: मीराताई आंबेडकर आजपण वर्तमान काळात जे की बाबासाहेब आंबेडकरांचा मुलगा यशवंतरावाची पत्नी आहे. बाबासाहेब आंबेडकरांद्वारा स्थापित संस्था दी बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष आहे. मीराताई आंबेडकर महिलांसाठी प्रेरणा आहे. मीराताई आंबेडकर आजपण आपले सासरे आणि पती मेल्यानंतर पण मिशनला पुढे चालवत आहे.

9. रजिया सुल्तान: रजिया सुल्तान मुस्लिम शासक महिला आहे. मुस्लिम शासनात महिलांना राजगादीवर बसण्याचा अधिकार नव्हता जरी ति कितीही बुद्धिवान आणि कितीही बहादूर असो. रजिया सुलतानने आपली बुद्धी, विरतेच्या बळावर लोकांचे विचार बदलले आणि राजगादीवर बसण्याचा अधिकार मिळवीला. रजिया मुस्लिम प्रेरणा आहे महिलांसाठी की ति पण इतिहास बदलू शकते.

उपासक कसा असावा

बौद्ध म्हणजे बुद्धधम्म अनुयायी, परंतु प्रत्येक अनुयाई हा उपासक असेलच असे नाही. कारण उपासक बनन्यासाठी काही विशेष गुण व्यक्तीत असावे लागतात. गृहस्थ जीवनात राहून धम्माचे पालन व आचरण करणाऱ्या व्यक्तींना उपासक किंवा उपासिका असे म्हणतात. स्त्रियांना उपासिका व पुरुषांना उपासक असे म्हणतात.

धम्म रथाचे उपासक व भिक्षु असे दोन चाक आहेत यातील एकही चाक जर कमकुवत असेल तर धम्माचा रथ पुढे सरकू शकत नाही. उपासक वर्ग चांगला असेल तर भिक्षुसंघ निर्माण होऊ शकतो तसेच चांगला भिक्षुसंघ असेल तर चांगला उपासक वर्ग तयार होतो. त्यामुळे धम्माच्या वाढीसाठी चांगल्या भिक्षु सोबत चांगला उपासक वर्ग निर्माण होने काळाची गरज आहे. भिक्षुसंघाची काळजी घेण्यासाठी चांगला उपासक वर्ग निर्माण होने काळाची गरज आहे. चांगला उपासक निर्माण होण्यासाठी त्यात कोणते गुण असावे याचे खुद्द भगवंतांनी संयुक्त निकायातील महानाम सुत्तात मार्गदर्शन केलेले आढळते. बोधिस्तव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या "बुद्‌ध आणि त्यांचा धम्म" या ग्रंथात खंड पाच मध्ये उपासकांसाठी मांडलेले नियम याच सुत्तातून घेतलेले आहेत. एकदा महानाम उपासकाला चांगला उपासक कसा असावा असा प्रश्न पडतो. तो बुद्‌धाकडे जाऊन त्यांना अभिवादन करून त्यांना आपला प्रश्न विचारतो, *कित्तावत्ता नु खो, भन्ते उपासको होती? भन्ते कशाप्रकारे उपासक होतात?* यावर बुद्‌ध महानामाला म्हणतात,

1. *बुद्‌ध धम्म संघाला शरण गेल्याने उपासक होतो. त्यामुळेच याचे महत्व ओळखून बाबासाहे आंबेडकरांनी प्रत्येक व्यक्तीला जन्माने बौद्‌ध होता येत नाही तर सर्वांनी धम्मदीक्षा प्रथम घेतली पाहिजे असे बजावले आहे. त्यासाठी त्यांनी भारत देशातील विषमता व पुढील धोके ओळखून आपल्याला 22 प्रतिज्ञा दिल्या. उपासक होण्यासाठी दिक्षा घेणे म्हणजेच त्रिरत्नाला शरण जाने अनिवार्य आहे. स्वतःला उपासक म्हणून घेण्यापूर्वी आपण जाणले पाहिजे की, आपण दिक्षा घेतली आहे का? कारण दिक्षा घेणे म्हणजे मी आजीवन त्रिरत्नाला शरण जाऊन धम्माचे पालन करेन अशी प्रतिज्ञा होय. त्यामुळे बुद्‌ध धम्म संघ यांना शरण जाने म्हणजे उपासक होने होय.*

2. *शिलसंपन्न होने उपासक होय. उपासकांनी किमान पंचशील पालन केले पाहिजे. त्यांनी कोणत्याही सजीव प्राण्यांची हिंसा करू नये. सर्व प्रणीमात्रांवर प्रेम करावे. कोणत्याही उपासकाने चोरी करू नये ना तसा कुणास आदेश देऊ नये. व्यभिचारापासून दूर राहावे. ब्रह्मचर्य पालन शक्य तर निदान निदान आपल्या जीवनसाथीसोबत एकनिष्ठ रहावे. खोटे बोलू नये ना तसे करण्यासाठी प्रोत्साहन देऊ नये. मादक पदार्थ सेवनापासून दूर राहिले पाहिजे. शील बळवाण झाल्याशिवाई समाधी व प्रज्ञा प्राप्त करणे कदापि शक्य नाही. त्यामुळे शील हा पाया आहे.*

3. *श्रद्‌धासंपन्न होने उपासक होय. श्रद्‌धाधन संपन्न होण्यासाठी तथागत सम्यक संबुद्‌ध अरहनत आहेत याची जाणीव झाली पाहिजे तसेच ते विद्‌या व आचरणाणे युक्त आहेत, त्यांना सुगती प्राप्त झाली आहे हे ओळखले पाहिजे. ते सर्व जगाचे जानकार आहेत. ते सर्वोत्तम, सर्वश्रेष्ठ आहेत. पुरुषाचे दमन करणारा सार्थी व देव व मनुष्याचे ते गुरु, शास्ता आहेत याची त्यांना जाणीव असावी. बुद्‌ध धम्म व संघावर त्यांची अतूट श्रद्‌धा असावी.*

4. *दानसंपन्न होने उपासक होय. दान म्हणजे त्याग. आपले कंजूसपणापासून मुक्त करून त्यात औदार्य निर्माण करणे. कोणी मदतीसाठी हात पुढे केला तर मदत करता आली पाहिजे अशी योग्यता निर्माण करावी. दान दिल्याने हळूहळू त्यागाची भावना निर्माण होऊन मन असक्तितुन मुक्त होत असते व हळूहळू शांत होत जाते.*

5. *भिक्षुच्या दर्शनाची कामना करणे उपासक होय. जेव्हा वेळ मिळेल तेव्हा भिक्षुसंघाला घरी आमंत्रण करणे किंवा आपण त्यांना जाऊन भेटणे होय. सतपुरुष सहवासाचे वेध लागणे हे उन्नत्तिचे द्वार उघडे होने होय.*

6. *सधम्म श्रवण करणे उपासक होय. जसे कळते अमुक अमुक ठिकाणी धम्म ऐकायला मिळणार आहे तेव्हा असा उपासक मिळेल तिथे धम्म श्रवण करण्याची संधी वाया घालवत नाही. धम्म श्रवण करण्यासाठी तो नेहमी तत्पर असतो.*

7. *स्वतः श्रवण केलेल्या धम्माला तो धारण करतो तो उपासक होय. असा उपासक धम्म पूर्णपणे स्वतःच्या मनात बिंबवतो. धम्माची प्रत्येक गोष्ट तो दुर्लक्षित न करता तिला मनात संचित करित जातो.*

8. *स्वतः श्रवण केलेल्या धम्माचे चिंतन करून त्याप्रमाणे आचरण करतो तो उपासक होय. असा उपासक स्वतः श्रवण केलेल्या धम्माला तिथेच सोडून देत नाही तर त्यावर सतत चिंतन करतो व त्यानुसार तो आपले आचरण करतो.*

हे सर्व गुण उपासकाचे असतात असे बुद्ध महानामाला सांगतात. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर यापुढे जाऊन समाजाची मानसिक व आध्यात्मिक भूक ओळखून बौद्ध साहित्याच्या अभ्यासाअंती उपासकांनी उपोसथ व्रत केले पाहिजे असे "बुद्ध आणि त्यांचा धम्म" या ग्रंथात खंड पाच भाग चार मधे सांगतात.*

9. *सप्ताह मागून सप्ताह उपोसथ व्रत करा आणि श्रद्धामय अंतकरणाने अष्टशीलाचे पालन करा. महिण्यात चतुर्थी, अष्टमी, अमावस्या, व पौर्णिमा येतात या चारही दिवशी उपोसथ केले पाहिजे असे बाबासाहेब सांगतात. उपोसथ सुत्तामध्ये या चारही दिवसी केलेले उपोसथ व्रत खूप फलदायी असते असे भगवंत सांगतात. परंतु या चार पैकी सर्वात जास्त फळ देणारा उपोसथ हा पौर्णिमेचा असतो असे उपोसथ सुत्तात तथागत सांगतात.*


10. *सकाळी श्रद्धामय चित्ताने उपोसथ व्रत स्विकारल्यावर आपल्या क्षमतेनुसार भिक्षुला अन्न व पेय दान करावे. पहाटे लवकर वुठून श्रद्धामय चित्ताने बुद्ध धम्म संघ-त्रिसरण घेऊन व्रत सुरु करावे. बाराच्या आत आहार घ्यावा. बारानंतर आहार घेऊ नये. त्यानंतर पूर्ण दिवस पेय किंवा ज्यूस घ्यावे उपासी राहू नये. भिक्षुना अन्नदान करावे. दुसऱ्या दिवसी पुन्हा त्रिरत्नाला शरण जाऊन व्रत सोडावे.*

अस्याप्रकारे वरील गुण ज्यात असतात त्यांना उपासक म्हणावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत आहे. *उपासक व उपासिका ह्या केवळ बोलण्याचे शब्द नसून धम्म आचरण व पालन करणे तसेच वाईट काळात धम्माला सांभाळून ठेवून तिचे अस्तित्व आबाद ठेवणारी व्यक्ती उपासक असते. बुद्ध काळात विशाखा ही आदर्श उपासिका होती तसेच अनाथपिंडक आदर्श उपासक होता. बुद्धोत्तर काळात सम्राट अशोक, राजा मिलिंद, कनिष्क, हर्षवर्धन आदर्श उपासक होऊन गेले. यांनी धम्माला संरक्षित ठेवून वाढवायचे काम केले.*

प्रत्येक व्यक्तींनी वरील उपासकांचा आदर्श व गुण डोळ्यापुढे ठेवून त्यावर पाऊल ठेवावे हिच सदिच्छा. उपासक धम्माचा पाया आहे हे नेहमी स्मरनात ठेवून त्यानुसार उपासक घडणे अपेक्षित आहे.

संग्राहक: सुमंगल रवींद्र अहिरे


धर्मचक्र
DHARAMCHAKRA


उत्तरबोधि
UTTARABODHI


भूमि स्पर्श
BHOOMI SPARSH



नमस्कार
NAMASKARA


अभय
ABHAYA

वरद
VARADA

कर्ण
KARANA

वितर्क
VITARKA





मराठी माणूस मागे असण्याची 23 कारणे...

आर्थिक सल्लागार मकरंद गाडगीळ यांच्या लेखणीतून...

1. कमी प्रवास: प्रवास केल्याने जग कळते, कल्पना सुचतात, मार्ग सापडतात व प्रगती होते. मराठी माणूस आर्थिक स्थितीमुळे फारसा प्रवास करताना दिसत नाही. अनेक औद्योगिक प्रदर्शनात मराठी माणूस दिसत नाही.

2. अति राजकारण: सर्वातजास्त मराठी माणूस राजकारणात वेडा आहे. राजकीय नेत्यांच्या सभेला आपला कामधंदा सोडून लखोंच्या संख्येने येणारा मराठी माणूस असतो. यात व्यापारी समाजातला एकतरी माणूस दिसतो का? मी काय करतो आहे यापेक्षा लोकांनी काय केले, काय करतात यात जास्त लक्ष.

3. दोनच हात कमावणारे: सर्वसाधारण मराठी कुटुंबात एकच व्यक्ती कमवतो. कुटुंबातील जास्तीतजास्त लोकांनी काम केले पाहिजे.

4. सर्वांचे तोंड वेगळ्या दिशेला: कुटुंबात एकी नसते. बाप एका दिशेला, मोठा मुलगा एका दिशेला तर लहान भाऊ तिसरीकडेच. प्रत्येक कुटुंबात एकी पाहिजे.

5. खोटं बोल पण रेटून बोल: सगळ्या थापा एकमेकांना गांडवण्याच्या गोष्टी, खरे सांगण्यासारखे नसतेच म्हणून खोटं बोलाव लागते. मी हे करीन ते करीन या स्वप्नातच आयुष्य संपते. पण हे मी करतोच असा निश्चय घेत नाही.

6. आहार व आरोग्याकडे दुर्लक्ष: आरोग्याकडे अत्यंत दुर्लक्ष, महागाईमुळे उपचारही परवडत नाही, थातुरमातूर उपचार केले जातात. योग्य आहार नाही, व्यसनांचे प्रमाण प्रचंड आहे. भरपूर पैसा व्यसनातच संपतो.

7. आर्थिक निरक्षरता: पैसा काय आहे? तो कसा वापरायचं? शेअरमार्केट, डीमॅट, फॉरेन एक्सचेंज, डॉलर, आय टी याची खूप कमी माहिती शिकलेल्या लोकांनाही नाही. 90% महिलांचे तर साधे पॅनकार्ड सुद्धा नसते.

8. दूरदृष्टीचा अभाव: पुढील 5, 10, 20 वर्षाच्या योजना आखाव्या लागतात. त्यावर आजपासूनच काम करावे लागते. अशा दूरदृष्टीमुळे नियोजन होते व माणसे कामाला लागतात.

9. ऐतिहासिक स्वप्नांत: अजूनही मराठी माणूस ऐतिहासिक स्वप्नांत जगत आहे. जास्तीत जास्त वेळ फेसबुक व्हाटसेप वर कोणी कधी काय केले ते शोधत फिरतो, आणि स्वतःचा वेळ वाया घालवतो, तेव्हा सत्य आणि सध्याच्या परिस्थितीचे भान ठेवून उद्योग करून पैसा कमावला पाहिजे.

10. गृहकलह, कोर्टकचेरी: गृहकलहाचे प्रमाणही प्रचंड आहे. भावाभावांतच वाद. संपत्तीवरून भावकीत वाद, वादावादी, मारामारी, खून, कोर्टकचेऱ्या सामंजसपने निपटावे व प्रगतीच्या मार्गे लागावे.

11. समाज अर्थपुरवठा पद्धत: नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी अत्यंत कमी व्याजदारात किंवा बिनव्याजी ताबडतोब अर्थपुरवठा करण्याची व समाजातील सर्वांना वरती आणण्याची पद्धत गुजराती, मारवाडी, सिंधी समाजात आहे. तशी मराठी समाजात आढळत नाही. आता तर सरकारने नवीन व्यवसायिकांसाठी 5 लाखापर्यंत कर्जयोजना सुरु केली आहे, ज्यात बीना गॅरंटी कर्ज उपलब्ध आहे, पण त्याबद्दल काहीच माहिती उपलब्ध करून घेत नाहीत.

12. जनरेशन गॅप: खूप मोठा जनरेशन गॅप कुटुंबात जाणवतो. एखादा हुशार तरुण उद्योग करतो म्हटले की त्यालाच वेड्यात काढले जाते. जुन्या लोकांच्या डोक्यातून नौकरी अजून जात नाही.

13. ज्ञानापेक्षा सर्टिफिकेट: प्रत्यक्ष व प्रॅक्टिकल ज्ञानापेक्षा पदवीच्या सर्टिफिकेटाला जास्त महत्व आहे. काहीही करू पदवी मिळवायची. त्यामुळे सिव्हिल इंजिनियर झाले बेरोजगार... व बाहेरून आलेला प्लंबर, गवंड्याचे काम करून महिना 50 हजार कमावतात.

14. धरसोड वृत्ती: हे प्रमाण प्रचंड आहे. थोडे दिवस खाजगी संस्थेत नौकरी... कामाच्या अगोदरच पगार किती देणार? विचारायची प्रवृत्ती... हे काम केले तर लोक काय म्हणतील??? अशा धरसोड वृत्तीमुळेच आयुष्यातील 10 वर्षे निघून जातात. एकदाच ठासून एखाद्या क्षेत्रात टिकून राहिले पाहिजे.

15. कष्टाची लाज: विशेषतः सुशिक्षित तरुणांना कष्टाची लाज वाटते. इझ्री मनी चे खुळ डोक्यात थैमान घालतंय. मी एएम, बीई, बिएड, झालोय म्हणजे मला इस्त्रीचे कपडे घालून फिरण्याचा अधिकार आहे असे समजतात. स्वतःच्याच घरातही काम करण्यास लाज वाटते.

16. फालतू बाबींना महत्व: एकत्र येणे, प्रगती साधने, उद्योग उभारणे हे मुख्य विषय राहिले बाजूला... पण मराठी माणूस अजून लग्नपत्रिकेत नाव नाही टाकले, लग्नात आहेर नाही केला, होर्डिंगावर नाव माही टाकले, अशा फालतू बाबींमध्ये अडकला आहे.

17. दुसऱ्यांच्याच अपयशात आनंद: भावाचा उस जळाला, त्याला पाणीच नाही दिले, त्याची म्हैस गेली की दुसऱ्या भावाला भलताच आनंद व उकळ्या फुटतात... मित्रांचे व्यवसायात नुकसान झाले, बर झालं मी आधीच सांगत होतो नको करू, अगदी आपल्या सख्ख्या भावाचं चांगले झाल्यावरही बघवत नाही हे "आश्चर्य"...!!! मराठी माणूसच मराठी माणसाचा शत्रू आहे...!!!

18. इंग्रजी कच्चे: मराठीचा अभिमान जरूर बाळगावा पण जगाच्या स्पर्धेत रिकण्यासाठी व पुढे जाण्यासाठी अस्खलीत इंग्रजी बोलणे, लिहिणे, वाचणे आलेच पाहिजे. अति उत्तम इंग्रजी आलेच पाहिजे. इंग्रजी बोलता येत नाही म्हणून इंग्रजीवर राग दाखवून काही होणार नाही.

19. संवादकौशल्याचा अभाव: जीवनात व उद्योगात पुढे जाण्यासाठी आपण दुसऱ्यांशी संवाद करतो ह्या कौशल्याचे खूप मोठे महत्व आहे. मोठे प्रोजेक्ट मिळविणे, काम मिळविणे, विविध स्थानिक अधिकारी वर्ग इतर व्यक्ती यांनाही आपण प्रत्यक्ष पत्रव्यवहार, इ-मेल द्वारे, फोनवर कसा उत्कृष्ठ संवाद साधाला पाहिजे हे शिकले पाहिजे.

20. चकोरी मोडत नाही: अजूनही जुन्याच पद्धतीने काम चालू आहे. त्यामुळे प्रगती होत नाही, मतदार संघात काहीही काम न करता कितेक दशके तोच खासदार, आमदार, नगरसेवक, झेडपी~पंचायत~ग्रामपंचायत सदस्य निवडून देण्याचे/येण्याचे प्रकार दिसतात.

21. जाती प्रथा: 21व्या शतकातसुद्धा जाती प्रथेचा पगडा प्रचंड आहे. एकाच गावात व एकाच गल्लीत 10 वेगवेगळ्या जातीचे पुढारी आहेत. संपूर्ण समाज अनेक धर्म~पंथ~जात~पोटजातीत विभागला गेला आहे, त्यामुळे समाजाची ताकद क्षिण झाली आहे. या धावपळीच्या युगात एक मराठी माणूस म्हणून कोणीच एकत्र यायला मागत नाही. आणि याचा फायदा इतरांना होतो.

अमुक एका जातीत जन्म झाला यासारख्या अर्थशून्य गोष्टींचा मराठी माणसाला स्वतःची एक व्यक्ती म्हणून दमडीची अचिव्हमेंट नसतांना चक्क अभिमान वाटतो.

22. वेळेची किंमत: वेळेचे महत्व समजलेले नाही. अनेक व्यक्ती आयुष्याच्या वेळेचा प्रचंड अपव्यय करतांना दिसतात. बारसे, साखरपुडा, मुलगी बघणे, विवाह, यात्रा, मयत, प्रचार सभा, निवडणूक, वारी, देवदर्शन, राजकारण या अनेक बाबींसाठी सरासरी वर्षातले 100 दिवसाहून अधिक काळ वाया घालवतात.

23. ग्राहकाला किंमत न देणे: ग्राहक म्हणजे राजा समजला जातो पण आपल्याकडे तसे होत नाही, ग्राहकाला समोर रुबाब दाखवीने, तसरच एन कामाच्या वेळेला मोबाईल बंद करून ठेवणे, आणि ग्राहकाला दिलेली वेळ न पाळणे, 10 ची वेळ सांगून 11 ला पोचणे, याने ग्राहकसुद्धा निसटतो. तसेच आपला रेफरन्स पुढे कुणाला देत नाही.

साथियों.

कर्नाटक कोलार ज़िले का ये दृश्य देख रहे हैं..?

RSS/BJP के उसके मंदिर पर अयोध्या की तरह झंडा गाड़ा..? कोलार जिले के मलूर उलरहल्ली में दलितों (SC/ST/OBC) ने हुजूम बनाकर मंदिर में पहुँचकर झंडा गाड़ ही दिया...

पुजारी और गाँव के प्रधान ने एक दसवीं कक्षा के दलित छात्र द्वारा महज़ मंदिर का एक पीलर छू लिया था, पर जुर्माना लगाया था. जिसे (बच्चे) धर्म के नाम पर गैरबराबरी की कोई समझ भी न थी! छू दिया! सनसनी फैल गई. गाँव-इलाके के प्रधान और छूआछूत का दंभ भरने वाले लोगों ने पंचायत बुलाई और मंदिर अछूत हो जाने पर उस बच्चे के माता-पिता को 60,000 रुपये का जुर्माना लगाया. वरना, गांव से निष्कासन. 1अक्टूबर के पहले इस जुर्माना को चुकता करना था.

बच्चे के पिता अपाहिज और पैरालिसिस के शिकार हैं. माँ ही मेंहनत मजदूरी कर घर चलाती है और किसी तरह दो जून की रोटी का इंतजाम करती है. वह कहाँ से दे पायेगी 60,000रुपये?

यह बात इलाके में आग की तरह फैली. दलित (sc/st/obc) युवाओं का जुटान हुआ. आक्रोश फैला. और फिर प्रदर्शन करते हुए उक्त मंदिर में हुजूम के साथ घुसकर छू दिया. मंदिर के गुम्बद पर चढ़कर नीला झंडा फहरा कर बोला....

जय भीम. *जय जय मूलनिवासी.....* *जय भीम...* *जय जय मूलनिवासी...........*

वहां के ज़िला प्रशासन को इस छूआछूत & शोषण का पता चला तो ग्राम प्रधान सहित कुल 8 लोगो पर F.I.R भी दर्ज कर दी गई....

सभी सामंती &छूआछूत का दंभ भरने वाले RSS के लोगों की गिरफ्तारियाँ भी हुई है...

ज़िला प्रशासन ने अतिरिक्त रुप से उस बच्चे की माँ को सामाजिक कल्याण विभाग में नौकरी भी दी व घर बनाने के लिए जमीन और कुछ राशि भी. इस तरह जुल्म और शोषण के खिलाफ नीला झंडा लेकर जय भीम करते हुए पूरे देश के कोने कोने में दलितों (sc/st/obc) की बहुत बडी फौज खडी हो गयी है.

*यही कारण है की नीला झेंडा देखते ही कोई भी समंतो का गिरोह या कुलकर्णी सेना हो या फिर RSS का उजारी, पुजारी या फिर अन्य हिंदू/ब्राम्हण धर्मावलंबी (?), भडक जाता है, सकते मे आ जाता है.

भारत देश में "जय भिम" "जय मूलनिवासी" का उदघोष और नारा जुल्म के खिलाफ जुझणे का अब ट्रेड मार्क सा हो गया है.*

बाबासाहेब भीमराव रामजी आंबेडकर अमर रहें.

विचारणीय तथ्य

बाबा साहब जी ने तीन बातो मे शिक्षित, संगठित, संघर्ष करने कि बात कि पर यह विचारणीय प्रश्न है की उन्होने संघर्ष शब्द का प्रयोग क्यो किया! लडाई, युद्ध, झगडा, आन्दोलन, बिरोध और अनेक पर्यावाची शब्द है पर संघर्ष शब्द क्यो चुना❓❓

संघर्ष--- स + अ + घ+ र् +ष

स--- समझ के साथ

स--- संगठित होकर

स--- संवैधानिक

अ--- अज्ञानता रहित

अ--- अधिकार के लिए

घ--- घट (शरीर) मे

घ--- घटना से सीख

र्---- रस्सी के तरह एक सूत्र मे पिरोने की कोशिश

ष--- षट विकार रहित होकर (काम, क्रोध मद लोभ मोह मत्सर)

अब विचार करे बाबा साहब के जीवन में इन गुणो को अवश्य पाएगे पर आप क्या ऐसा बनने का प्रयास किया नही परिणाम वही हुआ आज आजदी के 75 वर्ष बाद भी वही खडे है!!

शरीर मे षट विकार का नाम नही घटना से हमेशा सीख लिए अज्ञानता नस्ट करने के लिए वह हमेशा सभी पुस्तकें पढते रहे लडाई हमेशा संवैधानिक मर्यादा मे रहकर ही लडी वह हमेशा समझ कर भी भाषा प्रयोग किए और एक संगठित शक्ति के रुप मे ही कार्य किया कभी अकेले चलने का प्रयास नही किया!!

और समाज को एक सूत्र मे पिरोने का काम किया सभी के प्रति एकाकी भाव रहा अब अपने आप विचार कर इस संघर्ष शब्द के महत्व को समझ सकते है!! साथ कुछ जीवन मे आप सीख भी ले सकते है!! यह शब्द जीवन पथ प्रदर्शक कि भाति काम करता हैं!!

जय भीम नमो बुद्धाय।।

✍️ *दुःखाचे कारण आणि उपाय* *बुद्धांनीच प्रथम सांगितले*

सम्यक संबोधी प्राप्त झाल्यानंतर *तथागतांनी अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी शोधून काढलेला जीवन जगण्याचा मार्ग म्हणजे आर्य अष्टांगिक मार्ग होय!* तो मार्ग सर्वप्रथम पंचवर्गीय भिक्खूंना सारनाथ येथे सांगितला.

चार आर्यसत्यांपैकी पहिले आर्यसत्य म्हणजे दुःख होय. दुःख हा विश्वातील सामान्य माणसाचा अनुभव काय आहे ते स्पष्ट होण्यासाठी या शब्दाचा उपयोग केला जातो. दुःखाचे समानअर्थी शब्द म्हणजे अस्वस्थता, चिंता, वेदना, शोक, खेद, असुरक्षितता, अप्रियता, यातना, गैरसमज, भांडण, असमाधान. परंतु या सर्व शब्दांपैकी सर्वमान्य पावलेला शब्द म्हणजे दुःख हाच आज प्रचलित आहे. तथागत आपल्या प्रथम प्रवचनात स्पष्ट करताना म्हणतात, भिक्खूंनो! जन्म दुःख आहे, म्हातारपण हे दुःख आहे, आजारी पडणे दुःख आहे, अप्रियांचा सहवास दुःख आहे, प्रियांचा वियोग हे दुःख आहे, मृत्यु येणे हे दुःख आहे. म्हणजे आपणास जे हवे असते ते न मिळणे म्हणजे दुःख आहे. अर्थात मनाच्या विरुद्ध घडणे म्हणजे दुःख आहे. त्याचप्रमाणे रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान या पाच बाबींना पाच उपादान म्हणतात.

१) *रूप स्कंध:* पृथ्वी, आप, तेज आणि वायू या चार भौतिक घटकांपासून रूप स्कंध तयार होते.

२) *वेदना स्कंध:* सुखकारक वेदना, दुःखकारक वेदना आणि असुखद-अदुःखद वेदना यांना वेदना स्कंध म्हणतात.

३) *संज्ञा स्कंध:* घर, झाड, गाव, स्त्री, पुरुष इत्यादींची ओळख यास संज्ञा स्कंध म्हणतात. अर्थात पदार्थांना निरनिराळी नावे देण्याची मनाची शक्ती तिला संज्ञा स्कंध म्हणतात.

४) *संस्कार स्कंध:* संस्कार म्हणजे मनावर पडलेला प्रभाव. याचे कुशल कर्म, अंकुशल कर्म आणि अव्याकृत कर्म असे तीन प्रकार आहेत.

५) *विज्ञान:* विज्ञान सहा आहेत. चक्षुविज्ञान, श्रोतविज्ञान, घ्रानविज्ञान, जिव्हाविज्ञान, कायाविज्ञान व मनोविज्ञान. या विज्ञानाच्या समुदायला विज्ञान स्कंध म्हणतात. बुद्ध म्हणतात, हे पाचही उपादान स्कंध दुःखच आहे. पंचस्कंधाच्या या आसक्तीमुळे मनुष्यात अहंकाराची भावना निर्माण होते. माणसातील अहंकाराचा अतिरेक हे जगातील दुःखाचे मूळ कारण आहे.

तथागत बुद्ध हे वास्तववादी होते. त्यांनी दुःखाची कारणे शोधली. तर दुःखाचे तीन प्रकार आहेत. अध्यात्मिक, अधिभौतिक आणि अधिदैविक.

अध्यात्मिक म्हणजे वैयक्तिक, व्यक्तीचे स्वतःच्या वागणुकीने ओढवून घेतलेले दुःख म्हणजे आपल्याच कमीपणामुळे उत्पन्न झालेले दुःख. जसे माणसाने लोभापाई किंवा मोहापाई हत्या केली तर त्याला त्यावेळी भलेही काही वाटणार नाही, पण नंतर मात्र त्याला दुःख होते, पश्चाताप होतो. जर माणसाने चोरी केली तर तत्क्षनीच त्याला बरे वाटेल, पण नंतर मात्र त्याला दुःख होते. आसक्तीमुळे माणसाच्या हातून जर व्यभिचार घडला तर काही वेळाने किंवा काही दिवसांनी त्याला दुःख होतेच. तसेच माणूस जर जाणीवपूर्वक जाणूनबुजून खोटं बोलला तर ती वेल तरुण जाते, पण नंतर मात्र त्याला दुःख होते, वाईट वाटते. किंवा एखाद्या माणसाने दारू पिऊन स्वतःच्या संसाराची धुळधान आणि शरीराची राखरांगोळी स्वतःच्याच हाताने करणे यालाच अध्यात्मिक दुःख म्हणतात.

दुसरे आहे *अधिभौतिक दुःख* म्हणजे समुदाईक दुःख. विषम वागणुकीमुळे आणि अन्यायामुळे ओढवणारी संकटे आणि त्यातून निर्माण होणारे दुःख. माग ते प्रकरण बहुजनांवरील बहिष्काराचे असो की अन्य कोणतेही असो, त्यामुळे दुःखाचीच निर्मिती होते.

तिसरे म्हणजे *अधिदैविक दुःख*. याचा अर्थ आहे नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे दुःख. उदाहरणार्थ; रेल्वे, विमान, आगबोट, मोटार अपघात, वादळाने होणारी हानी, महापुराणे ओढवणारी आपत्ती, आगीमुळे होणारी हानी या सर्व दुःखांना 'अधिदैविक दुःख' म्हणतात.

तथागतांनी जसी जगातील तीन प्रकारची दुःखे शोधून काढली, ती नष्ट करण्याचा प्रभावी मार्ग सुद्धा शोधून काढला. वैयक्तिक आचरनामुळे ओढवणारी दुःखे नाहीसे करण्यासाठी *पंचशील* हे साधन आहे. पंचशिलाचे काया, वाचा, मनाने जर आम्ही पालन केले तर निश्चितच ती नष्ट होऊ शकतात. ते याप्रमाणे;

1) मी कोणत्याही प्राणीमात्रांची हत्या कणार नाही, उलट सर्व प्राणीमात्रावर प्रेम करीन, त्यांच्याशी मैत्री करीन, त्यांच्याशी सौजन्याने वागेन म्हणजेच माझा कोणी शत्रू म्हणून उरणार नाही.

2) मी चोरी करणार नाही, त्याऐवजी दान करिन.

3) मी व्यभिचार करणार नाही, उलट सदाचाराने वागेन या शरीराला कुठला कलंक अथवा डाग लागू देणार नाही.

4) मी कुणाची चुगली करणार नाही, निंदा किंवा कठोर बोलून कुणाचे मन दुःखी करणार नाही, व्यर्थ बडबड करणार नाही आणि खोटे बोलणार नाही. त्याऐवजी नेहमी सत्यच बोलीन.

5) मी दारू पिणार नाही, नशिल्या पदार्थांचे सेवन करणार नाही.

अशाप्रकारे आम्ही जर वागण्याचा प्रयत्न केला तर दुःख आपल्यापर्यंत येऊच शकणार नाही.

अधिभौतिक दुःखे नष्ट करण्यासाठी तथागतांनी आपल्याला अष्टांगिक मार्ग हे प्रभावी साधन दिले आहे.

1) *सम्यक दृष्टी:* सम्यक दृष्टी म्हणजे अविद्येचा विनाश करणे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर त्याला सम्यक अवलोकन असे सुद्धा म्हणतात.

दुःख म्हणजे काय? त्याचे कारण काय? त्याचा निरोध कसा करता येतो? आणि निरोधाचे साधन कोणते? याचे ज्ञान असणे म्हणजे सम्यक दृष्टी.

2) *सम्यक संकल्प:* यामध्ये तीन बाबी समाविष्ट आहेत. 1. ज्ञानेंद्रीय सुख कमी करणे, त्यांचा त्याग करणे. 2. मैत्री, करुनेचा विकास करणे. 3. अहिंसा, चांगले विचार आणि स्नेहभाव यांचा सराव करून वृद्धी करणे. म्हणजेच आपला संकल्प हा लालसा आणि तृष्णेपासून मुक्त असावा.

3) *सम्यक वाचा:* नेहमी सत्य बोलावे, खोटे बोलणे टाळावे. चुगली चहाडीमुळे कलह निर्माण होतात, समाजात गट-तट पडतात, समाज एकसंघ राहत नाही. म्हणजे अशा प्रकारची वाचा ही समाजासाठी घातक आहे, म्हणून समाजसौख्य वृद्धीसाठी प्रत्येक अभद्र शब्दप्रयोग टाळावा म्हणजे दुःख निर्माण होणार नाही.

4) *सम्यक कर्मांत:* हत्या, चोरी आणि व्यभिचार हे तीन प्रकारचे गैरकृत्य माणसाच्या हातून घडतात. कारण प्राणिहत्या केल्याने व्यक्तिमधील क्रूरतेची वृद्धी होते. चोरी केल्याने व्यक्यतीची गुन्हेगारी वृत्ती वाढते, तर लैंगिक मिथ्याचार केल्याने कामवासनेला चालना मिळते. व्यक्ती कामांध होतो. म्हणून माणसाने दुसऱ्याच्या भावना आणि त्यांचे हक्क यांचा मान राखून प्रत्येक कृती करावी.

5) *सम्यक आजीविका:* सम्यक आजीविका म्हणजे सन्मानाने प्राप्त केलेल्या जीविकेवर उदरनिर्वाह चालवीने, म्हणजे शस्त्र व्यापार, मांस व्यापार, मानवांचा व्यापार, मद्याचा व्यापार आणि विषाचा व्यापार करू नये. तर सम्यक आजीविका करून आपला प्रपंच चालवावा.

6) *सम्यक व्यायाम:* जे हानिकारक विचार अद्याप मनात निर्माण झालेले नाहीत त्यांना निर्माण होण्यास प्रतिबंध करावा. जे हानिकारक विचार निर्माण झाले आहेत त्यांच्या वाढीवर प्रतिबंध घालावा. जे विधायक विचार अद्याप निर्माण झालेले नाहीत त्यांना निर्माण होण्यास प्रयत्नशील असावे. आणि जे विधायक विचार निर्माण झालेले आहेत त्यांचे संवर्धन व्हावे.

7) *सम्यक स्मृती:* सम्यक स्मृती या चार प्रकारच्या आहेत. 1. कायानुपस्सना 2. वेदनानुपस्सना 3. चित्तानुपस्सना 4. धम्मानुपस्सना. सती म्हणजे स्मृती. म्हणजे साधक इथे चिंतन करतांना शरीर, वेदना आणि मन यावर आपली एकाग्रता केंद्रित करतो. उत्साहपूर्वक जागृत असतो. भौतिक लालसा व निराशा त्याने बाजूला सारलेल्या असतात. पूर्णपणे वरील चार बाबींवर त्याचे चित्त केंद्रित असते. अस्या प्रकारच्या ध्यानाच्या सरावातून व्यक्ती परिशुद्ध होत असतो. दुःखावर मात करतो, वेदनामुक्त होतो, शोकविरहित होतो, सन्मार्गावर चालतो, त्याला निब्बाणाची जाणीव होते.

8) *सम्यक समाधी:* सम्यक समाधी म्हणजे मनाची तल्लीनता होय. यामध्ये जे पाच अडथळे येतात ते दूर केले की आपला मार्ग सुखकर होतो. 1. ज्ञानेंद्रीय उपभोग आनंद 2. दुष्ट इच्छा 3. आळस व सुस्ती 4. चिंता व अस्वस्थता 5. संशय वृत्ती हे पाच अडथळे ध्यानाची एकाग्रता होऊ देत नाहीत. तेव्हा साधकास यापासून सावध असणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणजेच कोणत्याही दुष्ट प्रवृतीपासून मन अलग ठेवून चित्त प्रसन्न आणि शांत ठेवणे, असे आचरण केले की, अधिभौतिक दुःख नष्ट होतात.

यातील तिसरे म्हणजे अधिदैविक दुःख नष्ट करण्यासाठी बुद्धांनी शिलमार्ग अनुसरणे हा उपाय सांगितला आहे. शिलमार्ग म्हणजेच 10 पारमिता.

1) *शील:* शील म्हणजे नीतिमत्ता. वाईट गोष्टी न करण्याकडे मनाचा असलेला कल, म्हणजेच अपराध करण्याची लाज वाटणे, शिक्षेच्या भितीने वाईट गोष्टी करण्याचे टाळणे म्हणजेच शील.

2) *दान:* स्वार्थाची किंवा परतफेडीची अपेक्षा न करता दुसऱ्याच्या भल्यासाठी, सुखासाठी, आनंदासाठी स्वतःची मालमत्ता, रक्त, जीवनावश्यक वस्तू, देह अर्पण करणे, इतकेच नव्हे तर प्रानत्याग करणे म्हणजेच दान होय.

3) *उपेक्षा:* फलप्राप्तीने विचलित न होणे, परंतु निरपेक्षतेने सतत प्रयत्न करित राहणे म्हणजेच उपेक्षा होय. अनासक्ती, आवड किंवा नावड नसलेली मनाची स्थिती.

4) *नैष्कर्म्य:* एहिक सुखाचा त्याग म्हणजे नैष्कर्म्य (निष्कर्म्य).

5) *वीर्य:* वीर्य म्हणजे उत्साह, जोमाने हाती घेतलेले काम सर्व सामर्थ्यानीशी पूर्ण करणे म्हणजे वीर्य. तसेच जनकल्याणाची कामे जोमामे आणि तत्परतेने करणे.

6) *शांती:* क्षमाशीलता म्हणजेच शांती, द्वेषाला द्वेषणे उत्तर न देणे हाच शांतीचा उद्देश आहे.

7) *सत्य:* व्यर्थ बडबड न करणे, कुणाची निंदा-चुगली न करणे, कठोर बोलून कुणाचे मन दुःखी न करणे आणि खोटे न बोलणे म्हणजे सत्य पारमिता होय.

8) *अधिष्ठान:* ध्येय्य गाठाण्याचा दृढनिश्च्यय म्हणजे सधिष्ठान होय.

9) *करुणा:* सर्व प्राण्यांवर मैत्री करणे, सर्व प्राणीमात्रावर दया करणे, त्यांच्यावर प्रेम करणे, म्हणजे एकंदरीत सर्व प्राणीमात्राविषयींची अनुकंपा म्हणजे करुणा होय.

10) *मैत्री:* सर्व प्रानिमात्रांविषयी नव्हे तर मित्रांशी आणि शत्रुंशी देखील मैत्री करणे म्हणजेच सर्व जीवांविषयी बंधुभाव बाळगणे म्हणजे मैत्री होय.

अशाप्रकारे पंचशील, आर्यअष्टांगिक मार्ग आणि दहा शिलामार्ग याद्वारे दुःखाचा निरोप कौन स्वतःची दुःखाचा विनाश करता येतो, माग ते दुःख अध्यात्मिक असो, की अधिभौतिक असो, अथवा अधिदैविक असो.

दीक्षाभूमी!

हर्ष दाटला साऱ्या अवनी!

आनंदाची घटना जीवनी!

मार्ग दाविला बुद्धां चरणी!

धर्मांतराची घोषणा करुनी!

जन्माने जो धर्म मिळाला!

प्रगती आमची गेली तळाला!

माणसाला माणूस नाही कळाला!

विटाळ बोलून दूर पळाला!

नव्हता हक्क आणि अधिकार!

जाती पातीचा खुला बाजार!

जगणे केले होते बेजार!

अस्पृश्यतेचा हाहाकार!

भीमाने आमचे दुःख जाणले!

आम्हाला ही माणसात आणले!

तथागतांचे तत्व मानले!

दीक्षा घेण्याचे मनी ठाणले!

नागपूर ठरले दीक्षाभूमी!

उत्साहाला नव्हती कमी!

प्रसंगी अशा मंगल कामी!

लहान थोर आले मुक्कामी!

असा माझा भीम गुणी!

आजन्म आम्ही त्याचे ऋणी!

बौद्ध धम्म दिला जनी!

अशोक विजयादशमी दिनी

नमो बुद्धाय जय भिम 🙏🏻🌹

श्री बुद्धाच्या चरणावरती, विजयादशमी दिनी

दीक्षा आम्हा दिली भीमाने, मंगल दिन तो जनीं

मूळ गाडण्या विषमतेचे, मार्ग असा वेचला

मानवतेचा अन समतेचा धर्म नवा घेतला

श्री बुद्धाच्या महामंत्राचा, निनादला तो ध्वनी

थोर भाग्य हे दलित जनाचे भीमरत्न लाभले

व्यथा तयाची दूर जाहली, कार्य महा साधले

सोने लुटूनी मांगल्याचे लोक हर्षले मनी

कितीक झाले या अवनीवर, संत मुनी ज्ञानी

करू न शकले आजवरी ते, केले भीमाने झणी

उद्धरली नवकोटी जनता, रूढी मोडुनी जुनी

दीक्षा आम्हा दिली भीमाने, मंगल दिन तो जनीं

एकदा वाचाच.....

धर्मंतराची ती सोनेरी पहाट..

१३ आॅक्टोम्बर १९५६ च्या रात्री बाबासाहेबाना.. रात्रभर झोप आलेलीच नव्हती... उद्याचा दिवस केव्हा उजाडतो याचीच ते आतुरतेने वाट पहात होते.... आयुष्यभर केलेल्या कष्टाच उद्या सोनं होणार होतं... आणि एवढ्यातच बाबासाहेबाना अचानक डोळा लागतो न लागतो तेवढ्यात पुन्हा थंड्यागार वाऱ्यांच्या लहरी बरोबर अण विविध पक्षांच्या किलबिलाटसह बाबासाहेबाना लगेच जाग आली.... बाबासाहेब उठून बसले... खिडकीतुन बाहेर बघत असताना ते तपकिरी तांबटसर सोनेरी किरने जनु बाबाना वंदनच करत होते... आणि म्हणत होते बा..बा..आज तुमचा नवा जन्म होतोय....

बाबासाहेबांच्या चेहऱ्यावचा आनंद गगणात मावत नव्हता, कारण अवघ्या दोन ते तीन तासामध्येच १९३५ ला येवले येथे बोललेले शब्द बाबासाहेब प्रात्याक्षात खरे करुन दाखवणार होते..

बाबासाहेबानी त्या थंड्यागार गारव्याच्या साक्षीने स्नान उरकून घेतले सोबतच माईसाहेबही तयार झाल्या...

दोघानीही पांढराशुभ्र पेहराव परीधान केला.... हातात नेहमीचीच काठी... तुडूंब भरलेला तो परीसर आपल्या बापाची आतुरतेने वाट बघत होता... चार-पाच दिवसापासून भिमअनुयायी आपल्या चिल्यापिल्यासह या नागपूर शहरी आलेले होते....

सर्वांच्या नजरा मुख्यद्वाराकडेच लागून होत्या...

भंते चंद्रमणी महास्थवीर आणि इतर प्रमुख मान्यवर अगोदरच मंचावर येऊन पोहचले होते....

आणि एवढ्यात युगपुरुग महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कार मुख्य द्वाराजवळ येऊन पोहचली...

त्या तुडूंब भरलेल्या भिमसागरातून एकच लहर उठली... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो...

बाबासाहब तुम आगे बढो... हम तुम्हारे साथ है...

अशा घोषणेने निळे अंबर दुमदुमुन गेले.. एवढा अफाट जनसमुदाय बघून बाबासाहेबांना जनु बारा हत्तीचे बळ आले होते.. त्यांचे काळीज सुपाऐवढे झाले... चेहऱ्यावराचा आनंद ओसंडून वाहत होता... (कारण या धर्मांतरला अनेक मंडळींकडून विरोध होता...)

बाबासाहेब समाजासाठी खरे उतरले होते आपल्या समाजानी बाबासाहेबांच्या मानेवर मान टाकली होती.. समाज तेव्हा गरीब पण इमानदार होता.... जीव गेला तरी चालेल पण ते कदापीही बाबासाहेबांना सोडू शकत नव्हते...

हा भीमसागर बघून बाबासाहेब स्वतःला धन्य समजत होते... बाबासाहेब स्वतःशीच पुटपुटले की अरे... येवले येथे तर मी फक्त एकटाच म्हणालो होतो की मी हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही! आणि आज एवढा मोठा माझा हा समाज माझ्या एका हाकेवर माझ्यासोबत यायला तयार झाला... यासारखा दुसरा विजय कोणताच नाही...! आणि असं म्हणत बाबासाहेब मुख्य द्वाराजवळून पैदल मंचाकडे निघाले होते.. बाबासाहेबांच्या डोळ्यातून आनंदाश्रू गळत होते... चेहऱ्यावरचा महाआनंद अजूनच तेजमय दिसत होता... सोबत माईसाहेब चालत होत्या... बाबासाहेब मंचाजवळ कधी येऊन पोहोचले हे खुद्द त्यांनाही कळले नाही... बाबासाहेब मंचावर चढले जनसमुदायांच्या घोषणा जोरजोरात सुरु होत्या अक्खे नागपूर हादरले होते... अशा त्या पोटतिडकीने दिलेल्या घोषणा होत्या...

बाबासाहेब आपल्या या लाखो अनुयायांना आता शांत बसा म्हणून हातानेच पालवत आहेत... सर्व जनसमुदाय बाबासाहेबांच्या हाताच्या ईशाऱ्याकडे बघूण अगदी शांत झाला होता... घड्याळात बरोबर सव्वा नऊ वाजले होते... बाबासाहेबांनी पुन्हा सर्वांना उभे राहा म्हणून हातानेच खुणावले.. सर्व जनसमुदाय उभा राहिला होता. बाबासाहेबांबरोबर माईसाहेबहि उभ्या राहिल्या... आणि... भन्ते चंद्रमणी महास्थविर हे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बुद्ध धम्माची दिक्षा देत आहेत... बाबासाहेब आणि माईसाहेब दोघेही तथागत बुद्धांच्या चर्णी मस्तक ठेवून त्रिवार वंदन करित आहेत... सोबत धम्मपीठावर यशवंतराव आंबेडकर मुकुंदराव आंबेडकर बी. सी. कांबळे बॅरिस्टर राजाभावू खोब्रागडे असे अनेक मान्यवर उपस्थित होते... प्रथमता बाबासाहेब आंबेडकरांनी भंते चंद्रमणी यांच्या कडून त्रिशरण पंचशील ग्रहण करून दिक्षा घेतली... आणि त्यानंतर बाबासाहेबांनी जमलेल्या अथांग जनसमुदायाला बावीस प्रतिज्ञा देऊन बुद्ध धम्माच्या ओटीत टाकले... आणि खऱ्या अर्थाने खितपत पडलेल्या लाखो बांधवांना आशेचा नवा सूर्य किरण दिला... तेव्हा या अफाट जनसागराच्या मनामनात बाबासाहेबांचे प्रतिबिंब उमटत

होते... आणि सारी धर्णी-आकाश बुद्धं सरणं गच्छामी म्हणत साऱ्या भारतालाच जनू बुद्धमय करत होते... अशी ही धर्मांतराची सोनेरी पहाट होती...

अनिल खरात लिंगेकर

🌹 क्रांतिकारी जयभीम नामोबुध्दाय 🌹 🙏🙏🙏

कंबोडिया का सम्राट अशोक

जी, विश्व इतिहास में कंबोडिया के राजा जयवर्मन सप्तम (1181-1218) को वहाँ का सम्राट अशोक कहा जाता है

सम्राट अशोक और जयवर्मन सप्तम दोनों ने ही लगभग 37 सालों तक शासन किया।

दोनों ने कल्याणकारी राज्य की स्थापना की और दोनों ने बौद्ध धम्म का मार्ग चुना।

सम्राट अशोक ने अपने बेटे को बौद्ध धम्म के प्रचार के लिए श्रीलंका भेजा तो जयवर्मन सप्तम ने भी अपने बेटे को बौद्ध धम्म हेतु श्रीलंका भेजा।

सम्राट अशोक ने कहा कि समस्त प्रजा मेरी संतान हैं तो जयवर्मन सप्तम ने भी कहा कि प्रजा का दुख मुझे दुखी बनाता है।

सम्राट अशोक ने अपने राज्य भर में अस्पताल खोलवाए, सड़कें बनवाईं और विश्राम गृह बनवाए।

सम्राट अशोक ने जनता के लिए अनेक कुएँ खुदवाए तो जयवर्मन सप्तम ने अनेक जलाशय बनवाए।


जयवर्मन सप्तम ने भी 102 अस्पताल खोलवाए, 798 औषधालय बनवाए और 121 विश्राम गृह की स्थापना कराई।

जयवर्मन सप्तम का शासन चीन से पश्चिम में बंगाल की खाड़ी और दक्षिण में मलय प्रायद्वीप तक थी।

कंबोडिया के महाप्रतापी राजा, जिसे बौद्ध धम्म के प्रति समर्पण के कारण "महापरमसौगत" कहा जाता है, राज्य भर में विभिन्न बौद्ध स्मारक बनवाए।

भारत की जनता भले ही सम्राट अशोक का जन्मदिन चैत शुक्ल अष्टमी को भूल गई हो, पर कंबोडिया का यह सम्राट अशोक चैत शुक्ल अष्टमी से लेकर पूर्णिमा तक सम्राट अशोक की स्मृति में वसंत - उत्सव मनाता था।

(जयवर्मन सप्तम की प्रतिमा, गुइमेत संग्रहालय, पेरिस)



इतिहासाचे पुनरलेखन गरजेचे का आहे...

शिल्प कोणाचे-महामाया कि गजलक्ष्मी?

भारतामध्ये खऱ्या अर्थाने शिल्पकला सुरु केली ती बौद्ध संस्कृतीने. सम्राट अशोकांनी बाराबार आणि नागार्जुनी डोंगरात कोरलेल्या पहिल्या लेणीपासून सुरु झालेली ही प्रस्तर कला उत्तरोत्तर आणखीन आखीव रेखीव आणि कल्पकतेने नटवले गेली. या बुद्ध लेणींमध्ये सुरुवातीच्या काळात बुद्ध प्रतीके दिसतात तर नंतरच्या काळात बुद्ध प्रतिमा साकारलेल्या दिसतात. या लेणींमध्ये साकारलेल्या अनेक प्रसंग हे शिल्पकला, चित्रकला या माध्यमातून भ. बुद्ध यांच्या जीवनाशी निगडित आहेत. याचा कालावधी हा इ. स. पूर्व २५० ते इ. स. ८०० आहे. साधारणपणे इ. स. ६०० ते इ. स. ८०० या काळात महायान, वज्रयान आणि तंत्रयान या बौद्ध शाखेच्या अनेक लेणीं व त्यातील शिल्प व चित्र अस्तित्वात आली.

बुद्ध लेणींचा प्रभाव हा जैन व हिंदू (काही इतिहासकारांच्या मते ब्राह्मण लेणी) लेणीं वर प्रचंड प्रमाणात दिसतो. बुद्ध लेणींतील अनेक शिल्प थोड्याफार प्रमाणात फेरफार होऊन नंतरच्या काळात ती हिंदू लेणींमध्ये पाहायला मिळतात. यातील एक उत्तम उदाहरण म्हणजे गजलक्ष्मी शिल्प.

मुळात गजलक्ष्मी शिल्पाचा काळ हा इ. स. पूर्व १०० ते इ. स.१०० असा गृहीत धरण्यात येतो. हे शिल्प सर्वात आधी प्रामुख्याने सांची आणि भारहूत येथे पाहायला मिळते. नंतर पितळखोरा, रायगड मधील ठाणाळे व जुन्नरच्या भूत (मूळ बुद्ध लेणीं) लेणीं मध्ये देखील पाहायला मिळते. या सर्व लेणीं, बुद्ध

लेणीं आहेत. मग यात गजलक्ष्मी जी सध्या ब्राह्मण (हिंदू?) संस्कृतीचे प्रतीक आहे ती या लेणींच्या शिल्पात कशी काय?

आजूबाजूची सर्व शिल्पे हे बौद्ध संस्कृतीची असताना किंवा भ. बुद्धांच्या आयुष्याशी निगडित असताना, ही गजलक्ष्मी येथे कशी? हा प्रश्न कदाचित इतिहासकारांना अथवा पुरातत्त्वशाश्त्रज्ञांना पडला असण्याची शक्यता नाकारण्यात येत नाही मात्र त्यांच्या कोणत्याही लिखाणात हा प्रश्न दिसत नाही, अपवाद फक्त मार्शल, फुशर आणि मजुमदार यांनी १९३५ साली या शिल्पाला महामायाचे शिल्प म्हटले आहे.

मुळात ही सर्व शिल्प गजलक्षमी नसून राजकुमार सिद्धार्थाच्या जन्माच्या वेळेसचे महाराणी महामायाचे शिल्प आहे.

या शिल्पात महामाया संपूर्णपणे अलंकृत आहे. ती कमळावर बसलेली आहे. तिच्या दोन्ही बाजूला गज म्हणजे हत्ती असून ते कमळाची फुले अथवा इतर फुलांचा वर्षाव करताना दिसतात. काही शिल्पांत, हे गज पाण्याचा अभिषेक करताना दिसतात. महामाया ही महाराणी आहे, मग तिच्या अंगावर दागदागिने नसतील का? गज हे ऐश्वर्याचे प्रतीक आहेत. त्याच बरोबर तिला पडलेल्या स्वप्नाचा देखील हत्ती हे प्रतीक आहेत. उमललेले कमळ हे भ. बुद्धांचे प्रतीक आहे. हे शिल्प निश्चितपणाने महामायेचेच आहे.

ठाणाळे येथील लेणीं क्र. ७ च्या भिक्षु निवासगृहाच्या दारावर, पितळखोरा येथील लेणीं क्र. ४ च्या दारावर महामायेचे शिल्प आहे. हे शिल्प दाराजवळच्या कचऱ्यात सापडले होते. भारहूत आणि पितळखोरे येथील महामायेचे शिल्प सारखेच आहे. याच लेणींत आणखीन एक महामायेचे शिल्प पाहायला मिळते. जुन्नर येथील भूत लेणीतील चैत्यगृहाच्या दारावर चैत्य कमानीच्या खाली महामायेचे उभी प्रतिकृती आहे. अर्धगोल आकारात कमळाच्या पाकळ्यांच्या आकारात सात आकृती कोरल्या आहेत. त्यात मध्यभागी महामायेचे शिल्प आहे. इतर शिल्प हे हत्ती, यक्ष आणि कमळाची फुले आहेत. सांची येथील पश्चिम तोरणावर महामायेचे अर्धी मांडी घालून बसलेले शिल्प आहे. या शिल्पा भोवती कमळाची पाने, फुले, कळ्या व देठ दिसतात. भारहूत येथील स्तूपाच्या वर महामायेचे शिल्प आहे. ओरिसा येथील खंडगिरी आणि उदयगिरी येथील बुद्ध लेणींत देखील महामायेचे एक शिल्प आहे.

महाराणी महामायेचे हेच शिल्प नंतरच्या काळात गजलक्ष्मी म्हणून जैन आणि हिंदू मंदिरांमध्ये अथवा लेणीं मध्ये पाहायला मिळतात. बुद्ध लेणीं आणि त्यातील शिल्प यातून प्रेरणा घेत पुढे जैन आणि हिंदू शिल्पकलेचा जन्म झाला हे निर्विवाद सत्य आहे.

इतिहासाचे पुनरलेखन म्हणूनच गरजेचे आहे... सोबत काही लेणींमधील महामायेचे शिल्प...

अतुल मुरलीधर भोसेकर















गजराज आणि बुद्धिझम The Importance of Elephant in Buddhism

या पृथ्वीतलावावर गजराज प्राण्याचा निर्देश इतर कोणत्याही धर्मापेक्षा बुद्धांच्या धम्मात प्रखरतेने झालेला दिसतो. गजराजांचा उल्लेख हा प्रामुख्याने बुद्धांशी निगडित असल्याने गजराज आणि बुद्ध यांचा संबंध बौद्ध साहित्यात मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. सिद्धार्थ यांच्या जन्मा अगोदरपासून शुभ्रधवल गजराज याची बुद्ध व्यक्तिरेखेशी नाळ जोडली गेलेली आहे. सुळे असलेला शुभ्रधवल गजराज सोंडेत कमलपुष्प धरून तीन वेळा प्रदक्षिणा घालून उदरात प्रवेश करतो, असे स्वप्न कपिलवस्तू नगराची राणी महामाया देवी यांना पडले होते आणि ते निश्चितच अलौकिक होते. या स्वप्नाचा अर्थ सांगितला गेला की एका महान व्यक्तिमत्त्वाचा पृथ्वीवर जन्म होणार आहे. याचमुळे धम्मामध्ये गजराजाचा संबंध बुद्धांशी जोडला गेला. गजराज म्हणजे सामर्थ्य, शौर्यता, प्रामाणिकता आणि अलौकिक बुद्धी यांचा संगम होय. याचाच अर्थ अमर्यादीत अलौकीक बुद्धिमत्तेचे सामर्थ्य बुद्ध व्यक्तिमत्वाशी जोडले गेले आहे.

लेण्यांमध्ये, स्तूपाच्या ठिकाणी आणि विहारात गजराजाचे शिल्प आढळते. गजराज प्रतिमा हे बुद्धांचे अतुलनिय मानसिक सामर्थ्य दर्शविते. स्वतःच्या ताब्यात नसलेले, उधळलेले मन अपरिमित हानी करते. त्यास करड्या रंगाचा हत्ती म्हणून दर्शविण्यात येते. तर शांत, निर्मळ आणि ताब्यात असलेले मन हे शुभ्रधवल गजराज म्हणून संबोधले गेले. भरकटलेले मन भयंकर विध्वंस घडवून आणते. त्याला चुचकारत, ध्यानधारणा करत ताब्यात घेऊन शांत करणे, माणसाळावणे म्हणजेच मानवी मनाचे शुभ्रधवल शक्तिशाली गजराजात रुपांतर करणे होय. उधळलेल्या मनाला ताब्यात ठेवल्याने त्याचे सामर्थ्य कैक पटीने वाढते. म्हणूनच ९-१० व्या शतकात धम्माचा लय होत असताना दुःख मुक्तीचा मार्ग सांगणाऱ्या मूळ पुरुषाचे म्हणजेच बुद्धांचे रूपांतर इतर धर्मात अनेक प्रतिकांमध्ये झाल्याचे दिसून येते. गणेश आणि इतर अनेक दंतकथा मग त्याच्या पुष्ट्यर्थ रचल्या गेल्या. त्याची शहनिशा न करता आज त्यांनाच कवटाळून बहूजन समाज विश्वास ठेवून बसलेला दिसतो.

बहुतेक सर्व देशांत गजराज हे सौंदर्य, सामर्थ्य, बुद्धिमत्ता आणि शांततेचे प्रतीक मानले गेले आहे. तसेच गजराजाचे चिन्ह हे शुभ आणि उज्वल भविष्याचे प्रतीक म्हणूनही मानले जाते. भारतात प्राचीनकाळी अनेक राजवाड्यात गजराज प्रतिमा किंवा शिल्प सुरक्षिततेसाठी आणि सामर्थ्याचे प्रतीक म्हणून ठेवले जात असे. तसेच वाईट शक्ती पासून बचाव होण्यासाठी आणि चांगल्या गोष्टींचा भविष्यात उदय होण्यासाठी हत्तीचे शिल्प राजवाड्याच्या दारात उभारले जात असे. हत्ती जसा माणसाळल्यावर मानव प्राण्याची अनेक छोटीमोठी कामे करतो त्याचप्रमाणे उधळलेल्या मनाला शांत, निर्मळ केल्यावर त्याच्या सामर्थ्याने दुःख मुक्तीचा भवसागर पार करत येतो. गजराजाचे नयन हे नेहमी अलौकिक आणि गूढरम्य भासतात. म्हणूनच अनेक पुरातन शिल्पांमध्ये त्याची मुद्रा आपल्याला दिसून येते.

प्राचीन स्तुपात, कुडा-अजिंठा-वेरूळ-एलिफंटा-कान्हेरी अशा सारख्या असंख्य लेण्यात आणि प्राचीन भुजपत्रावर गजराजांची शिल्पे आणि प्रतिमा दिसून येतात. गजराज हा धीम्या गतीने चालतो आणि त्याच्या चालण्याने पायाखालची धरणी कंपित होत असते. तथागतांचे, ज्ञानी पुरुषांचे देखील असेच असते. ते जिथेजिथे जातात तेव्हा अंतरंगातील तरंगाने आजूबाजूस प्रसन्नता आणि शांतता पसरवितात. अज्ञजनांची दोलानामय कंपने शांत करतात. चित्त एकाग्रतेने, करुणेने भरून जाते. देवदत्ताने मारण्यासाठी सोडलेला नालागिरी गजराज हा देखील बुद्धांच्या सानिध्यात येताच तात्काळ शांत झाला हे त्याचे मोठे उदाहरण होय. म्हणूनच गजराज यांच्या प्रतिमांना आज भारत वर्षात सगळीकडे पुजले जात असले तरी त्याचा मूळ इतिहास विसरता कामा नये. पिढ्यानपिढ्या प्रतीकांची भाषा जरी बदलली तरी इतिहासाचे धागेदोरे मजबूत ठेवल्यास प्रतीकांचा मूळ हेतू बदलला जाण्याची शक्यता कमी होते.











स्टोन बुक म्हणून ओळखले जाणारे प्राचीन शिलालेख श्रीलंकेत सापडले आहे यावर शिलालेख आणि महामाया (सिद्धार्थ गोतम यांची माता) यांची प्राचीन शिल्प कोरलेले आहे. श्रीलंका.





20th century carved ivory tusk at Decorative Arts Gallery, National Museum, New Delhi, India.














भारतात अनेक विदेशी आले, सोण-चाँदी घेऊन गेले, पैसे घेऊन गेले, काही जण याच मातीत राहून पाखंड करु लागले... चीनी बौद्‌ध भिक्खू हे असे एकमेव होते ज्यांनी अध्ययन करण्यासाठी बौद्‌ध ग्रंथ घेऊन गेले... त्रिवार वंदन.

मूर्तींच्या लक्षणावरून ती गजलक्ष्मी नसून सिद्धार्थाची माता "महामाया" होय.



मूर्तींच्या लक्षणावरून ती गजलक्ष्मी नसून सिद्धार्थाची माता "महामाया" होय.

भारतीय मूर्तिकलेच्या जडणघडणीत बौद्धमूर्ती कलेचे विशेष मोलाचे योगदान आहे. मूर्तिकलेच्या सुरुवातीपासून बौद्ध धम्माच्या विशेष खाणाखुणा मूर्तिवर आढळतात. भारतामध्ये लेण्यांच्या माध्यमातून शिल्पकला बहरतच गेली आणि ती विकसित होत गेली. मूर्तिकलेचा प्रवास जर आपण चिकित्सकपणे अभ्यास केला तर बरेच सत्य आपल्या निदर्शनास येईल हे निर्विवाद सत्य नाकारता येत नाही. भारतामध्ये भगवान बुद्धांचे तत्त्वज्ञान जनमानसांत पर्यंत पोहोचले होते. सिद्धार्थ गौतमाच्या जन्माच्या आधीपासून ते तथागत गौतम बुद्ध होण्यापर्यंतचा हा प्रवास कथारुपाने लोकात रुजला होता. त्यातच सिद्धार्थ गौतमाच्या जन्माच्या आधीचा प्रसंग लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते. सिद्धार्थाच्या जन्माच्या आधी त्याची आई महामाया एक दिव्य स्वप्न पाहते. स्वप्नात तिला असे दिसते की चतुदिक्पालानी तिला मंचकासह उचलले व हिमालयाच्या माथ्यावर नेऊन, एका विशाल वृक्षाखाली ठेवून ते बाजूला उभे राहिले आहेत. नंतर सरोवराजवळ असणाऱ्या हत्तींनी तिला स्नान घातले वगैरे वगैरे. महामाया बसली आहे. सरोवरात सर्वत्र कमलपुष्प आहे आणि हत्ती तिला कलशाने स्नान घालत आहे.

नंतरच्या कालखंडात जेंव्हा मूर्तिकलेचा प्रारंभ झाला तेंव्हा ही महामायाची मूर्ती निर्माण झाली. परंतु कालांतराने तिला गजगौरी किंवा गजलक्ष्मी असे संबोधले गेले. पितळखोरा या ठिकाणी अशाच प्रकारचे शिल्प उत्खननात मिळाले असून सध्या हे शिल्प छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय मुंबई या ठिकाणी आहे. कमळावर विराजमान असणारी ही मातृदेवता द्विभुज आहे. तिची विशिष्ट केशरचना आकर्षक आहे. दोन्ही हातात अर्धविकसित सनाल कमलकलिका धारण केलेल्या आहेत. कानातील कुंडल तिच्या खांद्यावर रुळलेली असून हार कटक वलय, कटीसूत्र, पादवलफ, पादजालक इत्यादी अलंकार तिने परिधान केलेले आहेत. दोन्ही पायाचे तळवे एकमेकांना स्पर्श होतील अशाप्रकारे मांडी घालून देवी बसलेली आहे. चेहऱ्यावर प्रचंड दिव्य तेज व शांत भाव दिसत आहे. दोन्ही बाजूस शेजारी अलंकृत हत्ती असून सोंडेत धरलेल्या कुंभातून ते तिला स्नान घालत आहेत. उजवीकडील हत्ती भंगला आहे. देवी ज्या कमलपुष्पावर विराजमान आहे त्या कमल पुष्पाच्या आठ पाकळ्या अंकित केलेल्या दिसतात.

मूर्तीच्या लक्षणावरून ती गजलक्ष्मी नसून सिद्धार्थाच महामाया आहे. सुरवातीच्या काळातील हे शिल्प द्विभुज होते. नंतरच्या काळात देवीला चतुर्भुज दाखवण्याचा प्रघात सुरु झाला. असे असले तरीही नंतरच्या काळात गजलक्ष्मी म्हणून राजमान्यता प्राप्त ही देवी गौतमाची माता महामाया होय. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अशा मूर्ती आपणास पहावयास मिळतात काही ठिकाणी स्वतंत्र शिल्प दिसून येते, तर बऱ्याच वेळेला मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या ललाटलिंबावर या देवीचे अंकन केलेले दिसून येते.

- डॉ. धम्मपाल माशाळकर, सोलापूर (लेखक - मूर्ती अभ्यासक, मोडी लिपी व धम्मलिपी तज्ञ)





Property of Special Collections, University of Washington Libraries




इतिहासकार डी. डी. कोसंबी गणित के प्रोफेसर थे, बीएचयू में, एएमयू में, फर्ग्युसन काॅलेज में और अंत में टाटा इंस्टीट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च में। सो उन्होंने मिथक से हटते हुए 2 + 2 = 4 बता दिया।


उन्होंने बताया कि विष्णु की पत्नी गजलक्ष्मी की परिकल्पना दो हाथियों द्वारा प्रक्षालित कमलासन पर बैठी बुद्ध की माता से की गई है।

राजेंद्र प्रसाद सिंघ









84. (दायें) दो हाथियों द्वारा प्रक्षालित कमलासन पर बैठी बुद्ध की माता मायादेवी। बाद में इसी विषय को गजलक्ष्मी (विष्णु नारायण की पत्नी लक्ष्मी)मान लिया गया। साँची के विशाल स्तूप के तोरण-द्वार से।



महामाया यांचे प्राचीन शिल्प, अंगकोर वाट, कंबोडिया.



नालंदा विद्यापीठ.

नालंदा विद्यापीठ: विश्व जगतात सर्वात प्राचीन बौद्ध विश्वविद्यालय म्हणून नालंदा विद्यापीठाची ख्याती आहे. नालंदा हे बिहार राज्यातील सुप्रसिद्ध असे प्राचीन बौद्ध अवशेषांचे एक स्थळ आहे. नालंदा हे बुद्धाचे पट्टशिष्य सारीपुत्त ह्यांचे जन्मस्थान असल्यामुळे बौद्धांचे प्रसिद्ध तिर्थक्षेत्र होते. ते गंगेच्या काठी पाटण्याच्या आग्नेयीस सुमारे ७० कि.मी. वर व राजगिरच्या उत्तरेस ११-२७ कि. मी. वर वडगाव नामक खेड्याच्या परिसरात वसले होते. नालंदा हे प्राचीन विद्यापीठ म्हणून भारतात ख्यातनाम होते. प्राचीन वाङ्मयात नालंदाची नल, नालक, नालकग्राम, नालंद वगैरे भिन्न नामांतरे आढळतात. नालंदा या नावाविषयी अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. इ. स. ४१० मध्ये चिनी यात्रेकरू फाहियान यांने नालंदाला भेट दिली होती, त्यावेळी नालंदाचे हे विहार बौद्धाचे विद्यालय (बौद्ध विद्यालय) होते. तरी सुद्धा वडगावच्या ह्या नालंदा बौद्ध विहारात, इ. स. च्या तिसऱ्या शतकात नागार्जुन आणि इ. स. ३२० मध्ये आर्यदेव हे दोन विद्वान पंडीत निर्माण झालेत यावरून या विद्यापीठाचे प्राचीन काळात किती महत्व असेल याची कल्पना येते.

नालंदा विद्यापीठाची जागा प्रशस्त व निसर्गरम्य होती. एका विस्तृत परकोटात विद्यपीठाच्या इमारती होत्या. या इमारतीपैकी काही महाविद्यालयाच्या काही ग्रंथालयाच्या तर काही आचार्याच्या व विद्यार्थ्यांच्या निवासासाठी इमारती होत्या. काही इमारती दोन मजली, काही चार मजली तर काही नऊ मजली होत्या. इमारतीच्या भिंती व स्तंभ अलंकृत होते. विद्यापीठाच्या भोवताली अत्यंत रमणीय बाग होती. ठिकठिकाणी कमळांची सरोवरे होती. निवास स्थानात विपूल प्रमाणात स्नानगृहे व इतर आवश्यक सोयी होत्या. तसेच विद्यापीठाच्या प्रांगणात क्रिडांगणे होती. या विद्यापीठात जवळपास १५१० अध्यापक आणि १०,५०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. नालंदा विद्यापीठातील धर्मगंज या विभागात जगप्रसिद्ध नालंदा विद्यापीठाचे विशाल ग्रंथसंग्रहालय होते. ग्रंथसग्रलयाच्या तीन इमारती होत्या, त्यांची नोंद 'धर्मगंज' मध्ये रत्नसागर, रत्नोदधी आणि रत्नरंजन नावाच्या तीन इमारतीत नालंदा विद्यापीठाचा ग्रंथसंग्रह सामावलेला होता. यापैकी रत्नोदधी ही इमारत नऊ मजली होती आणि प्रामुख्याने या इमारतीत तांत्रिक पंथासंबंधीचे वाङ्मय होते. रत्नसागर आणि रत्नरंजन ह्या दोन इमारती सहा मजली होत्या. या तीन इमारतीमध्ये नालंदा विद्यापीठाचे लक्षावधी ग्रंथ ठेवण्यात आले होते. एवढा प्रचंड ग्रंथ संग्रह त्या काळात जगाच्या पाठीवर कुठेही नव्हता. येथील ग्रंथांना रत्न समजून ग्रंथालय भवनांना इतकी यथार्थ नावे दिलेली होती की ती अन्यत्र कुठेही आढळत नाही.

नालंदा विद्यापीठातील अभ्यासक्रम उच्च कोटीचा होता. तसेच या विद्यापीठात उच्च शिक्षणाचीच सोय होती. त्यात व्याकरण, साहित्य, तर्कशास्त्र, धर्मशास्त्र, योग्यविद्या व अठरा संप्रदाय या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश होता. बौद्ध धर्माशिवाय जैन धर्माचेही तत्वज्ञान नालंदा विद्यापीठात शिकविले जात होते. धर्मग्रंथाबरोबरच व्यवहारिक विषयांचे ज्ञानही येथे दिले जात. चित्रकला, शिल्पकला, मंत्रविद्या,

गणितशास्त्र, स्थापत्यकला अशा विविध विषयांचे अध्ययन नालंदा विद्यापीठात त्यावेळी होत होते. त्याच प्रकारे विविध भाषांचेही अध्यापन येथे चालत होते.

परदेशातूनही विद्यार्जनाच्या ओढीने विद्यार्थी नालंदा विद्यापीठात येऊन नालंदा विद्यापीठाची ख्याती लवकरच सर्वत्र पसरली होती. विद्यापीठात प्रवेश दुर्मिळ होता. नालंदा विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परिक्षा होत असे. प्रवेश परिक्षेत अत्यंत कठीन प्रश्न विचारले जात असत. प्रवेश परिक्षा खुप कठीन होत असे. प्रवेश परिक्षेत केवळ २०% ते ३०% विद्यार्थी उत्तीर्ण होत असत आणि तेवढ्यानांच विद्यापीठात प्रवेश मिळत असे विद्यार्जन निःशुल्क होते. एवढेच नव्हे तर विद्यापीठातील आचार्यासाठी ज्याप्रकारे भोजन-निवासाची व्यवस्था होती. त्याच प्रकारे विद्यार्थ्यांसाठी ही निवासाची व्यवस्था केलेली होती.

नालंदा विद्यापीठात ऋषीतुल्य आचार्याची फार मोठी परपंरा निर्माण झाली. धर्मपाल, चंद्रपाल, गुणमती, स्थिरमती, प्रभामित्र, ध्यानचंद्र, शीलचंद्र यासारखे श्रेष्ठ कुलपती नालंदा विद्यापीठात होऊन गेले. नालंदा विद्यापीठाच्या प्रदीर्घ पंरपरेत नागार्जुन, आर्यदेव, वसुबंधू, अंग, शीलभद्र, शांतरक्षित, जिनमित्र व ज्ञानचंद्र यासारखे थोर विद्वान आचार्य नालंदा विद्यापीठातून होऊन गेले. येथील आचार्य सर्व प्रकारच्या विद्यामध्ये पारंगत (निपून) होते. त्याही पलीकडे त्यांनी तत्वज्ञान, न्यायशास्त्र व तंत्रज्ञान यासारख्या विषयावर महत्वपूर्ण ग्रंथही लिहलेत. विशुद्ध चारित्र्य आणि अजोड विद्वता याबद्दल या सर्व ऋषीतुल्य आचार्याची सर्वत्र ख्याती होती.

नालंदा विद्यापीठामध्ये चीन, मंगोलिया, थाईलंड, श्रीलंका, बर्मा, कोरिया इत्यादी देशातून विद्यार्थी विद्यार्जनाकरिता येत होते. विद्यार्थाकडून कोणत्याच प्रकारची शुल्क घेत नव्हते. विद्यार्थासाठी भोजनाची व्यवस्था व वस्त्र मोफत दिले जात होते. या विद्यापीठाकरिता धन (संपत्ती) गावा-गावातून येत होते. यांच्या नावाकरिता २०० समृद्ध गांव लागलेले होते. ज्यांच्या मधून ५०% धन एकट्या सम्राट हर्षवर्धनांनी दिलेले होते ही गोष्ट बौद्ध जगतात गौरवाचा विषय आहे. तथागत बुद्धाच्या काळात नालंदा एक समृद्ध गाव होता (कस्बा) या विद्यापीठात बौद्ध धर्माच्या अनुयायांची संख्या जास्त होती. येथे प्रावारिक नावाच्या एक श्रीमंताने तथागत प्रावारिक भवन आणि आम्रवन दान दिलेले होते. या ठिकानी कधी-कधी तथागत बुद्ध निवास करीत होते. एक वेळा तर महावीर जैन आणि तथागत बुद्ध एकाच वेळी नालंदा मध्ये थांबले होते. (निवास केला होता)

बौद्ध धर्मग्रंथाचे अध्ययन करणे आणि धार्मिक स्थळांना भेटी देणे हा ह्यू-एन-त्संगाचा भारत भेटीमागील मुख्य उद्देश होता. नालंदा विद्यापीठात त्याने संस्कृतचे व बौद्ध तत्वज्ञानाचे अध्ययन केले. नालंदा वर्षे राहून विद्यापीठात असतांना त्यांनी अध्यापनाचेही कार्य केले. सातव्या शतकात नालंदा विद्यापीठात आलेल्या ह्यू-एन-त्संगांने नालंदा विद्यापीठासंबंधी सविस्तर माहिती लिहून ठेवलेली आहे. ह्यू-एन-त्संग नालंदा विद्यापीठात आले त्यावेळी म्हणजेच सम्राट हर्षवर्धनाच्या काळात नालंदा विद्यापीठामध्ये १०,००० विद्यार्थी अध्ययनाचे कार्य करीत

होते. व १५०० शिक्षक अध्यपनाचे कार्य करीत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरूपद शिलभद्र याने भूषविले होते. प्रतिदिन वाद-विवाद व चर्चा आयोजित केल्या जात. विद्यापीठात रोज १०० भाषणे व परिसंवाद विद्वानाकडून होत असत. विद्यार्थ्यांना राहण्यासाठी अभ्यास वर्गासाठी होत्या. असलेल्या खोल्यांची संख्या ३,००० ते ४,००० होती. १,००० मोठ्या खोल्या अभ्यास वर्गासाठी होत्या.

सम्राट हर्षवर्धनाच्या काळात नालंदा विद्यापीठ जगविख्यात विद्याकेंद्र होते. या विद्यापीठात शिक्षणासाठी देशाविदेशातून हजारोंच्या संख्येने विद्यार्थी येत असत. आशिया खंडातील प्रसिद्ध बौद्ध विद्यापीठ म्हणून नालंदा विद्यापीठ प्रख्यात होते. सम्राट हर्षवर्धनांने नालंदा विद्यापीठाच्या योगत्येसाठी चालत असे शिवाय हर्षाचा राजाश्रय होताच.

इ. स. १२०० च्या सुमारास मुहमंद बिन बखत्यार खिलजीने “ज्ञान कुराणातच आहे, अन्यत्र नाही.” अशा भ्रामक व खुळचट समजुतीने नालंदा विद्यापीठावर ब्राह्मणांच्या मदतीने घणाघाती प्रहार केला. विद्यापीठातील हजारों भिक्खूची, अध्यापकाची सरसकट कत्तल करण्यात आली. अतिशय खुणशीपणाने व क्रोर्याने 'जिहाद' च्या भावनेतून धर्मवेड्या मुसलमानांनी नालंदा विद्यापीठाचा विध्वंस करून नालंदा विद्यापीठ जाळून टाकले. या क्रूर, अमानुष, रानटी विध्वंसात 'धर्मगंज' विभागातील लक्षावधी बहुमोल ग्रंथसंपदा आगीच्या भक्षस्थानी पडून जळून खाक झाली. आज नालंदा विद्यापीठाचे अवशेष देखील पहायला दुर्लभ झाले आहे.

नालंदा विद्यापीठाचे वास्तविक महत्व इ. स. पाचवी शताब्दी मध्ये गुप्त वंशीय राजाच्या शासन काळापासून प्रकाशात येते. जेव्हा भारतात प्रथम विश्वविद्यालयाची स्थापना झाली. यापूर्वी भारतीय शिक्षण व्यवस्था दोन स्वरूपात (प्रकारची) होती. पहिल्या प्रकारची शिक्षण व्यवस्था केवळ समाजातील उच्च वर्णीय लोकांकरिता होती. आणि दुसरी शिक्षण व्यवस्था जाने-माने आचार्य आपल्या घरीच शिष्याच्या समुहाला शिक्षण देत होते. ज्याला गुरुगृह (पूर्वीची आश्रम व्यवस्था) म्हटल्या जाते. परंतु बौद्धांनी शिक्षण हे जन सामान्यकरिता उपलब्ध करून दिले. आणि विहारातून बौद्ध विश्वविद्यालयात झाले आणि ज्यात नालंदा हे सर्वात पहिले विद्यापीठ होते.

भारतीय इतिहास कोश नावाच्या ग्रंथात लिहले आहे की, गुप्त सम्राट बालदित्य ने सन ४७० इ. मध्ये नालंदा मध्ये एक सुंदर विहार निर्माण केले आणि त्यामध्ये तथागत बुद्धाची ८० फूट उंचीची ताब्यांच्या मूर्तीची स्थापना केली.

नालंदा विद्यापीठाची पुरातात्वीक साक्ष म्हणजे कुमारगुप्त प्रथम च्या काळातील मिळालेले सिक्के आहेत. युवान च्वांग च्या अनुसार गुप्त वंशाच्या पाच राजांनी क्रमश पाच विहार निर्माण केले होते. या व्यतिरिक्त बालदित्य ने सुद्धा एक विहार बांधले होते आणि सहावा विहार मध्ये भारताच्या शासकाने बनविले होते. गुप्त शासकांची नालंदा विद्यापीठाच्या संदर्भात रूची म्हणजे नरसिंहगुप्त, कुमारगुप्त (II) बुद्धगुप्त व विष्णुगुप्त यांची येथील मिळालेल्या शिलावरून त्याची रूची स्पष्ट होते.

बौद्ध जगतात नालंदा विद्यापीठाची प्रसिद्धी अन्तरराष्ट्रीय ख्यातीची होती इथे मिळालेले या काळातील ताम्रपत्र अभिलेख यावरून या विद्यापीठाच्या अन्तरराष्ट्रीय ख्यातीची कल्पना करता येईल. या प्रसिद्ध बौद्ध विद्वानाचे गंभीर ज्ञान, अथक परिश्रम आणि अनुशासीत आचरण इत्यादी. पाल राजाच्या शासन काळात नालंदा विद्यापीठ आपल्या उच्च शिखरावर पोहचले होते. नागार्जुन, आर्यदेव, असंग, वसुबंधू इत्यादी येथील प्रधान पंडीत होते.

नालंदा विद्यापीठ मुहमंद बख्तियार खिलजी ने केलेल्या आक्रमणामुळे विद्यापीठ पूर्णपणे तहस-नहस झालेले होते. इ.स. १२३५-३६ मध्ये नालंदा विद्यापीठात येणारे तिब्बती यात्री धर्मस्वामी यांनी नालंदा विद्यापीठाच्या दुलर्भ स्थितीचे वर्णन केलेले आहे. त्यांच्या नुसार जास्तीत जास्त इमारती नष्ट झाल्या होत्या. आणि केवळ प्रधान पंडीत राहूलश्रीभद्र आणि त्याचे ७० शिष्य (Students) राहीले होते. याप्रकारे नालंदा विद्यापीठाचे महत्व पूर्णपणे नाहीसे झाले होते (कमी झाले होते) इथ पर्यंत की नालंदा विद्यापीठाचे नाव सुद्धा विसरले होते. परंतु अलेक्झेण्डर कनींघम ने पुन्हा या विद्यापीठाची ओळख करून आधुनिक जगाच्या समोर एक प्राचीन जगातील महान विश्वविद्यालय आहे. हे स्थापित केले.

सर्वप्रथम नालंदा विद्यापीठाच्या अवशेषावर (खण्डर) बुछनॉन हॅमीलटन (Buchanon Hamilton) याची नजर पडली. जेव्हा की ते इ. स.१८११-१२ मध्ये येथे आले होते. परंतु या विद्यापीठाची वास्तविक ओळख जवळपास ५० वर्षांनंतर अलेक्झण्डर कनींघम यांच्या द्वारे झाली. त्याने चिनी यात्री यांच्या वर्णनावरून आणि प्राप्त अभिलेखाच्या आधारे या विद्यापीठाची ओळख करून दिली.

सन १९१५ मध्ये भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागानी नालंदाच्या उत्खनन कार्याला सुरुवात केली. आणि भारतातील हे सर्वात पहिले विश्वविद्यालय आहे असे संपूर्ण जगाला दाखविले. आणि भारतातील ज्ञानाची प्राचीन परंपरा असलेल्या महान केंद्राची प्रतिष्ठा पुन्हा स्थापित केली.

नालंदा विद्यापीठ केवळ ज्ञानाचेच नाही तर अन्य कलांचे सुद्धा केंद्र होते. आजच्या युगातील नालंदा विद्यापीठाचे प्राचीन वैभवाला जीवंत ठेवण्यासाठी इथे ‘नव-नालंदा महाविहाराची' सन् १९५१ मध्ये स्थापना केलेली आहे. या महाविहाराची स्थापना महान विद्वान व भिक्खू जगदीश काश्यप यांनी केली. त्यांनी नालंदा विद्यापीठाचे प्राचीन काळातील वैभव (महत्व) वापस (परत मिळविण्यासाठी) आणण्याकरिता जीवनाचा शेवटच्या क्षणापर्यंत कार्य केले. या प्रकारे नालंदा हे प्राचीन इतिहासातील जिज्ञासुची ज्ञान-पिपासाची पूर्तता करण्याबरोबरच बौद्ध धर्माच्या संबंधीत आधुनिक ज्ञानाचे इच्छुकाचे पण केन्द्र बनले आणि म्हणून प्राचीन काळासारखे आज सुद्धा नालंदामध्ये थाईलंड, बर्मा, श्रीलंका, जपान इत्यादी देशातून भिक्खू व प्राप्ती करतात. (उपासक येऊन भेट देऊन) प्राचीन विश्वविद्यालयाला जीवंत करून ज्ञानाची प्राप्ती करतात.

प्राचीन वाङ्मयीन पुराव्यानुसार नालंदाची प्राचीनता मौर्यकाळातील अशोकाच्या साम्राज्यापर्यंत जाते, तथापी या स्थळाची भरभराट इ.स. सनाच्या पाचव्या सहाव्या शतकापासून पुढे झाली, आणि हर्षवर्धन व पाल राजे (आठवे ते बारावे शतक) यांचा उदार आश्रय येथील विद्यापीठास मिळाला. कॅनिंगॅहम यांनी या स्थळाचा शोध १८७१ मध्ये लावला; पण प्रत्यक्ष उत्खनन मात्र १९५६ पासून पुढे कित्येक वर्षे करण्यात आले. यात अनेक मंदिरे, विहार, स्तूप, मुद्रा व ब्राँझच्या मुर्ती सापडल्या. अनेक पायऱ्या असलेली उत्तुंग विहारे, मध्ये चौक व भोवताली व्हरांडा आणि अनेक खोल्या असलेले अनेक विहार आणि सभागृहे आढळली. यावरून प्राचीन विद्यापीठीय जीवनाची कल्पना येते, या इमारतीचे स्तंभ आणि भिंती कलात्मक चित्रांनी व कोरीव कामाने सजविलेल्या होत्या. विद्यार्थ्यांचे जीवन कसे होते. यावर प्रकाश टाकणारा पुरावाही येथे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाला आहे. विहार अनेक आगीच्या भक्षस्थानी पडल्याचा पुरावाही मिळतो. सुमात्रांच्या राजाच्या विनंतीवरून देवपाल राजाने विहारांना गावे इनाम ग्रंथाचा दिल्याचा ताम्रपट सापडला आहे. नालंदा विहाराच्या तसेच खाजगी व श्रेणीच्या मुद्राही बऱ्याच मिळाल्या आहेत. अनेक स्तुपात मठ व धार्मिक मजकूर असलेल्या मृण्मुद्राही हाती आल्या आहेत.

नालंदा विद्यापीठ प्राचीन भारतातील एक आदर्श विद्यापीठ, बिहार राज्यातील राजगिरच्या उत्तरेस ११-२७ कि. मी. अंतरावर हे विद्यापीठ होते. त्याची स्थापना इ.स. पाचव्या शतकाच्या सुरूवातीस झाली असावी. याचे श्रेय बौद्ध आचार्य नागार्जुन यांचा शिष्य आर्यदेव यास देतात. उत्खननात सापडलेल्या मुद्रेवर “श्री नालंदा महाविहार-आर्य भिक्खू संघस्य” असे लिहलेले आहे व तिच्या दोन्ही बाजूंवर सारनाथचे धर्मचक्र आहे.

नालंदा विद्यापीठाच्या सुमारे दीड कि. मी. लांब व सुमारे पाऊण कि. मी. रुंद क्षेत्रात विद्यापीठाची भव्य इमारत व वसतीगृह होते. त्याच प्रकारे सुसज्ज ग्रंथालयासाठी रत्नसागर, रत्नोदय व रत्नरंजक अशा आणखी ती इमारती होत्या, या ग्रंथालयाच्या विभागास धर्मगंग म्हणत, तसेच निवासासाठी ४,००० व अभ्यासासाठी १,००० खोल्या होत्या. १,००० विद्यार्थी व १,५०० शिक्षक होते आणि प्रत्येक दिवशी शंभर व्याख्याने होत. येथे राहणाऱ्यांना निवास, भोजन, कपडालत्ता, औषधोपचार व शिक्षण विनामुल्य असे. हा सर्व खर्च दान दिलेल्या १०० खेड्यांच्या उत्पन्नातून व इतर देणग्यांतून चालत असे.

चारित्र्यसंपन्न व बुद्धिवान शिक्षक, अभ्यासू व होतकरू विद्यार्थी, कुशल प्रशासन, राज्यकर्त्यांचा सतत लाभलेला आश्रय यामुळे नालंदा विद्यापीठाची उत्तरोत्तर सतत आठ शतके भरभराट होत गेली. भारतातील अध्ययन अध्यापनाच्या श्रेष्ठ परंपरेला सातत्य व समृद्धी मिळवून देण्यात या विद्यापीठाचा वाटा फार मोठा आहे.

ह्यू-एन-त्संगने संघरामाच्या संदर्भात फार मोठ्या प्रसन्नतेने वर्णन केलेले आहे. त्याने आपल्या प्रवास वर्णनात म्हटले आहे की, पद्धतशीर बांधलेले उंच उंच मनोरे, अनेक मडंळ व प्रासाद व ज्यांची शिखरे जणू अभ्रमंडळ भेदून वर गेली आहेत, अशा प्रकारचे विहारे सर्वात मोठे सुंदर दिसत असते. या विहाराभोवती एक निलवर्ण जलप्रवाह वाहत असून त्याची शोभा त्यातील नीलोत्पलांनी अधिकच वृद्धीगंत केली होती. तसेच विहारामध्ये तेजस्वी सुवर्ण-

पुष्पांच्या भारांनी वाकलेले कर्णिकार वृक्ष होते. तर बाहेर आम्रवृक्षवाटिकांच्या घनदाट छायेने भिक्खूची निवास्थाने आच्छादली होती. संघारामात आठ मोठ मोठे भव्य चौक होते. तसेच निरनिराळ्या चौकात भिक्खूनी राहण्यासाठी बांधलेल्या अनेक अशा चार मंजिली इमारती होत्या. संघारामात राहणाऱ्या व बाहेरून येणाऱ्या भिक्खूची संख्या नेहमी १०,००० पर्यंत असे, आणि हे सर्व भिक्खू महायानी पंथांचे आहेत. अठरा पंथांचे अनुयायी एकत्रीत झाले होते. संघारामात वैद्यकीय ग्रंथ गृहशास्त्र आणि गणित शास्त्र इ. येथे अनेक विषयांचा अभ्यास होतो. संघारामात १०० व्यासपीठे असून शिष्य आपल्या गुरूंचे पाठ प्रवचने मोठ्या निष्ठेने श्रवण करीत असतात. ह्यू-एन-त्संगच्या प्रवास वर्णनावरून नालंदा विद्यापीठात सहा संघाराम होते, त्यापैकी एक पडलेला होता. आणि पाच चांगल्या स्थितीमध्ये विद्यमान होते. यापैकी एक मगधचा राजा महेद्रादित्य कुमारगुप्त यांनी बांधला होता. तसेच त्यामध्ये एक विहार ही बांधले होते. येथे चाळीस श्रमणांना दररोज भोजन दिले जात असत. महेंन्द्रादित्य कुमारगुप्त नंतर त्यांचा पुत्र बुद्धगुप्त सिंहासनावर आरूढ झाला आणि त्यानेही आपल्या पित्याने बांधलेल्या संघारामाच्या दक्षिण दिशेला दुसरा संघाराम बांधला. त्यानंतर बुद्धगुप्तचा मुलगा तथागत गुप्त यांने तिसरा संघाराम पूर्वेस बांधला यांनतर नरसिंहगुप्त (बालदित्य) गादीवर बसला आणि त्यांने उत्तर-पूर्व दिशेला चवथा संघाराम बांधला.

बालदित्यांनी चवथा संघाराम बांधल्यानंतर त्याने फार मोठा समारंभ घेतला आणि त्या समारंभाकरीता अनेक दूर-दूरच्या भिक्खूना आमंत्रित केले तसेच दोन चिनी भिक्खू सुद्धा समारंभात भाग घेण्यासाठी आले होते. यानंतर बालदित्य यांने चिवर परीधान केले होते. बालदित्य श्रामणेर झाल्यानंतर त्यांचा पुत्र वज्रादित्य सिंहासनावर आरूढ झाल्यानंतर त्यांनी पश्चिम दिशेला आणि महेन्द्रादित्य कुमार गुप्तने बांधलेल्या उत्तरेला पाचवा संघाराम वज्रादित्यानी बांधला आणि शेवटचा संघाराम महेन्द्रादित्य कुमार गुप्तने बांधलेल्या संघारामाच्या पश्चिमेला दक्षिणच्या एका राजाने सहावा संघाराम बांधला. असे एकूण सहा संघाराम नालंदा विद्यापीठात होते. तसेच विद्यापीठात ८० सभागृहे होती आणि सर्व विद्यापीठ परिसराला प्रांगण भिंत होती आणि संघारामाच्या केंद्रस्थानी विद्यापीठ होते.

ह्यू-एन-त्संगच्या प्रवासवर्णावरून संघाराम आणि संघाच्या आसपास अनेक पवित्र स्थळे होती.

एक अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे इत्सिंग हा चिनी प्रवासी सातव्या शतकात भारतात आले होते. तेव्हा त्यांने सुद्धा बौद्ध धम्माचे शिक्षण या नालंदा विद्यापीठातूनच घेतलेले होते. इत्सिंगच्या सोबतच्या सहपाठीया मध्ये शांतरक्षित यांच्यासारखे विद्वान होते, इत्सिंगने 'रत्नोदधि' ग्रंथ संग्रहालयातून ४०० संस्कृत ग्रंथाचा चिनी भाषेत अनुवाद करून ते आपल्या देशात गेले. त्याच प्रकारे गौरवाची गोष्ट म्हणजे नालंदा विद्यापीठातील अनेक 'हस्तलिखित ग्रंथ' केंब्रिज व लंडनच्या ग्रंथ संग्रहालयात प्राप्त झाले आहेत.

नालंदा विद्यापीठात अध्ययन करण्यासाठी येणारे विद्यार्थी तीन प्रकारात मोडले जात होते. त्यात पहिला भिक्खू भिक्खूना बौद्ध धर्मग्रंथाचा व तत्वज्ञानाचा अभ्यास करावा लागत असे. दुसऱ्या प्रकारचे विद्यार्थी ब्रह्मचारी

ब्रह्मचारी विद्यार्थ्यांना सर्व परित्याग करून ते धार्मिक व ऐहीक वाङ्मयांचा अभ्यास करू शकत होते. तिसऱ्या प्रकारचे विद्यार्थी हे मानवक असत, मानवक यांना बौद्ध धर्म ग्रंथांचे शिक्षण दिले जात होते. परंतु मिक्षू होण्याकरीता त्यांच्यावर सक्ती होत नव्हती ब्रह्मचारी व मानवक या दोन्ही प्रकारातील विद्यार्थ्यांना मात्र विहारात राहण्याची परवानगी होती, परंतु खर्च मात्र स्वतः करावा लागत असे तसेच विहारात शिस्त न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षाही होत असे आणि विहारातील विद्यार्थ्यांना विद्वानांच्या सभातून आपले ज्ञान, तसेच आविष्कारशक्ती सिद्ध करून दाखवावी लागत असे.

इत्सिंग आपल्या प्रवासवर्णनात म्हणतात की, “वादविवाद अथवा शास्त्रार्थ ही नालंदातील प्रमुख शिक्षण पद्धती होती”.

ह्यू-एन-त्संग जेव्हा नालंदा विद्यापीठात गेले तेव्हा नालंदाच्या लोकांनी ह्यू-एन-त्संगचे मोठ्या आदराने स्वागत केले होते. ह्यू- एन-त्संग यांच्या स्वागताचे वर्णन असे की, २०० भिक्खू व एक हजार बौद्ध धर्मीय लोक (जनता) हातात पताका, आतपत्रे, सुगंधी द्रव्ये व फुले इ. घेवून मिरवणुकीने त्यांचे स्वागत करण्यासाठी सारी जनता नगराबाहेर आली होती. जेव्हा ही मिरवणुक नगर द्वारपाशी पोहचली तेव्हा मठातील अखिल भिक्खूगण त्यात सामील झाले. "अभिवादन समारंभ" संपल्यानंतर अधिपतीच्या व्यासपीठावर एक खास आसन ठेवण्यात आले होते व त्यावर बसविण्या संदर्भात धर्मनायकाला विनंती करण्यात आली. यानंतर सर्व भिक्खू व सामान्यलोक आपापल्या ठिकाणी असल्यावर, ह्यू-एन-त्संग यांनी मठात वास करावा व मठातील भिक्खूची सर्व भांडी व सामान यांचा उपयोग करावा आणि त्याला उपाध्याक्षाने घंटानाद करून जाहीर विनंती करावी, असे सांगण्यात आले, स्वागत समारंभ संपल्यानंतर या विशाल विहाराचा अधिपती 'शिलभद्र' यांना 'धर्मनिधी' या नांवानेही संबोधित होते. ह्यू-एन-गंगचा मार्गदर्शक त्याला जेथे शिलभद्र बसले होते तेथे घेऊन गेले. शिलभद्राच्या समोर येताच ज्याप्रमाणे शिष्य गुरूला अभिवादन करतात त्याचप्रमाणे ह्यू-एन-त्संगने त्यांना (शिलभद्राला) अभिवादन करून त्यांचा सत्कार केला. ह्यू-एन- त्संगला शिलभद्राने त्यांच्या प्रवासाबद्दल व प्रकृतीबद्दल कुशल प्रश्न विचारल्यानंतर शिलभद्राने ह्यू-एन-त्संग आणि त्यांचा बरोबरच्या भिक्खूकरिता आसने मागविली व त्यावर आसनस्थ होण्याकरीता त्यांना विनंती केली. मंडळी आसनस्थ झाल्यावर भारतात येण्याचे ह्यू-एन-त्संगचे काय उद्देश आहे? या बद्दल पृच्छा केली. ह्यू-एन-त्संगने उत्तर दिले की “मी चीनहून विज्ञानवादाचा अभ्यास करण्यासाठी येथे आलो आहे.” ह्यू-एन-त्संगच्या मुखातून या प्रकारचे उत्तर बाहेर पडताच शिलभद्राच्या डोळ्यातून अश्रुचा प्रवाह सुरू झाला. ह्यू-एन-त्संगच्या आगमनाबद्दल शिलभद्र यांना पूर्वबोध झाला होता. ह्याचे सविस्तर वर्णन करण्याकरीता शिलभद्रांनी भिक्खूना आज्ञा केली. ह्यू-एन-त्संगाने शिलभद्राच्या पूर्वबोधाचे भिक्षूंकडून वर्णन ऐकल्यानंतर ते म्हणाले की, “ज्याअर्थी माझे आगमन आपल्या स्वप्नाप्रमाणे झाले आहे. त्याअर्थी हे कृपानिधे, मला धर्म विद्या देवून ज्ञानमृत पाजा व स्वामीनिष्ठ नम्र सेवकाप्रमाणे आपली मनोभावे सेवा करण्याची संधी द्या.

वरिल सर्व चर्चा संपल्यानंतर ह्यू-एन-त्संगची बालदित्य राज्याच्या विहारात बुद्धभद्राबरोबर राहण्याची व्यवस्था करण्यात आली. ज्या विहारा ह्यू-एन-त्संगची राहण्याची व्यवस्था केली ते विहार चार मजली होते. या विहारात सात दिवस राहील्यानंतर ह्यू- एन-त्संग बोधीसत्व धर्मपालांच्या ह्यू-एन-त्संगने नालंदाचे शेजारी राहावयास गेले.


ह्यू-एन-त्संगने नालंदाचे कुलपती शिलभद्र यांचे जवळ शिक्षण घेण्याची जिज्ञासा प्रकट केली तेव्हा, शिलभद्राने ह्यू-एन- त्संगला प्रथम "सुर जयसेन" या एका क्षत्रिय विद्वानाकडे 'योगदर्शन' आणि 'न्यायदर्शन' या शिक्षणाकरीता पाठविले. सुरथ जयसेन हा दर्शन व शब्द शास्त्राचा महान विद्वान होता. जयसेनने बोधीसत्व स्थिरमती यांच्याकडून शब्द विद्येचे शिक्षण घेतले होते. सुरथ जयसेन यांनी अनेक महान पंडीताकडून अध्ययन समाप्त केल्यानंतर त्यांनी नालंदा विद्यापीठात प्रवेश केला होता. आणि महान विद्वान कुलपती शिलभद्र यांचे कडून बौद्ध ग्रंथाचे अध्ययन केले होते. जेव्हा ह्यू-एन-त्संग आपल्या गुरूसोबत बुद्धगयाचे महाबोधी विहाराचा उत्सव पाहण्याकरीता गेले होते, तेव्हा त्यांनी तेथे भगवान बुद्धाच्या पवित्र धांतूना सूर्य प्रकाशाप्रमाणे तेजस्वी स्वरूपात पाहिले होते.

संदर्भ: प्राचीन भारतातील प्रमुख बौद्ध विद्यापीठे

डॉ.माणिक गजभिये



















१,४२३ वर्षे प्राचीन शाओलिन संघराम, हेनान प्रदेश, चीन.






少林寺

少林寺





माउंट एमेई वर बांधण्यात आलेले २,००० वर्षे प्राचीन बौद्ध संघाराम, सिंचूआन, चीन.

ईसवीसन १ ल्या शतकातील समंतभद्र बोधिसत्व यांचे विहार. १०,१६७ फुट उंच टेकडीवर असलेले बुद्ध विहार.


















अंगकोर वाट महाविहार, कंबोडिया.

इ.स.१४३२ नंतर अंगकोर वाट हे भव्य विहार संकुल काही अज्ञात कारणाने निर्मनुष्य झाले. आजूबाजूस वाढलेल्या घनदाट जंगलामुळे दृष्टीआड झाले. अनेक वर्षे विस्मरणात राहिले. अजिंठ्याचा शोध जसा २८ एप्रिल १८१९ रोजी मद्रास पलटणीतील एका शिपायाने लावला तसाच अंगकोर वटचा शोध सन १८६० मध्ये फ्रेंच संशोधक हेनरी मौहोट यांनी लावला. लाओस येथे तापाने मरण पावल्यावर त्यांच्या डायरीतील लेखनातून त्यांनी केलेल्या संशोधनाचा सुगावा लागला. आणि हे भव्य शिल्प विहार संकुल जगाला माहीत झाले.

येथील असंख्य बुद्धमूर्ती शिल्पांची लुटालूट फ्रेंचांनी व ब्रिटिशांनी केली. त्यावेळी युरोपमध्ये अनेक खाजगी संग्रहालये उदयास आली. त्यांनी जुन्या शिल्पांची तस्करी करून रग्गड पैसा मिळविला. १९९२ साली युनेस्कोने जागतिक वारसा यादीत या स्थळाचा समावेश केला. त्यामुळे हे स्थळ सुरक्षित झाले असून कंबोडिया आता तेथे सुधारणा करीत आहे. युनेस्को जागतिक वारसा स्थान.


















शाक्यमुनि बुद्‌ध यांचे निर्वाण अवस्थेतील भव्य शिल्प..चीयांगशी प्रदेश, चीन.

उंची ६८ मीटर आणि लांबी ४१६ मीटर आहे.

या शिल्पाचे कोरिव काम २००२ साली सूरु झाले आणि शिल्प पूर्णत्वास येण्यासाठी दोन वर्षे लागली.




अवलोकेतेश्वर बोधिसत्व













हिंदी मध्ये 'जुनं' याला 'पुराना' म्हणतात, पुराण म्हणजे जुनं(old) इथे सगळं बुद्धाचच पुराण, जुनं आहे.

२,२०० वर्षे प्राचीन काहू जो-दारो प्राचीन बौद्ध स्तूप. या स्तूपाच्या शेजारचा बौद्ध संघाराम असलेला भाग ३० एकर मध्ये व्यापलेला असून, १९१० मध्ये या स्तुपाचा शोध लागला.

या प्राचीन बौद्ध स्थळाचे २% -५% उत्खनन झाले आहे. उत्खनन अर्धवट ठेवण्यात आले आहे. आजही या ठिकाणी परदेशातील पुरातत्वीय संशोधक शोध घेतात आणि घेत राहावेत. या ठिकाणी तथागत बुद्ध यांची ध्यान मुद्रेतील शिल्प आणि उपासक यांची प्राचीन शिल्प सापडली आहेत.

ही प्राचीन बुद्ध आणि बोधिसत्व यांची शिल्प मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वास्तू संग्रहालयात (पूर्वीचे नाव प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम)मध्ये सुरक्षित ठेवण्यात आले आहे.

काहू जो-दारो मिरपूर खास, पाकिस्तान.










© Emmanuel Guddu

आहे.














ब्राझील मधील तथागत बुद्ध यांची भव्य मूर्ती. ब्राझील. ही पाश्चिमात्य देशातील सर्वात मोठी बुद्ध मूर्ती आहे.








१,६०० वर्षे प्राचीन ताशियांगशान बुद्ध लेणी, तीयानशूई, गांसू, चीन. या बुद्ध लेण्यात भव्य बुद्ध मूर्ती कोरलेली असून यात मूर्तीची उंची २३.३ मीटर उंच आणि १०.४ मीटर रुंद आहे. यात भव्य २२ बुद्ध लेणी कोरलेली आहेत.

#चीन #बुद्धलेणी #मराठी #बुद्ध #धम्म #संघ #मंगलमूर्ती #संस्कृती














अश्विन पौर्णिमा

बुद्धांनी भिक्षूंना पावसाळ्यात पाऊस-वारा, वादळ-पूर यांचा त्रास होऊ नये म्हणून आषाढ पौर्णिमा पासून तीन महिने (बौद्ध संस्कृतीत-वस्सा कालावधी) विहारांमध्ये राहून धम्माचा प्रचार करण्याचा आदेश दिला. अश्विन पौर्णिमेला पावसाळा संपतो. दरम्यान वस्सा कालावधीही संपतो.त्यानंतर बुद्धाने भिक्षूंना धम्म प्रसार करण्यास सुरुवात करण्याचा उपदेश दिले.

"चरथ भिक्खवे चारिकं बहुजन हिताय बहुजन सुखाय लोकानुकंपाय अत्थाय हिताय सुखाय देव मनुस्सानं देसेथ भिक्खवे धम्मं आदिकल्याण मंझे कल्याणं परियोसान कल्याणं"

अर्थ:- भिक्कूंनो, पुढे जा, चारही दिशांनी चालत जा आणि अनेकांच्या हितासाठी लोकांना सुखाचा धम्म द्या. जो प्रारंभी, मध्य आणि शेवटी कल्याणकारी आहे.

सर्वांना अश्विन पौर्णिमानिमित्त मंगलमय शुभेच्छा 🌹 🌹 🌹 🌹 🌹

सम्राट अशोक यांची भव्य मूर्ती, थाई बन, थायलंड.

थायलंड मधील वाट अशोकाराम बौद्ध मॉनेस्ट्री मधील भव्य मूर्ती त्याचबरोबर सिंह शिल्प आणि अशोक स्तंभ उभारण्यात आले.

१९६० मध्ये बांधलेले अशोकाराम बौद्ध मॉनेस्ट्री.




พระเจ้าอโศกมหาราช


พระเจ้าอโศกมหาราช


พระเจ้าอโศกมหาราช



सम्राट अशोक कालीन स्तंभ, फिरोज शाह कोटला, दिल्ली, भारत.

२,३०० वर्षे प्राचीन अशोक स्तंभ.



सोपारा येथील सम्राट अशोक यांचे शिलालेख. इसवी सन पूर्व ३रे शतक कालीन शिलालेख आहे.

हे प्राचीन बंदर सध्याच्या वसई तालुक्यात, ठाणे जिल्हयात आहे. सोपारा याचे प्राचीन नाव शूर्पारक (सुरपारक, सुप्पर, सौपर) असे होते. प्राचीन काळी भारताचा व्यापार याच बंदरातून चालत असे. त्यामुळे हे प्रसिध्द असे स्थळ होते.

इसवी सन १८८२ साली पंडित भगवानलाल इंद्रजी यांना एका शिळेवर आठव्या व नवव्या लेखाचा काही भाग सोपाऱ्याच्या पूर्वेस मातेला गांवी सापडला. हा लेख त्यांनी प्रकाशित केला. लेख असलेली शिळा सध्या मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तूसंग्रहालय येथे आहे. सोपारा येथे प्राचीन बौध्दस्तूपही सापडला आहे.

#सोपारा #शिलालेख #अशोका #धम्म #ठाणे #महाराष्ट्र









9th Major Edict of Ashoka found at Sopara, Vasai, District-Thane, Maharashtra.
Original Boulder preserved at Chhatrapati Shivaji Puran-vastu Sangrahalaya (Museum at Mumbai).
This image is created by Ashok from the original Photograph of the Boulder.

सम्राट अशोक:- कलिंग युद्धाचा प्रभाव, अशोका व बौद्ध धम्म आणि अशोकाचे शिलालेख.

1.कलिंग युद्धाचा प्रभाव

सम्राट अशोकाची गृह व विदेश नीती बौद्ध धम्माच्या आदर्शाने प्रेरित होती. सिंहासनावर आरूढ झाल्यानंतर अशोकाने युद्ध केले, जे कलिंग युद्ध या नावाने प्रसिद्ध आहे. या युद्धात मोठ्या प्रमाणात नरसंहार झाल्याने अशोकाचे मन व्यथित झाले. या युद्धामुळे बौद्ध भिक्खूंना मोठ्या प्रमाणात कष्ट उचलावे लागले. ज्यामुळे अशोक व्यथीत झाला. त्यामुळे अशोकाने जगाला शांततेचा संदेश देणाऱ्या तथागत बुद्धांचा धम्माचा आचरण करून आपल्या राज्यात बौद्ध धम्माची शिकवण आणि प्रसार करण्यास सुरुवात केली. अशोकाने आपल्या अखंड

भारतातील समुदायाला व सीमेवरील राज्यांना आपल्या आदर्शातमक विचारांनी प्रभावित केले. कलिंगच्या जनतेस अशोकाने सांगितले की त्यांनी राजास आपला पिता समजून त्याच्या आज्ञांचे पालन करावे व त्यावर विश्वास ठेवावा. त्याने अधिकाऱ्यांना आदेश दिला की, त्याच्या विचारांचा प्रचार सर्व प्रजेत करावा.

परकीय राज्यांना देखील अशोकाने सैनिकी विजयाने जिंकण्यापेक्षा आपल्या आदर्श विचारांनी जिंकण्याचे ठरवले. परक्या देशात सुद्धा त्याने मनुष्य व पशुंच्या कल्याणासाठी पावले उचलली.

त्याने पश्चिम आशिया व ग्रीक राज्यांत देखील आपले शांती दूत आणि बौद्ध भिक्खूसंघ पाठवले. या सर्व बाबी शिलालेखावरून आधारित आहेत. बौद्ध इतिहासानुसार, अशोकाने बौद्ध धम्माचा प्रचारासाठी आपले धम्मप्रसारक श्रीलंका व मध्य आशियात पाठवले. एका प्रबुद्ध शासकाच्या रूपात अशोकाने प्रचाराद्वारे आपले राजकीय प्रभावक्षेत्र वाढविले.

2.अशोक व बौद्ध धम्म

कलिंग युद्धाचा परिणाम म्हणून अशोकाने बौद्ध धम्माचा स्वीकार केला आणि प्रसार केला. त्याने बौद्ध भिक्खुसंघाला मोठ्या प्रमाणात दान दिले व सर्व बौद्ध स्थळांची यात्रा केली. या यात्रेचा उल्लेख अशोकाने धम्म यात्रा म्हणून केला. अशोकाने बौद्ध धम्म परिषदेचे (संगिती) आयोजन केले व धम्मप्रचारकांना केवळ दक्षिण भारतातच नाही तर श्रीलंका, म्यानमार इत्यादी देशात सुद्धा धम्म प्रचारासाठी पाठवले. अशोकाचा प्रजेवर अतिशय उच्च आदर्श होता. हा आदर्श म्हणजे राजाचे पित्यासमान असणे. त्याने आपल्या अधिकाऱ्यांना सांगितले की राजाचा प्रतिनिधी या नात्याने प्रजेची काळजी घ्यावी. अशोकाने महिलांसह इतर विभिन्न वर्गात धम्म प्रचार करण्यासाठी "धम्ममहापात्र" नियुक्त केले. आपल्या राज्यात न्यायदानासाठी अशोकाने राजुकांची सुध्दा नियुक्त केली.

सम्राट अशोक हा कर्मकांडाच्या विरोधात होता. त्याने अनेक प्रकारच्या पशु-पक्षांच्या विरोधात केल्या जाणाऱ्या हिसेंवर, यज्ञ, अशा अंधश्रध्देवर निर्बंध आणले व त्याच्या राजधानीत तर प्राणी मारणे पूर्णतः निषिद्ध होते. ब्राह्मणांच्या प्राण्यांसोबत होणाऱ्या हिंसक प्रथेवर बंधने आणली. ब्राह्मणांनी केलेली जातीव्यवस्था, वर्णभेद, बौद्ध भिक्खुसंघाचा अनादर करण्यास मज्जाव घालण्यात आला. सम्राट अशोक हे ब्राह्मण द्वेष्टे नव्हते, समानतेवर त्यांचा अधिक जोर होता.

सम्राट अशोकाचा उपदेश होता की, लोकांना आपल्या आई-वडीलांच्या आज्ञेचे पालन करावे, बौद्ध भिक्खुसंघाचा आदर करावा तसेच दास व सेवकांच्या प्रति दया दाखवावी. हे उपदेश आपणास बौद्ध धम्म यात आढळतात.

सम्राट अशोकाने जगा व जगू द्या (live & let live) चा उपदेश दिला. त्याच्या या उपदेशांचे लक्ष्य कुटूंबसंस्था व सामाजिक बौद्ध धम्माची आणि प्रजेशी रक्षा करणे हे होते.

३.अशोकाचे शिलालेख

आपण अशोकाचा इतिहास त्याच्या शिलालेखांच्या आधारावर तयार केला आहे. अशोक प्रथम भारतीय राजा होता, ज्याने आपल्या शिलालेखांद्वारे आपल्या प्रजेशी प्रत्यक्ष संबंध केले होते. अशोकाच्या शिलालेखांना पाच श्रेणीत विभाजीत करण्यात आले आहे.

१. दिर्घ शिलालेख (major rock edicts)

२. लघु शिलालेख (minor rock edicts)

३. पृथक शिलालेख (Separate rock edicts)

४. दीर्घ स्तंभलेख (major pillar edicts)

५. लघु स्तंभलेख (minor pillar edicts)

अशोकाचे नाव सर्व शिलालेखात सापडते जे कर्नाटकात तीन ठिकाणी व मध्य प्रदेशात एका ठिकाणी 'देवनामपिय पियदसी' (Devanampiya piyadassi) म्हणजे देवांना प्रिय या उपाधीच्या रूपात आपणास अशोकाचे नाव आढळते.

अशोकाचे शिलालेख भारत, नेपाळ, पाकिस्तान व अफगाणिस्तान या देशात आढळतात. आतापर्यंत हे शिलालेख ४७ ठिकाणी १८२ वेगवेगळ्या प्रकारात सापडले आहेत.

या शिलालेखात राजाच्या आदेशांना सुचित करण्यात आले आहेत. प्राकृतमध्ये रचण्यात आलेले हे शिलालेख साम्राज्यातील बहुतांश भागात ब्रह्मी लिपीत लिहिण्यात आले आहेत.

परंतु पश्चिम-उत्तर भागात ते खारोस्थी व अरामिक लिपीत आहेत. अफगाणिस्तानात ते अरामिक व ग्रीक या दोन्ही भाषांत आहेत.

अशोकाचे हे शिलालेख प्राचीन महामार्गावर स्थापन करण्यात आलेले आहेत.

या शिलालेखांत आपणास अशोकाचा जीवनवृत्तांत, त्याची अंतर्गत व परराष्ट्र नीती, तसेच त्याच्या राज्य विस्तारा संबंधी माहिती मिळते.

जगातील सर्वात मोठे पुस्तक तुम्ही पाहिले आहे का?

म्यानमार देशातील मंडाले शहरातील 'कुथोडॉ पॅगोडा' मध्ये जगातील सर्वात मोठे पाली भाषेतील 'तीपिटक' पुस्तक (ग्रंथ) कोरलेले आहे.

या पॅगोडा मध्ये ७२९ मार्बल (संगमरवरी) फळ्यावर कोरलेली पाली मधील 'तीपिटक' कोरीव शिलालेख आहेत. पुस्तकातील पानावर जसे दोन्ही बाजूस लिहिल्या जाते तसेच या मार्बल (संगमरवरी) फळ्यावर दोन्ही बाजूस कोरलेले आहे.

२०१३ मध्ये हे जगातील सर्वात मोठे पुस्तक (शिलालेख) युनेस्को जागतिक वारसा स्थान म्हणून नोंद करण्यात आली.

जगातील सर्वात मोठे पुस्तक 'तीपिटक' आहे. (संस्कृत-त्रिपिटक; पाली-तीपिटक)

#Myanmar #म्यानमार











पहील्या शतकातील प्राचीन बौद्ध स्तूप आणि मठ, संघोल गाव, पंजाब राज्य, भारत.

#पंजाब #संघोल

















सम्राट अशोक यांची सैनिकी शक्ती..

अशोकांच्या काळात त्यांची जगातील सर्वात मोठी सैन्य शक्ती होती.

सम्राट अशोकांचे सैन्य सामर्थ्य फार अफाट होते. जर या सम्राट अशोकांनी आपला साम्राज्य विस्तार करण्याचे ठरविले असते तर, या पृथ्वीतलावरील एकामागून एक देश जिंकून आपल्या अफाट साम्राज्यास

जोडत गेले असते. सम्राट अशोकांचे गुप्तहेर खाते फार प्रभावी होते. त्यामध्ये महिला गुप्तहेर सुद्धा होत्या.

सम्राट अशोकांनी कलिंगा युद्धाच्या रक्तपातानंतर जरी शांतिप्रिय असा बौद्ध धम्म स्वीकारला तरी त्यांनी आपले सैनिकी सामर्थ्य अबाधित ठेवले होते. सम्राट अशोकांचे सैन्य खालिलप्रमाणे होते –

पायदळ (Mliltry Men): ६,००,००० (सहा लाख) घोडेस्वार सैनिक (Horse Calvary): ३०,००० (तीस हजार) हत्तीदळ (Elephant Calvary): ९,००० (नऊ हजार) युद्ध नौका (Sea Boat): २,००० (दोन हजार) रथ सैनिक - २०,००० (वीस हजार)

संपूर्ण आशिया खंडात दबदबा निर्माण व्हावा एव्हढे प्रचंड सैनिकी सामर्थ्य सम्राट अशोकांचे होते . मात्र कलिङ युद्धा नन्तर बरेच सैनिक मारल्या गेले.

सेनेच्या बंडखोरीपासून ते सेनेच्या नावासकट चिन्ह इतिहास जमा होईपर्यंत सगळ्यांना वाईट वाटलं सगळे भावनिक झाले पण मी एकटा का असेना मला मात्र आनंद झाला आहे. 10-10-2022.

ज्या माणसाने आमच्या उद्गारकर्त्याच्या मतांसाठी सतत अपमान केला त्याच्या पक्षाबद्दल आणि माणसासाठी का भावनिक व्हावं?

बाळ ठाकरे ची "डॉ बाबासाहेब आंबेडकर" आणि बौद्ध समाजा विषयी काही वक्तव्ये.

१) डॉ आंबेडकर हे निजामाचे हस्तक होते.

२) या संविधानने दिलेली लोकशाही मला कधीच मान्य नाही.

३)मराठ्यांनो मराठवाड्याचा महारवाडा करायचा आहे का?

४)आरक्षण व एट्रोसिटी कायदा रद्द झाला पाहिजे.

५) यांच्या घरात नाही पिठ व यांना कशाला हवं विद्यापीठ?

६) बौद्धांनी आमच्या नोकर्या पळवल्या आहेत.

७) नामांतर आंदोलनात आत्मदहन करणारा गौतम वाघमारे हा बेवडा होता.

८) घाटकोपर येथील रमाबाई आंबेडकर नगरात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना झाल्यावर आंदोलन करणाऱ्या ११ बौद्ध आंदोलकांना ठार करणार्या सीआरपीएफ फौजदार मनोहर कदम यांची पाठ थोपटून शाबासकी दिली.

९) वरळी दंगल.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले 'रिडल्स इन हिंदुझम' हा ग्रंथ शासनाने प्रकाशित करु नये या साठी शिवसेनेने मोठं आंदोलन केले होते, त्या नंतर राज्यात अतिशय वातावरण तंग झाले होते.

मुंबईत वरळीत बौद्ध विरुद्ध शिवसेना असा सामना रंगला तेव्हा शिवसेनेने आझाद मैदानावर मोर्चा काढला होता आणि " ज्याच्या अंगात हिंदू चे रक्त आहे त्याने या मोर्चात सहभागी व्हा"असं आवाहन केलं होतं त्या मोर्चात आनंद दिघे ने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री भिमाबाई आंबेडकर यांच्या बद्दल अत्यंत खालच्या भाषेत टिप्पणी केली होती.

तेव्हा बाळ ठाकरे ने आनंद दिघे ची पाठ थोपटली होती.

अजुन काही असतील तर तुम्ही सांगा.

संदीप पंडित 10-10-2022

🌻 धम्म प्रभात 🌻

बुद्ध की बोधि सुखकर है।

नासमझ और नादान लोग बुद्ध पर दु:खवादी होने का मिथ्या आरोप लगाते है। आरोप है कि बुद्ध दु:ख की बात करते है। बुद्ध सुख की बात नहीं करते है। बुद्ध कहते है-दु:ख है, दु:ख का कारण है, बिना कारण दु:ख उत्पन्न होता नहीं है। दु:ख का कारण है तो दु:ख निवारण का उपाय भी है। दु:ख निरोध का उपाय है तो उसका रास्ता भी होता है। बुद्ध की यह सत्य वाणी को बिना समझे नादान लोग बुद्ध पर दु:खवादी या निराशावादी होने का लांछन लगाते है।

एक वैज्ञानिक की भांति बुद्ध ने "दु:ख" रोग को जाना, दु:ख होने के कारण को जाना, जिन कारणों से दु:ख उत्पन्न होता है उसे दूर करने के उपाय भी जाने और जानने के बाद दवाई के रूप में मार्ग दिखाया।

बुद्ध की यह अनोखी खोज को आज अरिय सत्य के नाम से जगत जानते है।

"अरिय सच्चानि" या "अरिय अट्ठंगिको मग्गो" आदि में प्रयोजित शब्द 'अरिय' का अर्थ - 'आर्य' ग़लत किया गया है।

अरिय शब्द का अर्थ है -

अर = चक्र की तीली

अरि = चक्र

अरिय = चक्र से संबंधित

अरिय धम्म = चक्र से संबंधित धर्म

अरिय मग्ग = चक्र से संबंधित मार्ग

अरिय सच्च = चक्र से संबंधित सत्य

धम्म चक्क पवत्तन का चक्क (चक्र) इसी अरिय मग्ग और अरिय सच्च से जुड़ा है।

"आर्य" शब्द "अरिय" शब्द का पर्याय नहीं है।

इतिहासकार और भाषावैज्ञानिकों ने अरिय मग्ग और अरिय सच्च का जो भाष्य आर्य मार्ग और आर्य सत्य के रूप में किया है, वह गलत है।

पालि में आर्य के लिए अलग शब्द है, वह है-अय्य।

आर्य को पालि में "अय्य" कहा जाता है, "अरिय" नहीं।

बुद्ध ने कहा- दु:ख है।

दु:ख का कारण है।

दु:ख का निरोध है।

दु:ख निरोध का मार्ग भी है।

दु:ख निरोध का मार्ग है- "अरिय अष्टांगिक" मार्ग|

दुःख दूर करणे का प्रयोजन सुख के लिये है, यह बात आज नजरअंदाज करके धम्म द्वेषी लोग बुद्ध पर मिथ्या आरोप लागते है| बुद्धने कहा; "आरोग्य परमा लाभा, संतुष्ठी परम धन|| विस्सासपरमा याती, निब्बानं परम सुखं||" धम्मपाद

अर्थः निरोग होणा परम लाभ है, संतोष परम धन है, विश्वास सबसे बडा बंधू है| निर्वान सबसे बडा सुख है|

बुद्धने दुःख मुक्ती के लिये उपदेश दिया है, इसलिये बुद्ध सुखवादी है, ना की दुःखवादी|

"सुखो बुद्धानं उप्पादो|" सुखदायक है बुद्ध का जन्म|

संपूर्ण भारत बौद्धमय व्हावा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न आणि आपली वाटचाल

उपस्थित बंधु आणि भगिनीनों किती जणांना वाटते की डॉ. बाबासाहेब आंबेडकारांचे सम्पूर्ण भारत बौद्धमय व्हावा...

१४ ओक्टोंबर, १९५६ रोजी भारतातील समस्त अस्पृश्य आणि दलित समाजासाठी एक सोनियाची सकाळ उगवली होती. त्यांचे मुक्तिदाते, भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांना समानतेचे हक्क देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतातुन लुप्त झालेल्या बौद्ध धम्माला नवी संजीवनी देणार होते व लाखो अनुयायासह बौद्ध धम्म स्वीकारणार होते. ह्या ऐतिहासिक क्षणाचे प्रत्यक्षदर्शी ह्याच देही ह्याच डोळ्यांनी पाहण्याचा अनुभव घेत लाखो लोक नवीन धम्म स्वीकारण्यासाठी जुन्या चलिरिती सोडून देणार होते. ही एक क्रांतीच होती। अखिल मानवजातीच्या इतिहासात तलवारीच्या जोरावर रक्त सांडून धर्मांतरे होत होती, पण हेच असे एक धर्मांतर होते की रक्त न सांडता लाखो लोक बौद्ध धम्मात प्रवेश करून स्वतःच्या जीवनाला एक कलाटनी देणार होते आणि त्यांनी दिलीसुद्धा। त्यांनी बाबासाहेबांच्या बरोबर बौद्ध धम्म स्वीकारुन आपल्या मुक्तिदात्याच्या संघर्षमयी जीवनाला नवीन आयाम दिला आणि ते बौद्ध झाले। सदर कार्यक्रमात त्यांच्या मुक्तिदात्याने एक मोठे स्वप्न पहिले होते व ते प्रत्यक्षात आणण्यासाठी झपाटुन काम करण्याची प्रतिज्ञा केली होती। ते स्वप्न म्हणजे सम्पूर्ण भारत बौद्धमय करण्याचे व बौद्ध धम्माला पुनरपि प्रतिष्ठा मिळवून देण्याचे. पण त्यांच्या अकाली महापरिणीनिर्वानामूळे ते स्वप्न प्रत्यक्षात उतरले नाही आणि नव धर्मांतरीतांवर एक मोठी जबाबदारी आली। प्रत्येकजण आपल्या परीने बाबासाहेबांचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याचे काम करत आहे. विविध लोकांनी बौद्ध धम्मवाढीसाठी कष्ट करत, घरादारावर पाणी सोडून धम्माला वाहून घेतले आहे. विविध संस्थांच्या माध्यमातून, शिबिरे भरवून, जनजागृती करून ते आपली जबाबदारी निभावत आहेत.

2. आजपासून 65 वर्षापूर्वी विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपुरमध्ये बुद्ध धम्माची दिक्षा घेतली. त्याचवेळी त्यांनी भारत बौद्धमय करिन अशी महत्वपूर्ण घोषणा केली होती. समानता, स्वतंत्रता, बंधुभाव

आणि न्यायावर आधारित समाज निर्माण करण्याचे त्यांनी उद्दिष्ट्य ठेवले होते. 1935 मधे त्यांनी 'मी हिंदू धर्मात जन्मलो असलो तरी हिंदू धर्मात मरणार नाही' अशी घोषणा केली होती. त्याची अंमलबजावणी त्यांनी केली.

3. ज्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय संविधान लिहिण्याची संधी मिळाली तेव्हा त्यांनी बुद्धांच्या चतुसूत्रींना भारतीय संविधानाचे लक्ष बनविले होते. 1956 ला ज्यावेळी धम्म परिवर्तन केले तेव्हा समानता, स्वातंत्र्यता, बंधुभाव आणि न्यायावर आधारित समाज निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. भारत बौद्धमय केव्हा होईल तर देशात चतुसूत्रीचा अवलंब होईल तेव्हा. डॉ. आंबेडकरांच्या विचारांमागे एक लक्ष व उद्देश होता. लक्ष निर्धारित करण्याअगोदर ते निती, रणनीती, कार्यनीती बनवित होते. ते कार्य पूर्ण करण्यासाठी अनुकूल विचारधारा बनवायचे. जे लक्ष पूर्ण करायचे आहे त्याविषयी सखोल विचार शब्दबद्ध करायचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला बौद्धमय करिन अशी प्रतिज्ञा केली तेव्हा त्यांच्यासमोर काहीतरी भव्यदिव्य करित भारत देशाला न्याय, समता, बंधुतेने जोडायचे होते.

4. तथागत बुद्धांचे आंदोलन एका रणनितिवर आधारित होते. त्यावेळी बुद्ध विषमतावादी व्यवस्थेविरोधात लढले. बुद्धांच्या काळखंडात लोक पशुंची हिंसा करायचे, परंतु शेतकरी लोकांना जनावरांची जास्त गरज होती. त्याच जनावरांना लोक मारत मारत होते व खात होते. बुद्धांनी त्याच समस्येला आंदोलनाचा मुद्दा बनविले. पशुहींसेमुळे जे पीडित होते ते सारे बुद्धांच्या समर्थनात उभे राहिले. बुद्ध वर्णव्यवस्था, विषमतावादी व्यवस्थेविरोधात आंदोलन चालवत होते. तो काही भक्तीचा मामला नव्हता. बुद्धांनी पशुहींसेचा मुद्दा बनविला, त्यामागे रणनीती होती. परंतु जो धार्मिक आहे तो बुद्ध एक धार्मिक व्यक्ती होते असा विचार करतो. असा विचार करणाऱ्या लोकांना बुद्ध व्यवस्थेच्या विरोधात लढत होते याचा त्यांना विसर पडतो.

5. बुद्धांचे विचार समजून न घेता त्यांना धार्मिकतेत अडकविण्यात आले. बुद्ध विहारात जाऊन अगरबत्ती, मेणबत्ती लावून, बुद्ध वंदना घेतलि की झाले आपले काम अशा आविर्भावात लोक वागत असतात. जर वर्तमान परिस्थितीत भारताला बौद्धमय करायचे असेल तर आपल्याला एक धोरण बनवावे लागेल. हे काम करण्यासाठी केवळ अगरबत्ती, मेणबत्ती लावून आणि बुद्ध वंदना घेऊन भारत बौद्धमय होने असंभव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शासक जातीच्या मुद्यांना आपल्या आंदोलनाचे मुद्दे बनविले. शासकवर्गाने निर्माण केलेल्या समस्या त्यांनी राष्ट्रीय अजेंड्यात सहभागी करून घेतल्या. 1956 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्म परिवर्तन केल्यानंतर, धम्म परिवर्तन करण्याअगोदर जे काम केले त्याची प्रासंगिकता आता समाप्त झाली आहे. ते काम करण्याची आता आवश्यकता नाही असे जे विचार करतात ते सर्व भक्त लोक आहेत.

6. धम्म्परिवर्तन करण्यामागे बाबासाहेबांचे एक उद्दिष्ठ होते. भारतातील बहुजनांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजनीतिक उद्धाराची जबाबदारी बौद्ध धम्मावर टाकली जावी, अशी त्यांची अपेक्षा होती. भारत बौद्धमय करण्यासाठी बाबासाहेबांनी त्रिसूत्री कार्यक्रम आखला होता.

अ-पहिले सूत्र बायबलप्रमाणे बौद्ध धम्माचा एक प्रमानभूत ग्रंथ तयार करणे. ब-दुसरि बाब भिक्खू संघाचे संघटन. क-तिसरि बाब आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्व बौद्ध सेवा संघ गठीत करणे.

"बुद्धा अँड हिज धम्मा" या ग्रंथाच्या माध्यमातून त्यांनी बुद्धिष्ट बायबल दिले. हा ग्रंथ उपासक म्हणून वाचलात तर काहीच लक्षात येणार नाही. हाच ग्रंथ भारताला बौद्धमय करण्याच्या रणनितीचा एक हिस्सा होता. भिक्खू संघाचे नितिनियम व कार्यप्रणालीत बदल करणे हे एक त्यांचे लक्ष होते. 20 नोव्हेंबर 1956 रोजी काठमांडू (नेपाळ) येथील विश्व बौद्ध संमेलनात सहभागी होऊन बौद्धराष्ट्रांना मार्गदर्शन करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणतात, बौद्धराष्ट्रात राहणाऱ्या लोकांना युवावर्गाला त्यांनी सांगितले की, बुद्धांच्या वास्तववादी दर्शनावर विशेष रूपाने जोर द्यायला हवा. बौद्ध धम्मासमोर जर का संकट निर्माण झाले, तर त्यासाठी बौद्ध राष्ट्रातील भिक्खूंना जबाबदार मानले जाईल.

7. बौद्ध धम्मप्रसाराची आज काय अवस्था आहे. आजच्या भिक्खूंनी धम्माचा निरंतर प्रचार व प्रसार केला पाहिजे. थकल्यानंतर विहारात यायला हवे. आज सर्व बाजूंनी बौद्धधम्मावर आक्रमन करण्यात आले आहे. एवढेच कशाला नकली भिक्खू संघ बनवून लोकांना फसविण्याचे काम सुरु आहे. त्याला लोक बळी पडत आहेत. म्हणजेच शत्रूचे काम करण्यासाठी आपण तत्पर आहोत. कसाकाय भारत बौद्धमय होईल? भारत बौद्धमय करणे, म्हणजे स्वातंत्रता, समानता, बंधुभाव व न्यायावर आधारित राष्ट्र निर्माण करणे होय. जग परिवर्तनशील आहे, हा बुद्धांचा नियम आहे. जगात पारिवर्तन करायचे असेल, तर आधी विचारात परिवर्तन व्हायला हवे. विचारात परिवर्तन झाले आणि सतत प्रचार व प्रसार केला तर भारत बौद्धमय होऊ शकतो आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अधुरे स्वप्न पूर्ण करू शकतो.

8. जर बौद्धांना बाबासाहेबांची संपूर्ण भारत बौद्धमय करीन ही प्रतिज्ञा पूर्ण करायची असेल तर जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रात उदा. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, समाजकार्य, राजकारण, खेळ, कला क्षेत्रात बौद्धांना स्वतःचा ठसा उमटावा लागणार आहे. परधर्मीय, परजातीय माणसांशी मानवतेच्या नात्याने जोडून घ्यावे लागणार आहे. बौद्धांची लढाई अधिक कठीण आहे. कारण, हाताशी चमत्काराची काठी नाही. त्यामुळे सेवाकार्य, व्यापक सामाजिक आणि राजकीय दृष्टी हेच इतरांशी जोडून घेण्याचे मार्ग आहेत. भगवान बुद्ध आपले रोल मॉडेल असले तरी धम्मातले कर्मकांड जसे पाच फळ, पांढरा धागा बांधणे या गोष्टी प्रतिकात्मक असल्या तरी त्या कर्मकांडात मोडतात. बुद्धाला हवा असलेला धम्म बुद्ध मूर्तीत नाही तर धम्म आचरणात आहे. बुद्धाने कधीही अडचणीत असलेल्या माणसाला आधी पंचशील, त्रिसरण ग्रहण करा असा आग्रह केलेला नाही. महापरित्रान पाठ म्हणा असा सल्ला दिलेला नाही. बुद्धाने लोकांना शहाणे केले. ते शहाणपण ज्या गाथांमध्ये संकलित करण्यात आलं त्याच गाथांच कर्मकांड झालं. बुद्धांचा धम्म अतिशय साधा आणि सोपा आहे. तुम्हाला दुसऱ्यांकडून ज्या वर्तनाची अपेक्षा असते, तेच वर्तन तुम्ही इतरांशी करा. चुकीच्या समाजिक रूढी-परंपरांबाबत स्वतः शहाणं व्हा आणि लोकांना पण शहाणं करा. बुद्ध समजून घेणं खूपच सोपं आहे. बौद्ध माणसाला बौद्ध असल्याचा गर्व कधीच नसतो पण, बौद्ध असणं म्हणजे नेमकं काय? याच भान मात्र अवश्य असतं. त्यांच्या वर्तन आणि वाणीतून ते भान प्रकट होत असतं. तुम्ही जेवढे कट्टर बौद्ध

होता, तेवढे बुद्धांच्या मार्गापासून दूर जाता. बुद्ध महत्वाचे नाही तर बुद्धांचा मार्ग महत्वाचा आहे, हे ज्ञान असणं म्हणजे खरे बौद्ध होय. हे ज्ञान असलेला माणूस कर्मकांडात अडकून स्वतःच कट्टरत्व सिद्ध करण्याऐवजी बुद्धांच्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न करतो. जोपर्यंत बुद्ध मूर्तिऐवजी बुद्धप्रतिके प्रचलित होती, तेव्हा धम्म उत्कर्षाला होता. जेव्हा बुद्ध मूर्ती निर्माण झाली, बुद्ध प्रतिकांना मानवी चेहरा प्रदान करण्यात आला, तेव्हापासून लोक बुद्धांच्या शिकवणीपासून दूर गेलेत. बुद्धाला पूजणारे लोक इतर मुर्त्यांना पुजू लागले.

9. विविध लोक विविध माध्यमातून बाबासाहेबांचे स्वप्न सकार करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. विविध संस्था उभारीत आहेत, शिबिरे भरवत असतात, जुन्या चालिरिती सोडण्यासाठी जनजागृती करीत असतात. पाली भाषा शिकण्यासाठी वर्ग भरत असतात. विपश्यनेच्या माध्यमातून खूप मोठ्या जनसंख्येला बौद्ध तत्वज्ञान समजावून सांगत आहेत. शिक्षणसंस्था उभारून बुद्धांची प्रज्ञा, शील, समता, करुणा मुलांवर बिंबवीत आहेत की जेणेकरून ही मुले मुली पुढील जीवनात एक चांगला नागरिक आणि उपासक बनतील. पण तरीही आपले प्रयत्न अपुरे पडतात. त्यासाठी आपल्याला धोरणीपनाणे काम करावे लागेल. पुढील काही दशकांचा कार्यक्रम बनवावा लागेल. तो कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संपूर्ण वाहून घेतलेल्या निष्ठावंतांची फौज उभारावी लागेल.

10. लोक आपल्या परीने मेहनत करीत आहेत. आज मोठे काम उभे राहिले आहे, संपूर्ण भारत विविध राज्यांत बाबासाहेबांच्या विचारांना चालना देणारी मंडळी तयार झाली आहेत आणि होत आहेत. राजकीय सत्तेवर येऊन उत्तर प्रदेशात बौद्ध बांधवांची एक पिढी तयार झाली व त्यातून पुढील पिढ्या घडत आहेत. पण धम्मांतराच्या सहासष्ट वर्षानंतरही खूपकाही बाकी आहे. एक शतांश स्वप्नसुद्धा सकार झाले नाही. ते स्वप्न सकार करण्यासाठी आपल्याला धोरणीपणाने रणनीती आखून पुढील काही दशके झोकून द्यावे लागेल, तेव्हा धम्मांतराच्या शतकमहोत्सवात आपण मानाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार झाल्याचे पाहू शकतो. कदाचित तेव्हा आपण असू किंवा नसू पण आपण लावलेले रोपटे नक्कीच वटवृक्ष बनू शकते.

11. आपल्याला धोरण रणनीती आखतांना स्वतःच्या कार्यक्षमतेचे व्यवस्थापन शास्त्रातील swot analisys करून घ्यावे लागेल. swot analisys मधे आपल्या strength, weaknesses, opportunities and threats म्हणजेच आपली बळस्थाने, कमजोरी, संधी आणि धोके जोखले जातात व त्यातून चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करत बाजारात कंपनीला नवी दिशा देत एक पथप्रदर्शक बनवत कंपनी मार्केट लीडर बनते. जर आपण आपले, आपल्या चळवळीचे, समाजाचे swot analisys केले तर नक्कीच आपण समाज म्हणून भारत देशात अग्रेसर बनू शकतो. माझ्या अल्पज्ञानातून मी आपले swot analisys करित आहे.

12. Strength बळस्थाने:- आता आपण आपली बळस्थाने पाहू या. तथागत गौतम बुद्धांनी बौद्ध धम्म दिला व त्याच्या प्रचारासाठी, त्याची तत्वे जनमानस रुजवण्यासाठी पंचेचाळीस वर्षे पायपीट करून, भेटेल त्याला धम्म समजावून सांगितला. त्यांच्या वाणीने, आचरणाने व मध्यम मार्गाने तत्कालीन मोठे जनमाणसं बौद्ध धम्माचे

आचरण करू लागले. बौद्ध धम्माचे आचरण करणाऱ्यात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि अतिशूद्र होते. त्यातल्या कितीतरी जणांनी संसारत्याग करून मानवी मोहापासून स्वतःची सुटका करून घेतली, तर काहींनी उपासक बनून स्वतः व स्वतःचे कुटुंब पंचशिलानुसार जीवन जगत समाजात आदर्श निर्माण केले व त्यांच्या आदर्शपूर्ण वागण्याने दुसऱ्या मोठ्या समाजाला बौद्ध धम्माकडे आकृष्ठ केले व भरतभर बौद्ध धम्म प्रसार पावला.

भगवान बुद्धांच्या वेळेपासून बौद्ध धम्माला राजाश्रय, धनाश्रय, आणि लोकाश्रय मिळत गेला. खूप मोठा समुदाय बौद्धधम्माच्या विचारसरणीचे अनुकरन करून मोठ्या प्रमाणात दान पारमिता करू लागला. बौद्ध संघाला मोठमोठ्या जमिनी दान करून विहारे बांधून देऊ लागला. विहारात रहिवास करणाऱ्या भंतेंची काळजी घेऊ लागला, उपासकांना विविध सोयी देऊ लागला. इस्विसनपूर्व पाचव्या शतकापासून बौद्ध धम्माला राजाश्रय आणि लोकाश्रय इस्विसणाच्या सातव्या आठव्या शतकापर्यंत मिळत गेला. बौद्धधम्माच्या विचारसरणीने शेतकरी, व्यापारी, मजुरांचे राहणीमान उंचावत जाऊन भारतात शांतता नांदत होती. परकीय आक्रमकपण बौद्ध मार्ग अवलंबित होते. शांततेच्या मार्गाने बौद्ध धम्म जगातील विविध देशांमध्ये प्रसार पावून तिथला प्रमुख धम्म होऊन लोकजीवन आणि राजकीय सत्तेला शांतता आणि सुबत्तेची सुख देत होता. वरील काळखंडात भारताचे राष्ट्रीय उत्पन्न वार्षिक पंचवीस टक्के झाले होते व भारताला सोन्याचा धुर निघणारा देश म्हणून ओळख मिळाली होती. सादर काळखंडात जवळजवळ दोन हजार गुंफा आणि हजारो विहारे निर्माण होत लेखनकला, विविध शास्त्रे, आरोग्य क्षेत्र, कला, चित्रकला, स्थापत्य शास्त्रात नवनवीन पायंडे पडले होते व आज त्यांच्या पाऊलखुना आपल्याला संपूर्ण भारतात आढळून येत आहेत.

भगवान गौतम बुद्धांच्या नंतर विविध राज्यकर्त्यांनी, भंतेनी, आणि उपासकांनी बौद्ध धम्माच्या प्रसारासाठी कष्ट केले आणि भारताबाहेर प्रसार करत बुद्ध धम्माचा गौरवशाली वारसा निर्माण केला. ह्यात सम्राट अशोक, कनिष्क, हर्षवर्धन, ह्योणत्संग, फाहियान आणि ज्ञात/अज्ञात होते.

विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशात असमानतेविरुद्ध लढा दिला आणि अस्पृश्यतेच्या शापात सडत पडलेल्या दिनदुबळ्या जनतेला भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून समानतेच्या तत्वाला प्रतिष्ठा मिळवून दिली आणि त्यांचे जीवन गुलामीच्या जंजाळातून मुक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर असलेल्या बुद्धतत्वज्ञाच्या प्रभावामुळे भारतीय संविधानात विविध तरतूदी बुद्धांना अभिप्रेत असलेल्या समता, बंधुता आणि न्यायप्रिय प्रशासनव्यवस्थेला अनुसरून करण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धम्मावर विविध व्याख्याने दिली, ग्रंथ लिहिले, लेख लिहिले हे सर्व बळस्थाने आपल्याला मिळालेली आहेत आणि त्या माध्यमातून आपल्याला बाबासाहेबांचे स्वप्न साकार करायचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1956 साली आपल्याला 22 प्रतिज्ञा दिल्या की जेणेकरून आपल्या मंगुटीवर बसलेले जुन्या रूढी परंपरा आणि देवदेवतांचे पारंपारिक ओझे झटकून नवीन धम्माच्या विचारसरणीने आचरण करित आपले जीवन इतरांना अनुकरणीय होईल व त्यांचे भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न साकार होईल. सदर बळस्थाने बौद्धधम्माला व त्या अनुषंगाने आपल्याला एक समृद्ध

गौरवशाली वारसा बौद्ध धम्माच्या रूपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला आहे व तो वारसा जपत आपल्याला अजून पुढे न्यायचा आहे.

13. Weaknesses कमजोरी किंवा कमतरता:- जेव्हा बौद्ध धम्म बहरत होता, प्रसार पावत होता, मान्यता पावत होता, तेव्हा त्यात भगवान गौतम बुद्धांनी सांगितलेल्या तत्वज्ञात बदल होत होता. हिनयान महायान पंथ निर्माण झाले. बुद्धांच्या वेळी प्रतिमा किंवा मूर्तीपूजा नव्हती, ती होऊ लागली. बुद्धांच्या विविध आकाराच्या मुर्त्या शिल्पे निर्माण झाली. तांत्रिक पूजा होऊ लागली. खरा बुद्ध धम्म व नंतरचा बुद्ध धम्म यात अंतर वाढले होते आणि शिथिलतापण आली होती. एखादी गोष्ट पिढ्यानपिढ्या सतत केल्यानंतर जो आळस येतो, तसा आळस साचू लागला. पंचशीलाचे पालन कमी प्रमाणात होऊ लागले होते आणि याचा फायदा ज्यांचे बुद्ध धम्मामुळे हितसंबंध दुखावले गेले होते त्यांनी नेमका उचलला, त्यांनी स्वतःत बदल केले, मांसाहार वर्ज्य करून, स्वतःवर पंचशीलानुसार बंधने घालून घेतली आणि समाजात स्वतःची प्रतिष्ठापणा करत हिंसक रीतीने बुद्ध धम्म भारत देशातून नामशेष नष्ट करून टाकला. गौरवशाली शिल्प मुर्त्यांना इतर देव म्हणून पूजन करणे चालू झाले. ज्ञानदानाचे कार्य फक्त काही वर्णांचिच जहागीर झाली, त्यामुळे बुद्ध धम्माच्या प्रसाराने शिक्षित झालेला बहुजन समाज काळाच्या गर्तेत लोटला गेला आणि स्वतःची इच्छा शक्ती गमावून. महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात त्याप्रमाणे *"विद्येविना मती गेली, मती विना गती गेली, गती विना वित्त होते आणि एवढे सारे अनर्थ अविद्येने केले."* भारताची मोठी लोकसंख्या अशिक्षित बनून राहिली. त्यामुळे नवनवीन करण्याची उर्मी निघून गेली, बौद्ध विद्यापीठातील ज्ञान, शास्त्रे, ग्रंथ संपदा इराकमध्ये गेली. तिथे भाषांतर होत संशोधन होत पुढे युरोपीय देशांत गेले. युरोपातील रेंसा चळवळीवर त्याचा प्रभाव पडून मागासलेल्या युरोपात नव्याने तर्कशुद्ध विचारपद्धतीने ज्ञानदानाचे कार्य चालू झाले आणि नवनवीन शोध लागू लागले व आज युरोपीय देश सर्वच बाबतीत आघाडी बाळगून जगावर राज्य करित आहेत आणि भारताची एक मोठी शोकांतिका झाली. एकाच वर्णाला संरक्षणाचा मक्ता दिल्याने अशिक्षितपणामुळे युद्धासाठी लागणाऱ्या शस्त्रांस्त्रांमध्ये नावीन्यपूर्ण प्रयोग झाले नाहीत आणि जेव्हा परकीय आक्रमणे होऊ लागली तेव्हा जुन्या शस्त्रांचा निभाव लागला नाही आणि भारत आक्रमकांसाठी सोन्याची कोंबडी ठरत, कधीही उठा आक्रमणे करा, संपत्ती लुटून न्या, परत या लुटा आणि परत जा असा देश झाला. जेव्हा येण्याजाण्यात वेळ दवडण्यापेक्षा इथेच राहून राज्य करण्यात खरी सत्ता आहे, याची जाणीव झाली तेव्हा भारत गुलामीत गेला आणि तथाकथित विरजवान आपसूक आक्रमकांशी सोयरीकी जोडत आपापल्या जहागिरी सांभाळून ठेवू लागले आणि अजूनही त्यांचे तेच चालू आहे.

आज सहासष्ट वर्षानंतरही आपण जुन्या धर्मपरंपरेचे, रूढी, रितिरिवाजाचे ओझे उतरवू शकलो नाही आणि दिवसेंदिवस काही प्रमाणात उतरलेले ओझे परत मानगुटी मस्तकात गाठ मारून ठेवत परत त्याच धार्मिक गुलामगिरीकडे चाललो आहोत. आपण काय आदर्श आपल्या व इतर समाजाला देत आहोत याचे आपण स्वतः सखोलपणे आत्मनिरीक्षण करावे.

सध्या समाज माध्यमांचा जमाना आहे व त्यावर आपले लोक विविध प्रकारे व्यक्त होत आहेत, नक्कीच चांगली गोष्ट आहे पण व्यक्त होतांना काहीजणांना तारतम्य बाळगायचे लक्ष राहत नाही. रोज सकाळी उठल्यावर काहीजण सहासष्ट वर्षांपूर्वी सोडलेल्या देवदेवतांना लाखोली वाहून दिवसाचा प्रारंभ करतात, त्यांना समजावून सांगितले की बौद्ध धम्म तत्वज्ञानातील विचारांच्या पोस्टणे दिवसाचा आरंभ करा, पण नाही आम्ही सुधारणार नाहीत ही प्रतिज्ञा काटेकोरपणे पाळणे त्यांचे आद्यकर्तव्य झाले आहे. तसेच जेव्हा गतधर्मांचे सणवार असतात तेव्हा तर चेव आल्यासारखे त्या धर्मातील देवदेवतांना टिकात्मक लेखणाने अमरत्व बहाल करून टाकतात, कारण निसर्गाचा नियम आहे प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया असते व ह्यांच्या टिकेने जो इतर समाज आपल्याशी संवाद साधत असतो तो आपसूकच लांब होत जातो. आता ह्या जुन्या धर्मावर टिका करणाऱ्यांना दोन शब्द भगवान बुद्ध किंवा बाबासाहेबांच्या विचारांवर लिहायला सांगा, तेव्हा त्यांना लकवा मारतो. काही महाभाग तर सांगतात की आमच्या घराण्यात ही परंपरा पिढ्यांपासून चालू आहे, आमच्या स्त्रिया ऐकत नाहीत.

सध्या एक नवाच ट्रेंड सुरु झाला आहे. जेव्हा एखादा सण असतो तेव्हा आपले लोक तो सण बुद्ध परंपरेणे आपलाच आहे व जनमाणसांत ऋजऊ पाहतात की चला आपण तो सण साजरा करूया आणि जास्त चिकित्सा न होता अजून काही वर्षांनी आपण परत जुन्याच गर्तेत अडकणार याचे व बाबासाहेबांना पराभूत करणार आहोत.

काहीजण, काही जातींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वीकारत बौद्ध धम्म स्वीकारला नाही, म्हणून त्यांच्यावर दात धरून असतात, त्यांचा सतत अपमान करित असतात. भलेही त्या जातीने बौद्ध धम्म स्वीकारला नसेल, पण त्यांचा आपला DNA एकच आहे, हे लक्षात घ्या. आज त्यांना आपल्यातील बदल दिसत नसेल, पण जेव्हा आपले वर्तन त्यांना अनुकरणीय वाटेल, तेव्हा ते नक्कीच बुद्धाच्या मार्गाने येतील.

आता तुम्ही माला सांगा तुम्ही किती प्रमाणात पंचशील पाळण्याचा आग्रह धरता? तुमच्या चांगल्या बोलण्यात किती बौद्ध धम्म असतो की तुम्ही एखादे उदाहरण देतांना बुद्ध धम्मातील, त्रिपीटकातील, गौरवशाली इतिहासातून उदाहरणे देत जगत जगत असता का, उदघृत करत असता का? जर तुम्ही बौद्ध धम्माचा अभ्यास करून त्यांचे पालन करणे, चालू केले तर तुमच्या वर्तनातून बौद्ध धम्म डोकावू लागेल आणि लोकांना तुम्ही अनुकरणीय वाटून ते तुमच्या मार्गाने येतील.

वरील सर्व आणि इतर कमतरता किंवा कमकुवतपणा आपल्याला परत खोल खाईत लोटणार आहे व तसे होऊ द्यायचे नसेल तर आपल्याला खूप चांगल्या पद्धतीने आत्मपरीक्षण करत वागावे लागेल.

14. Opportunities संधी:- आत्ताच विवेचन केलेल्या बळस्थाने आणि कमकुवतपनातून आपल्याला सखोल चिकित्सा करत संधी शोधत पुढे जायचे आहे आणि बौद्ध धम्माला परत भारतभूमीत रुजवत पुन्हा गौरव प्राप्त करून द्यायचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला बौद्ध धम्माची दिक्षा देऊन आपल्याला आपले परिवर्तन करायची मोठी संधी दिली आणि आपण त्या संधिचा फायदा घेऊन आपल्यात परिवर्तन आणले पाहिजे.

"शिका, संघटित व्हा आणि संघर्ष असा" हा संदेश आत्मसात करून आपले सुशिक्षितपणाचे प्रमाण वाढवले, आपले लोक प्रत्येक क्षेत्रात चमकत आहेत, नौकऱ्यात प्रतिनिधित्व वाढले आहे, धंदे व्यापार करित आहेत, संघटित होऊन संघर्ष करत इतर समाजाला दाखल घ्यायला भाग पाडत आहेत. आता आपल्याला आपली स्ट्रेटीजी बदलावी लागेल. जर बौद्ध धम्म इतरांनी स्वीकारावा वाटत असेल तर धोरणीपणाने आपल्यात परिवर्तन करावे लागेल, त्यासाठी काही दशकांचा वेळ द्यावा लागेल. आपल्यातील बदल हळुहळू झिरपत जाऊन आपले चांगले वर्तन इतर जाती धर्मीयांना आपल्याकडे आकृष्ट करेल. आपल्याला आपले परिवर्तन बौद्ध धम्म तत्वज्ञानातील विचारांनी करावे लागेल. *बुद्ध धम्माचे पंचशील, प्रज्ञा, शील आणि करुणा, दान पारमिता आपल्या स्वभावात बदल घडवून आणतिल व त्यांचे कसोषीने पालन केले की आपले सद्वर्तन आदर्श घेण्यासारखे ठरेलं.* ब्राम्हण, जैन त्यांचे तत्वज्ञान पाळण्यासाठी नेहमी आग्रही असतात, माग त्या खाण्यापिण्याच्या सवयी असोत की आणखी काही, त्यांचे मन राखण्यासाठी इतर समाज सतत प्रयत्नशील असतो. तसे आपले पंचशील पाळण्यासाठी आपण आग्रही भूमिका घेत पालन केले तर नक्कीच इतर लोक आपल्या पंचशीलानुसार आपली काळजी घेतील.

उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि विविध राज्यांत पीडित परिवर्तनाच्या वाटेवर आहेत. जरा कुठे खळखट्याक झाले तर पूर्ण भारतातील पीडित वर्ग विचलित होतो आणि व्यवस्थेला जाब विचारत असतो. हा बदल त्यांच्यात का घडून आला तर तो फक्त बाबासाहेबांमुळे, त्यांनी बाबासाहेब वाचले आणि त्यांना वाचा फुटली. बाबासाहेबांच्या विविध पंडित्याच्या कौशल्याला त्यांनी अंगी बानवले व एक एका विषयावर जाणजागृती करित आहेत, पी. एच. डी. करित आहेत आणि खूप मोठे परिवर्तन पीडित समाजात आणीत आहेत. एक उत्तर प्रदेशाचा ग्रुप आहे तो डॉ. आंबेडकरांच्या ANNIHILATION OF CASTE जातींचे निर्मूलन हा विषय घेऊन पीडित ओबीसी जातीतील आंतरजातीय विवाहासाठी कार्यरत आहे आणि आंतरजातीय विवाह घडवून आणत आहेत. महाराष्ट्रात असा ग्रुप आहे काय? तर काय सर्व भारतातील पीडित DNA जोडला गेला आहे आणि आपण आपल्या बौद्ध धम्माच्या सदवर्तणुकीने त्यांना आपले करायचे आहे आणि त्यांचे मार्गदाता व्हायचे आहे. विपश्यनाचार्य गोयंका गुरुजींमुळे खूप मोठा समाज बुद्धांशी जोडला गेला आणि जरी तो बौद्ध म्हणून दीक्षित झाला नसला तरी बुद्धप्रणालीने जीवनमार्ग क्रमीत करित आहे. फक्त बुद्धधम्माची लोकसंख्या वाढ नको, तर बुद्धप्रणालीने सदाचारणाचे जीवन जगत स्वतःचे तसेच समाजाचे जीवन सदाचरणयुक्त करणे, हे आपले कर्तव्य ठरते.

15. Threats धोके:- कोणतेही काम करतांना अडथळे/धोके उद्भवत असतात आणि त्यावर मात करत पुढे जायचे असते, तेव्हा त्या यशाला एक अधिष्ठान मिळते व समाधान मिळते. आता आपल्याला बाबासाहेबांच्या स्वप्नातील बौद्ध धम्माचे स्वप्न साकार करण्यातिल धोके बघावे लागतील. सध्या भारतात पुरातनवादी, सरंजामी शकी वाढत आहेत आणि त्या प्रत्येक सुधारणावादी, परिवर्तनवादी, सामाजिक समानतावादी तत्वाला विरोध करित आहेत. प्रसंगी हिंसक होत जुनी रूढीवादी, वर्चस्ववादी, वर्णवादी व्यवस्थेचे पुनरप्रतिष्ठान कसे होईल ह्यासाठी प्रयत्नरत

आहेत. संघर्ष अटळ आहे आणि तो टाळता येणार नाही. आपलि भूमिका वैचारिक संघर्षाची असावी, हिंसक नसावी. जर हिंसक संघर्ष केला, तर त्यांच्यात आणि आपल्यात काही फरक राहणार नाही.

आपल्याला आपली वैचारिक बैठक पक्की करत प्रत्येक क्षेत्रात उतरावे लागेल. माग ते कोणतेही क्षेत्र असो, त्यात बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे शासक वर्ग बनावे लागेल. 1956 पासून आपल्यात किती बदल झालेत बौद्धधम्म स्वीकारल्यानंतर झालेले परिवर्तन, दलित पँथर, आरक्षण, नौकरीत भेदभाव, आणीबाणी, जनता प्रयोग, मिलकामगारांचा संप, रीडल्स, मंडळ आयोग, रथयात्रा, राममंदिर बाबरी मस्जिद, लिब्रेलयझेशन, कांशीरामांची राजकीय कारकीर्द व पणन, महाराष्ट्रातील रिपब्लिकन दुरावस्था, 2014 नंतरचे वातावरण आणि त्याचा पीडित जीवनावर झालेला परिणाम लेखकांनी चित्रित केले आहे काय? जर कोणी प्रयत्न केला तर नक्कीच बुकर, नोबल पारितोषिक मिळू शकते.

शासक होने म्हणजे फक्त राजकीय नव्हे तर जे क्षेत्र निवडले त्या क्षेत्रात आपला ठसा उमटवून त्या क्षेत्राचे नेतृत्व करणे, हे होय. त्यात मग सांस्कृतिक, अर्थशास्त्र व्यापार, विविध कला, लेखन, प्रशासन, खेळ, शास्त्रातील संगणक, जिवशास्त्र, फिजिक्स, केमिकलं, व्यवस्थापन, अकाउंट इत्यादी क्षेत्र होत. त्या सर्व क्षेत्रात पुढारपण करित नवनवीन कल्पनांनी आपले प्रभुत्व निर्माण करावे लागेल व स्वतःचे शोध लावत नोबलच्या दर्ज्याचे संशोधन करावे लागेल, तेव्हा तुमच्याकडे आपसूक नेतृत्व येईल. बाबासाहेबांना फक्त राजकीय शासकवर्ग नको होता. तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात शासकवर्ग हवा होता. पण आपण फक्त राजकीय क्षेत्र लढवत बसलो आणि त्यातपण निराशाच हाती लागली. कारण राजकीय निवडणुका लढवणे म्हणजे शासक वर्ग होने हा सोपा अर्थ आपण लावला व TIMEPASS करण्यासाठी निवडणुका लढविल्या आणि हारत गेलो. जेव्हा काँग्रेस, शिवशेना, भाजप, राष्ट्रवादीचा उमेदवार तिकिट मागत असतो, तेव्हा त्याने वर्षानुवर्षे मतदारसंघ बांधलेला असतो, समाजात मिसळलेला असतो, लोकांच्या सुखदुःखात सामील झालेला असतो, त्या जोरावर तो पक्षाकडे उमेदवारी मागतो आणि जर ती दिली नाही तर प्रसंगी बंडखोरी करून निवडून येतो, तो आपल्या उमेदवारासारखा अर्ज भरायच्या शेवटच्या दिवशी निश्चित झालेला नसतो. थोडे विषयांतर झाले पण शासकवर्ग कसा असावा हे समजण्यासाठी केले आहे. आपल्याला धोके टाळायचे असतील तर शासकाप्रमाणे सर्व वर्गाला सांभाळून घ्यावे लागेल आणि आपलेसे करावे लागेल तेव्हा धोके टाळतांना तुम्हाला उपयोगी पडतील.

16. आता मी आपले भाषण एक उदाहरण देऊन विराम घेतो. हे उदाहरण ख्रिस्ती मिशणरी कसे काम करतात त्याचे आहे आणि आपल्याला त्यातून काही बोध घेता येईल व बाबासाहेबांचे भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न सकार करता येईल.

एका केरळी मुलीने ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता, याबद्दल एका वर्गात खूप चर्चा व्हायची पण तिच्या मागे. ती समोर असल्यावर कोणीही तिला काही विचारण्याची हिम्मत करित नसे. ती समोर असतांना सगळे तिच्याशी नॉर्मल

वागत असत. तीने ख्रिश्चन धर्म घेतला हे एका मुलिला वर्तमानपत्रामधील नाव बदलाची सूचना वाचून समजले होते. आधी सर्वांना वाटले की, कदाचित तीने ख्रिश्चन मुलाशी लग्न करून धर्म परिवर्तन केले असावे पण, नंतर समजले तसे काही नव्हते. तिच्या सगळ्या कुटुंबानेच धर्मांतर केले होते.

तिचं आधीच नाव होत कविता पिल्लै. धर्मांतरानंतर तीने ज्यूना नाव धारण केले. ज्यूना पिल्लै. ज्यूनाच्या वडिलांना पक्षघात झाला होता. तिचे वडीलच ब्रेड विनर असल्यामुळे या आजारपणाच्या उपचारात कुटुंब भिकेला लागायची वेळ आली होती. ज्यूना आणि तिच्या दोन भावांचं शिक्षण सुटायची वेळ आली होती. वडिलांना बर करण्यासाठी ज्युनाची आई सगळे वैद्यकीय उपचार करून थकली होती. सगळी जमापुंजी संपल्यामुळे ती घरकाम करू लागली. पण, ज्युनाच्या वडिलांच्या तब्बेतीत फारसा फरक पडत नव्हता. ही बाब काही मिशनारींच्या लक्षात आली. ते एकदा ज्युनाच्या घरी होते आणि त्यांनी ज्युनाच्या वडिलांच्या आरोग्यासाठी प्रार्थना करू देण्याची विनंती केली. ज्युनाला हा प्रकार पसंत नव्हता. ती स्वतः केरळी असल्यामुळे मिशणरी कशाप्रकारे काम करतात हे तिला म?

सम्राट अशोक ने स्क्रिप्ट (लिपि) के लिए "लिपि" (Lipi) और लिबि (Libi) दोनों शब्दों का प्रयोग किया है.....


आश्चर्य कि "Libi" रोमन साम्राज्य होते हुए इंग्लैंड तक पहुँचा.......

बगैर Libi (लिपि) की पुस्तक नहीं होती है, इसीलिए लैटिन में पुस्तक को Liber कहा जाता है.......

बगैर Liber (पुस्तक) का पुस्तकालय नहीं होता है, इसीलिए अंग्रेजी में पुस्तकालय को Library कहा जाता है......

अशोक के शिलालेख की तस्वीर एक में लिबि लिखा है, तीन में लिपि लिखा है और बीच में आधुनिक Library की तस्वीर है......

-राजेंद्र प्रसाद सिंघ





कान्हेरी प्राचीन बुद्ध लेणी, १ ले शतक पूर्व बुद्ध लेणी, मुंबई, महाराष्ट्र राज्य.


#मुंबई #महाराष्ट्र #बुद्धलेणी #मराठी



भन्ते तिस्सवरो यांच्या अध्ययनानुसार "सम्राट अशोक यांची समाधी' सन्नती येथील महास्तुप आहे.
सन्नती, कर्नाटक, इंडिया.


















tripindia









या बौद्ध स्तुपात तथागत बुद्ध यांच्या अस्थी ठेवण्यात आल्या होत्या.

तख्त-ए-रुस्तम प्राचीन बौद्ध स्तूप उंच टेकडीवरील कठीण खडकात हा भव्य बौद्ध स्तूप कोरण्यात आला आहे. बौद्ध सम्राट कुशान यांच्या साम्राज्यातील हा भव्य स्तूप आहे.

४ थ्या ते ५व्या शतकात कोरलेले बौद्धस्तूप तख्त ए रुस्तम या नावाने ओळखले जाते.


हा प्राचीन बौद्ध स्तूप अफगाणिस्तान मधील हैबाक शहराजवळ आहे. अफगाणिस्तान मध्ये बौद्ध संस्कृती रुजली होती त्याचा हा उत्तम नमुना आहेच.

येथे बौद्ध स्तुप बरोबर असंख्य बुद्ध लेणी आणि विहार कोरलेली आहेत. यंसेच प्राचीन नाणी आणि बौद्ध शिल्प सापडली आहेत.


#AfghanAtalan #buddha












या बौद्ध स्तुपात तथागत बुद्ध यांच्या अस्थी ठेवण्यात आल्या होत्या.

तख्त- ए- रुस्तम प्राचीन बौद्ध स्तूप उंच टेकडीवरील कठीण खडकात हा भव्य बौद्ध स्तूप कोरण्यात आला आहे. बौद्ध सम्राट कुशान यांच्या साम्राज्यातील हा भव्य स्तूप आहे.

४ थ्या ते ५व्या शतकात कोरलेले बौद्धस्तूप तख्त ए रुस्तम या नावाने ओळखले जाते.

हा प्राचीन बौद्ध स्तूप अफगाणिस्तान मधील हैबाक शहराजवळ आहे. अफगाणिस्तान मध्ये बौद्ध संस्कृती रुजली होती त्याचा हा उत्तम आहे नमुना आहेच.

येथे बौद्ध स्तुप बरोबर असंख्य बुद्ध लेणी आणि विहार कोरलेली आहेत. यंसेच प्राचीन नाणी आणि बौद्ध शिल्प सापडली आहेत.


#AfghanAtalan #buddha






मानकियाला बौद्ध स्तूप, रावळपिंडी, पाकिस्तान.





PIPRĀWĀ INSCRIBED VASE CONTAINING RELICS OF BUDDHA
(. . . *salilanidhane budhasa bhagavate* . . .)



मानकियाला बौद्ध स्तूप, रावळपिंडी, पाकिस्तान.

सम्राट अशोक यांच्या काळात हा बौद्ध स्तूप बांधण्यात आला होता. सम्राट कनिष्क यांनी ईसवी सन दुसर्या शतकात स्तुपाचे नतनिकरण केले.

१८०८ साली माउंट स्टूअर्ट एलफ़िंस्टन यांनी या बौद्ध स्तूपाचा शोधून काढला.


रावलपिंडी के इलाके में 55 बौद्ध स्तूप और 28 बौद्ध विहार का पता चलता है।


(रावलपिंडी से प्राप्त उपवास बुद्ध की यह मूर्ति ब्रिटिश म्यूज़ियम, लंदन में है।)

#stupa #स्तूप #पाकिस्तान #kanishka #pakistan







मैं ईश्वर का पुत्र हूं - जीसस क्राइस्ट

मैं ईश्वर का संदेष्ठा हूं - मोहम्मद साहब

मैं स्वयं ईश्वर हूं - श्री कृष्ण (ब्राह्मणी किताबें)

ईश्वर केवल शोषण का नाम है - सुकरात

ईश्वर का जन्म गहरी साजिश से हुआ है - कार्ल मार्क्स

इस देश में जो नौजवान ईश्वरवादी हैं मेरी नजर में वे नामर्द हैं - शहीद भगतसिंह

इस ब्रह्माण्ड में कोई ईश्वर नहीं है - गौतम बुद्ध

यूनिवर्स में अगर कोई यह साबित कर दे कि ईश्वर है तो मैं अपना सर्वस्त्र उसे दे दूंगा - स्टीफन हॉकिंग

इनके अलावा 'डार्विन' ने भी चुनौती दी थी कि यदि ईश्वर है तो कोई आकर उसका प्रमाण दे.

पाकिस्तानातील स्वात जिल्हयातील बारिकोट येथे सापडले २,३०० वर्षे प्राचीन बौद्ध स्थान.

येथील उत्खननात सिध्दार्थ गोतम त्यांचा प्रिय घोडा कंठक यावर बसलेले शिल्प सापडले. अनेक ध्यान मुद्रेतील बुद्ध शिल्प, आणि दगडावर कोरलेली लहान आकारातील बौद्ध स्तूप सापडली आहेत.

असे म्हंटले जाते की येथे ग्रीक-बौद्ध संकृती होती.











संपूर्ण जगात भारताची ओळख तथागत बुद्धांनीच आहे!

आजादीच्या 75 वर्षांनंतर पण भारतीय ध्वजात किती रंग असतात? ही गोष्ट भरतीत लोकांना माहित होऊ दिली नाही. सांगतात की, राष्ट्रीय ध्वजात तीन रंग असतात? यासाठी भारतीय ध्वजाला *"तिरंगा"* म्हणायची प्रथा पडली. पण यामध्ये काही खरेपणा नाही आहे की, भारतीय ध्वजात तीन रंग असतात? भारतीय ध्वजात केसरी, पांढरा आणि हिरवा रंग असतो. त्याच रंगांबरोबर आणखी एक महत्वपूर्ण रंग असतो. निळा रंग, भारतीय ध्वजात निळ्या रंगाचे *"अशोक चक्र"* पण असते. याचा अर्थ हा झाला की, भारतीय ध्वज हा तीन रंगांचा नाही, तर चार रंगांचा आहे.

केसरी रंग हा *"तथागत बुद्धां"* च्या ज्ञान, त्याग आणि करुणेचे प्रतिक आहे. केसरी रंग हे तथागत बुद्ध आणि बौद्ध भिक्षुंच्या धम्माच्या प्रति निष्ठेचे प्रतिक आहे. शुभ्र (पांढरा) रंग हा तथागत बुद्धांची शुद्धता, त्यांची निर्मळता तसेच त्यांच्या जीवनाला दर्शवितो. हिरवा रंग हा पृथ्वीशी संबंधित होऊन हा देश कृषी प्रधान देश आहे, या गोष्टीला दर्शवितो. निळा रंग हा तथागत बुद्धांचा शांती संदेश याचे प्रतिक आहे, निळा रंग हा तथागत बुद्धांच्या दयाळू स्वभाव तसेच प्रेम आणि बंधुभावाचे प्रतिक आहे.

जेव्हा ब्राम्हण लोक इंग्रजांच्या गुलामीपासून मुक्त होण्यासाठी आजादीची मागणी करित होते, तेव्हा *"तथाकथित आजादी"* च्या नंतर त्यांनी बौद्ध प्रतिकांना चोरून राष्ट्रीय ध्वजात मुख्य स्थान दिले. तथागत बुद्धांनी सारनाथ मधे जो प्रथम धम्मोपदेश दिला होता, त्यांच्या या धम्मोपदेशाला धम्माला गतिमान करण्याचे म्हणजेच

"धम्मचक्र" गतिमान करणारा उपदेश मानला जातो. चक्रवर्ती सम्राट अशोकांनी त्यांच्या आठवणीत सारनाथ मधे मोठे मोठे स्तूप तसेच सिंहचतुर्मुख स्तंभ आणि धम्मचक्र बनविले होते. राष्ट्रीय ध्वजात जे 24 आरे निळ्या रंगाच्या चक्रात आहेत, ते सारनाथच्या धम्मचक्राची नक्कल आहे.

भारत देशाची ओळख तथागत बुद्ध, चक्रवर्ती सम्राट अशोक, बौद्ध धम्मानी होते, तसेच नेहमी होत राहील. बुद्धच भारताची मूळ ओळख आहे. वर्तमान शासक वर्गाचे लोक बौद्ध प्रतिकांना मिटविण्याचे बघत आहेत. यासाठी 2022 या वर्षी राष्ट्रीय ध्वजातील धम्म चक्र म्हणजेच अशोक चक्र गायब केले आहे. राष्ट्रीय ध्वजाचा अपमान करणे म्हणजेच राष्ट्रद्रोह करणे आहे. राष्ट्रद्रोह तोच करू शकतो जो या देशाचा नाही आहे.

आताच काही दिवसांपूर्वी दिल्लीमध्ये अशोक स्तंभ लावला होता, पण त्यामध्ये पण सिंहाला हिंसक दाखविले होते. या वर्षी घरोघरी तिरंगा पोहोचवीला त्यामध्ये पण अशोक चक्र गायब करून टाकले. एका अपमानानंतर दुसरा अपमान ही निती वापरत आहेत. याप्रकारे दोनटप्पी चरित्र कुण्या भारतीयाचे होऊ शकत नाही. राष्ट्रीय ध्वजातील अशोक चक्र गायब करणे हे शासक वर्गाद्वारे बौद्ध प्रतिकांच्या प्रती घृणेचे उदाहरण आहे. या देशाच्या अंदर ब्राम्हण लोक बौद्ध प्रतिकांना मिटवायचे लाख प्रयत्न करोत. परंतु संपूर्ण जगात भारताची ओळख तथागत बुद्धांनीच होते, ही खरी ओळख आहे.

रुद्रा आंबेडकर

#दिक्षाभूमि#चंद्रपूर

आठवनीचे क्षण चंद्रपुरच्या धम्मदीक्षेचे

ज्याप्रमाने 14 ऑक्टोबर 1956 हा दिवस विसाव्या शतकातील एक संस्मर्णीय क्षण म्हणून भारताच्या इतिहासात कोरला गेला, तसाच 16 ऑक्टोबर 1956 हा सुद्धा दिवस चन्द्रपुरातील बाबासाहेबांचा दुसऱ्या धम्मदीक्षा समारंभाचा दिवस म्हणून इतिहासात कोरला गेला. ह्या दोन्ही दिवसाला भारताच्या इतिहासात अनन्य साधारण महत्व आहे. ह्या दिवशी प्रतिगामी व्यवस्थेने लादलेल्या हजारो वर्षाच्या सर्वांगिक पारतंत्रयाचे साखलदंड खळखला तूटले. या दिवशी कोटयावधि माणसे खऱ्या अर्थाने स्वतन्त्र झालित. या दिवशी अहिंसक रक्तविहीन क्रांति झाली. खऱ्या अर्थाने बुद्धभूमित पुन्हा एकदा बुद्ध विचारांच्या जयघोष सुरु झाला. बुद्धाचे धम्मचक्र आणखी एकदा गतिमान झाले. हा क्षण चन्द्रपुरवासियांसाठी अविस्मर्णीयच बनला. तत्कालीन कार्यकर्त्यांनी तो आजही जपून ठेवलेला आहे. *"मि जगलो तर सारे राष्ट्र बुद्धमय करेन"* अशी बाबासाहेबांची वाणी होती. या शब्दाना जागुण त्यानी लगेच चन्द्रपुरपासुन प्रारम्भ केला. नागपुरच्या एतिहासिक समारम्भाच्या एक दिवसानन्तर दि.16 ऑक्टोबरला चंद्रपुरच्या भूमिस त्यांचा स्पर्श

झाला. त्या दिवशी बाबासाहेबांच्या एका हाकेवर तीन ते साडेतीन लाखाच्या वर लोकांनी बुद्धाच्या धम्माची दीक्षा घेतली. हा समारम्भ नक्कीच डोळे दीपवनारा होता.

चंद्रपुरच्या धम्मदीक्षा समारम्भाचे एक वैशिष्ठ असे की, बाबासाहेबांनी स्वहस्ते येथील दीक्षा मैदानावर लाखो लोकांना धम्माची दीक्षा दिली. त्यापूर्वी बाबासाहेबांनी 14 ऑक्टोबरला नागपुरला भन्ते चन्द्रमणि यांच्या हस्ते बौद्ध धम्मात प्रवेश केला. दरेकानी दरेकास धम्माची दीक्षा द्यावी असे बाबासाहेब म्हनत. त्यानुसार त्यानी ही प्रक्रिया पार पाडली. अर्थात या भव्य-दिव्य समारम्भाचे प्रमुख आयोजक बाबासाहेबांचे मानसपुत्र ब्या. राजाभाऊ खोब्रागडे हे होते. तर मूळ प्रेरक त्यांचे वडील आयु. देवाजीबापू खोब्रागडे हे होते.

आपल्या मानपुत्राच्या जन्मभूमित आपण दीक्षा देण्यासाठी जात आहोत याची जाणीव बाबासाहेबांना होती. त्यावेळेस बाबासाहेबांचे स्वास्थ ठीक नव्हते. गुडग्याचा, मधुमेहाचा आजार बळवला होता.

त्यावेळेस नागपुर-जाम-चन्द्रपुर मार्ग अवघड असल्याने बाबासाहेब आपल्या निल्या रंगाच्या गाडिने व्हाया उमरेड-नागभीड़-मूल-चंद्रपुर मार्गे चन्द्रपुरात दाखल झालेत. त्या घटनेला आता 63 वर्ष पूर्ण होत आहेत. दि.16 ऑक्टोबर 1956ला बाबासाहेब दुपारी प्रवासादरम्यान मार्गात येत असताना अनेक लोक त्यांचे स्वागत करीत होते. मूल येथील रेस्ट हाउसवर लोकांनी बाबासाहेबांना भाकरी, पीठल व मिर्चिचा ठेचा खायला दिल्याची आठवण जुने लोक सांगतात.

बाबासाहेबांचे नागपुरहुंन मूल रोडने सायंकाळी 6 ते 6.50 वा. चन्द्रपुरात आगमन झाले. थकलेले असल्याने ते चंद्रपुरच्या सर्किट हाउसवर विश्रातिसाठी थांबले. त्यानन्तर ते सरळ दीक्षाभूमिच्या स्टेजकडे (आताचे डॉ. बाबासाहेब आम्बेडकर कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय) रवाना झाले.

तबीयत खराब असल्यामुळे नानकचन्द रत्तु व समता सैनिक दलाच्या जवानानी बाबासाहेबांना आधार देत स्टेजवर चढविले. बाबासाहेबांचे दर्शन होतच उपस्थित लाखो जनसागराने *बाबासाहेब आम्बेडकर की जय, बाबासाहेब करे पुकार बौद्ध धम्म का करो स्वीकार* अशा जयघोषाने परिसर भावुक बनला होता. वातावरण बाबासाहेबांच्या येण्याने मोहरुन गेले होते. आनन्द, उत्साहाने सारे चन्द्रपुर शहर ओथम्बुन गेले होते. त्या जनसमुहाकडे पाहुन बाबासाहेबांच्या डोळ्यात आनंदाश्रु तरलु लागले.

बाबासाहेबांनी उपस्थित जनतेकडे हात दर्शवित शांत राहन्याचा संकेत देताच सारा जनसमूह क्षणारधात शांत झाला.

बाबासाहेब थकलेले असले तरी उत्साही वाटत होते. लाखो लोकांचा जनसागर पाहुन त्याना आनन्द झाला तो त्यांच्या चेहर्यावरुन स्पष्ठ दिसत होता.

बाबासाहेबांनी क्षणाचाहि विलम्ब न करता सर्वांना हात जोडून उभे राहन्यास सांगितले. सारा जनसागर क्षणात हात जोडून उभा झाला. बाबासाहेबांनी स्वता त्रिशरण, पंचशील देवून लाखो लोकांना बुद्ध धम्माची दीक्षा दिली.

त्या दिवशी बाबासाहेबांनी चन्द्रपुरात भाषण दिले नाही. ते म्हणाले, मला जे सांगायचे होते ते मि नागपुरलाच सांगितले आहे. ते सर्वांना कलेलच. धम्मदिक्शेनन्तर लोक आपापल्या गावास परतले. आंध्रा, मध्यप्रदेश, यवतमाल, वर्धा येथून स्थानिक लोक आले होते. परत गेल्यानन्तर बाबासाहेबांच्या शब्दाला जागुन लोकांनी जुने सनवार करने बन्द केले. लोक बुद्ध जयंती, आम्बेडकर जयंती साजरी करू लागले. हा बदल महान क्रांति होती. अनेक गावात लोक बुद्धविहार, बांधायला सुरुवात केली. ब्या. राजाभाऊ खोब्रागडे यांचे पूर्ण घर त्या दिवशी दीक्षा समारम्भाचे कार्यालयच बनले होते. घरातील सारी पुरुष मंडळी, स्त्रिया, तरुण मुले अहोरात्र समारम्भाच्या यशस्वी आयोजनात व्यस्त होते. कित्येक दिवसांपासून घरात येणाऱ्या जाणार्याची सतत वरदल होती. बेरिस्टर साहेब स्वता लक्ष घालित होते. त्या दिवशीच्या जनतेतिल उत्साह शब्दाच्या पलिकड़चा होता. शहराचे सर्व रस्ते स्त्री पुरुशांच्या गर्दीने आच्छादले होते. खेडयापाडयातील जनता भाकरी बांधून कडेवर, खांद्यावर मुलबाल घेवून आली होती. धर्मातराचा अवर्णनीय आनन्द प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्ठ दिसत होता. 17 ऑक्टोबर 1956 या दिवशी माईसाहेबाना साड़ी-चोळी देण्यासाठी देवाजीबापू खोब्रागडे च्या घरी पाचारन केले होते.

बाबासाहेब नागपुरनन्तर चन्द्रपुरला दीक्षा देणार हे कलताच खेडयापाड्यातिल कार्यकर्त्यांनी गावागावात सभा, बैठका आयोजित केल्या. समता सैनिक दलाच्या लोकांवर जास्त जबाबदारी होती. ते अधिक सक्रिय झाले होते. जवळपास एक महिना आधीपासुन सम्पूर्ण जिल्ह्यात वातावरण निर्मिति झाली. बुद्ध, भीमगीते गायले जावू लागले. महिला सुद्धा समता सैनिक दलात कार्यरत होत्या.

चन्द्रपुरातील दादमहल वार्ड तेव्हा आम्बेडकरी चळवळीचे केंद्र होते. कार्यकर्ते येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची जेवनाची, राहण्याची सोय करून देत होते.

